सोलापूर तरुण भारत
आसमंत



# अराजकवाद्यांचा आणखी एक आश्वासक पराभव

**भारतामध्ये मोदी विरूद्ध देशघातकी नेहरू घराण्याचा तेवढाच देशघातकी वारस यांच्यात लढत असल्याचा आभास निर्माण केला जातो. हा वारस या देशाची नस माहित असण्याच्या जवळपासही नाही; उलट तो देश घातक्यांच्या हातचे बाहुले बनला आहे. दुसरीकडे मोदींच्या नेतत्वाखाली देश आजवर कधी घडले नाही अशा वेगाने सर्व पातळ्यांवर घोडदौड करत आहे. अमेरिकेमध्ये नेतृत्वाच्या स्पर्धेची अवस्था यापेक्षाही गंभीर आहे. ट्रंप आणि हिलरी क्लिंटन, ट्रंप आणि बायडेन आता ट्रंप आणि कमला हॅरिस या मागच्या तीनही निवडणुकांमध्ये अमेरिकेतील नेतृत्वाची अवस्था केवढी गंभीर झाली आहे हे कळू शकते. ट्रंप यांच्या विजयाने अराजकवाद्यांचा पराभव झाला आहे.**

**परराष्ट्रकारण**

**प्रतिनिधी**

बायडेन यांची चार वर्षांची कारकीर्द इतकी भयानक होती की आता ट्रंप यांनी फार काही केले नाही तरी त्यांची आताची कारकीर्द झळाळी आल्यासारखी दिसेल अशी स्थिती आहे. एकेकाळी याच डेमोक्रॅट्सनी गुलामगिरीची प्रथा संपवण्यास अब्राहम लिंकन यांना तीव्र विरोध केला होता. त्यांचे आताचे वर्तनदेखील तसेच लाजीरवाणे आहे.

कमला हॅरीस या कितीही सुमार असल्या तरी पहिली महिला अध्यक्ष आणि त्यातही कृष्णवर्णीय महिला दोन कारणांमुळे त्यांना जनतेचे मोठे समर्थन मिळेल अशी भीती वाटत होती. 'भीती' हा शब्द हेतुपुरस्सर वापरला आहे. एके काळी अमेरिकेने तेथील कम्युनिस्टांना निर्दयपणे चिरडले होते. त्यात केवळ संशयावरून निरपराधदेखील होरपळले गेले होते. मात्र आता डेमोक्रॅट पक्षाच्या आशीर्वादामुळे तेथे फोफावलेला वोकिझम चिरडण्यासाठी अगदी तशाच पावलांची गरज आहे. कोणताही विषय घ्या, त्याबाबतच्या टोकाच्या व्यक्तीस्वातंत्र्यांच्या आग्रहापोटी जे कम्युनिस्ट साध्य करू शकले नाहीत, ते हे अराजकवादी वोक लोक अमेरिकेत आणि संपूर्ण जगात करू पहात आहेत. भारतालाही यांचे वारे लागण्याची सुरूवात झाली आहे. कुटुंबव्यवस्था मोडून आणि विविध मार्गांनी अराजक माजवून जगभरात नवी व्यवस्था निर्माण करणे आणि हे करत असताना जगभरातील मोजक्या प्रभावशाली कुटुंबांनी जगावर आपले वर्चस्व गाजवत राहणे हा यांचा धंदा आहे.

क्लिंटन आणि ओबामा ही जोडपी पूर्णपणे त्यांच्या नियंत्रणाखाली गेल्याचे आणि बायडेन असो की कमला, पडद्यामागचे सूत्रधार प्रत्यक्षात तेच असल्याचे गेल्या चार वर्षांमध्ये स्पष्ट झाले होते. ट्रंप हे स्वतंत्र विचारांचे असल्यामुळे त्यांच्यासमोरील अडसर होते. त्यामुळे मागच्या निवडणुकीपूर्वी 'ब्लॅक लाइव्ज मॅटर' अशा चळवळींना हवा देणे व शक्य ते अन्य उपाय योजून ट्रंप यांना घालवले गेले. आपल्याकडे घडवून आणलेली शाहीनबाग व शेतकी कायद्यांविरूद्धची आंदोलनेदेखील त्याच दृष्टीने घडवले गेलेले प्रयत्न होते. केवळ आणि केवळ याच कारणाने अमेरिकेच्या अध्यक्षपदी ट्रंप यांची झालेली निवड स्वागतार्ह ठरते. हा विजय महत्त्वाचा यामुळे ठरतो की 'कोणाचीच बाजू घ्यायची नाही' असा धोरणात्मक निर्णय घेतलेल्या वॉशिंग्टन पोस्ट या दैनिकासारखे मोजके अपवाद वगळले, तर अमेरिकेतील बव्हंशी वर्तमानपत्रांनी आणि अन्य माध्यमांनी उघडपणे डेमोक्रॅट पक्षाची बाजू घेतली होती. ट्रंप यांच्याविरूद्ध एकांगी प्रचार केला जात होता. त्यांनी निर्माण केलेल्या अशा प्रचाराच्या धुक्यामुळे ट्रंप यांच्याविरूद्ध निष्प्रभ बायडेन यांच्याऐवजी कमला हॅरीस यांना उमेदवारी दिल्याने ट्रंप यांची पराभव निश्चिती झाल्याचे समजले जात होते. आपण पत्रकार असल्याचे विसरून आपल्याकडे अनेकजण इंडीआघाडीच्या ताटाखालचे मांजर झाल्यासारखे वर्तन करत होते, तसाच प्रकार अमेरिकेत चालू होता. ट्रंप यांना तुरूंगवारी घडवण्याचे झालेले प्रयत्न, त्यांना निवडणूक लढण्यासाठी अपात्र ठरवण्याचे प्रयत्न, यास कारणीभूत असलेले ट्रंप यांच्या स्वत:च्या उद्योगांचे स्वरूप, ट्रंप यांना रिपब्लिक पक्षामधूनच झालेला विरोध हे सारे पाहता रिपब्लिकन पक्षाकडे ट्रंप यांच्यापेक्षा अन्य प्रभावी उमेदवार नसला तरी ट्रंप यांना प्रत्यक्ष मतदारांचा कितपत पाठिंबा मिळेल याबाबत शंका वाटत होती. मात्र ट्रंप यांना भरभरून यश मिळाल्याचे दिसते. अमेरिकी विचित्र पद्धतीची किमान २७० इलेक्टोरल कॉलेज मते ते सहज मिळवताना दिसत आहेत. शिवाय त्यांना कमला यांच्यापेक्षा थेट मतेदेखील (पॉप्युलर व्होट) अधिक मिळाली आहेत. याखेरीज त्यांच्या पक्षाला अमेरिकी सिनेटमध्येही बहुमत मिळत आहे. ज्या राज्यांमध्ये लोकांचा कल बदलू शकतो अशा जवळजवळ सर्व राज्यांमध्ये ट्रंप (पान ४ वर)

# कलम ३७० चा पुन्हा अट्टाहास का?

**जम्मू-काश्मीर विधानसभेच्या अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी कलम ३७० पुन्हा लागू करण्यासंदर्भात ठराव मंजूर करण्यात आला. भाजप आमदारांचा विरोधात असतानाही उपमुख्यमंत्री सुरिंदर कुमार चौधरी यांनी हा ठराव विधानसभेत मांडला. या ठरावाला सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसचा पाठिंबा मिळाला. कलम ३७० पुन्हा आणण्याचा हा अट्टहास का? हा प्रश्न या निमित्ताने समोर आला आहे.**

**वेधक**

**जयसिंग मोहन**

केंद्रात काँग्रेसचे सरकार असताना हिंदूच्या कतली झाल्या, त्यांना घरदार सोडून पळाव लागलं पण हिंदूच्या सुरक्षेसाठी ना कुठला कायदा बनवला, ना हिंदूचे पुनर्वसन केले, व या सर्वाला कारणीभूत असणारे कलम ३७० रद्द केले, उलट ज्या अलगाववादी म्हणजेच आतंकवाद्यांकडून हिंदूच्या कतली झाल्या त्यांना केंद्र सरकार तर्फे दिल्लीत सरकारी बंगले आरक्षित केले व जावई असल्यासारखे राष्ट्रीय सुरक्षा देऊन हिंदूच्या टॅक्सच्या पैशातून त्यांचे पालन पोषण केले.

आज केंद्रात मोदी सरकार आहे. त्यामुळे ते अशा पारित झालेल्या कायद्यांना केराची टोपली दाखवतील, पण चुकून यावेळी मोदीजी निवडून आले नसते व केंद्रात भाजपचे सरकार बनले नसते तर आजच जम्मू काश्मीरमध्ये पुन्हा एकदा काँग्रेसच्या मदतीने ३७० लागू झाले असते व पुन्हा एकदा उरल्या सुरल्या हिंदूच्या कतलीना त्या रात्रीपासूनच सुरुवात झाली असती.

काँग्रेस व त्यांच्या मित्र पक्षांचा अजेंडा स्पष्ट आहे, सत्ता हातात मिळताच मुस्लिम लांगुलचालनाला सुरुवात करून हिंदू ना दुय्यम नागरिक बनवून सरकारी तिजोरी रिकामी करणे व हिंदूच्या जमिनी लाटून त्या वक्फ बोर्डाच्या घशात घालणे, जिवंत उदाहरण कर्नाटकमधील काँग्रेस सरकार जे दिवसाकाठी हिंदूच्या हजारो एकर जमिनी घशात घालत सुटले आहे व हिंदूंना स्वतच्या देशात स्वतच्या राज्यात पलायन करण्यास भाग पाडले आहे, महाराष्ट्रात ही अहील्यानगर कानिफनाथ येथील प्रकरण ताजे आहे व नांदेड देगलूर मध्ये ही वक्फ बोर्डाने हैदोस घातला आहे.

महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया उलेमा बोर्डने महाविकास आघाडी काँग्रेसला पाठिंबा दर्शवला असून १७ मागण्यांचे निवेदन दिले असून काँग्रेस कडून ते निवेदन स्वीकारण्यात आले आहे व सत्तेत येताच या सगळ्या मागण्या मान्य करू असे आश्वासन दिले आहे.

२०१९ विधान सभा निवडणुका नंतर महाविकास आघाडीने सरकार स्थापन करताच शरद पवारांनी आम्ही मुस्लिम मतांच्या पाठिंब्यावर निवडून येऊन सरकार स्थापन केले आहे असे (पान ४ वर)




# जनगणना : भारताच्या सर्वांगीण प्रगतीचे प्रतिबिंब

**काही दिवसांपूर्वीच देशातील जनगणनेची प्रक्रिया पुढील वर्षी सुरु होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. तसे झाल्यास 'कोविड' महामारीमुळे २०२१ साली प्रस्तावित जनगणनेचा मार्ग सुकर होऊ शकतो. तेव्हा, नेमकी जनगणनेची प्रक्रिया, त्याआधारावर लोकसभा मतदारसंघांची प्रस्तावित फेररचना आणि एकूणच जनगणनेच्या प्रक्रियेचे महत्त्व याचा आढावा घेणारा हा लेख...**




**लक्ष्यवेध**

**अच्युत राईलकर**

नुकतेच केंद्र सरकारकडून पुढील वर्षी जनगणनेच्या कामाला सुरूवात होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. सरकारकडून लवकरच त्याविषयी अधिकृत घोषणा केली जाईल, असा विश्वासदेखील सर्वांना आहे. खरं तर रीतसर जनगणनेचे काम २०२१ साली सुरू करायला हवे होते. ते काम 'कोविड-१९'ची सर्वत्र साथ पसरल्यामुळे सुरू करता आले नाही. जनगणना आयुक्त मृत्युंजयकुमार नारायण यांची मुदत डिसेंबर २०२४ साली संपणार होती. पण, त्यांना ऑगस्ट २०२६ सालापर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ती जनगणनेसाठीच असावी, असाही एक निष्कर्ष काढण्यात येत आहे.

ब्रिटिशांनी १८७२ सालापासून दर दहा वर्षांनी जनगणना सुरू ठेवली. आपली भारतातील शेवटची जनगणना २०११ साली झाली. भारताची पुढील जनगणना मात्र २०२५ साली होईल, असा अंदाज आहे. त्यानंतर २०३५, २०४५ अशी दर दहा वर्षांनंतर, म्हणजेच दशकाच्या मध्यावर जनगणना करण्याचा सरकारचा विचार असू शकतो. या नवीन जनगणनेचे काम हे काही मुख्य गोष्टींवर अवलंबून आहे. लोकसभेच्या मतदारसंघांची फेररचना करणे, हे काम गेल्या पाच दशकांपासून पूर्ण करण्याचे बाकी आहे आणि त्यातही काही मतदारसंघांमध्ये महिलांचे राखीव मतदारसंघ म्हणून निर्माण झाल्याचे स्पष्ट करण्याचे बाकी आहे. राज्यघटनेच्या तत्त्वानुरूप लोकसभा मतदारसंघाच्या फेररचनेचे काम हे जनगणना झाल्यावर लगेच करावे लागते. या कामाकरिता अनेक राज्यांतील लोकसंख्येची संख्या तपासणे गरजेचे आहे. असे थोडेच मतदारसंघ आहेत जिथे लोकसंख्येत काहीच बदल झालेला नाही. परंतु, लोकसभा मतदारसंघाच्या फेररचनेचे काम राजकीय दबावामुळे १९७६ सालापासून केले न गेल्याचे असे दिसून येते.

### लोकसभा मतदारसंघाच्या फेररचनेचे काम:-

लोकसभेच्या मतदारसंघांच्या फेररचनेचे काम प्रमाणित किंवा तर्कशास्त्रासारख्या मुद्द्यांवरून बदलले जात असेल, तर ते चालणार नाही. कारण, काही मतदारसंघातील लोकसंख्येत गेली काही वर्षांत अनेक प्रकारचे बदल झाले आहेत. ते प्रत्यक्ष धुंडाळल्याशिवाय दृष्टोत्पत्तीस येणार नाहीत. काही ठिकाणची लोकसंख्या अतोनात वाढली आहे, तर दक्षिणेकडील राज्यांमध्ये ती कमी झाली आहे, असेही आढळून येते. फेररचनेत प्रमाणित बदल केले गेले, तर दक्षिण भारतातील मतदारसंघांच्या फेररचनेमुळे तेथील जनतेवर अन्याय होऊ शकतो, अशी टीका काही द्रविडी पक्षांनी केली आहे. २००२ साली २००१च्या जनगणनेचे काम संपल्यानंतर लोकसभा मतदारसंघ फेररचनेची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. परंतु, जुन्या मतदारसंघांतील संख्येमध्ये बदल झालेले नाहीत, असे त्या कामातून समोर आले. कारण, त्यापैकी काही मतदारसंघ फक्त इकडून तिकडे व तिकडून इकडे या पद्धतीने बदलले गेले होते. त्या तुलनेत मतदारसंघांच्या संख्येत कमी-जास्त असे फारसे बदल दिसून आले नाही.

विद्यमान सरकारने मतदारसंघांच्या फेररचनेचे काम २०२६ साली पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. कारण, २००१ साली राज्यघटनेमधील ८४व्या सुधारणांच्या मसुद्याप्रमाणे फेररचनेचे काम २०२६ सालापर्यंत स्थगित केलेले आहे.

### दशकाच्या प्रारंभी जनगणनेचे काम:-

राज्यघटनेच्या मसुद्यामध्ये अनेक ठिकाणी 'लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या मर्यादांमध्ये फेररचनेकरिता प्रयत्न केले जावेत' असा उल्लेख आहे. पण, जनगणनेचे काम केव्हा करावे याचा उल्लेख केला गेलेला नाही. फक्त 'दशकाच्या सुरूवातीला एकदा जनगणनेचे काम करावे, असे ब्रिटिशांनी पारंपरिक पद्धतीचे म्हणून काम सुरू केले. इतर देशांतही साधारण हीच पद्धत अवलंबली जाते.

### मतदारसंघांमध्ये बदल करायचा असेल, तर...

भारताच्या जनगणनेसाठी दोन मुद्द्यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. एक म्हणजे, सर्व घरांची यादी बनविणे व दुसरे म्हणजे प्रत्येक घराला घर क्रमांक देणे. घरांच्या याद्या करणे व त्यांना क्रमांक देणे या कृती एप्रिल ते सप्टेंबर या काळात केल्या गेल्या आहेत. लोकसंख्येची नोंदणी जनगणनेच्या वर्षातील फेब्रुवारीच्या दुसऱ्या आणि चौथ्या आठवड्यात घेतलेल्या आहेत. यामुळे जनगणनेची नोंदणी (जन्म व मरण) ही दि. १ मार्च तारीख (मध्यरात्र) डोळ्यापुढे ठेवून केली गेली आहे.

### जनगणनेत जातीनिहाय उल्लेख असावेत का?

बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी राज्यात जातीनिहाय जनगणना करावी, असा निष्कर्ष काढला होता आणि ही प्रक्रिया बिहारमध्ये पारही पडली होती. जातीनिहाय जनगणनेतून बिहारमध्ये ८० टक्के नागरिक अतिमागस आहेत, हा निष्कर्ष समोर आल्यानंतर देशभर जातीनिहाय जनगणना घ्यावी, या मागणीने जोर धरला. नितीशकुमारांनंतर चिराग पासवान यांच्या पक्षानेही जातीनिहाय जनगणनेची वारंवार मागणी केली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी हेही सातत्याने ही मागणी करत आहेत. मध्यंतरी रा. स्व. संघानेदेखील काही अटींवर जातगणनेस पाठिंबा दर्शविला आहे. जातगणना लोककल्याणाखातर व विकासासाठी असावी राजकारणासाठी नको, अशी संघाची त्यामागील भूमिका. पण, सध्या राजकीय वर्तुळातही जनगणना जातीनिहाय असावी, हा मुद्दा कळीचा ठरत आहे.

### जनगणना कधी व्हायची होती?

१९८१ सालापासून तीन वेळा दहा वर्षांआड जनगणनेचे काम झाले. लशर्पीीळपवळर.सीीं.ळप या संकेतस्थळावर जनगणनेचा तपशील उपलब्ध आहे. त्याच मालिकेतील चौथी जनगणना २०२१ साली सुरू व्हायची होती. पण, 'कोविड-१९' मुळे ती झाली नाही. आजवरची देशव्यापी जनगणना ही लिखापढीच्या स्वरुपात करावी लागली. पण, यापुढील जनगणना मात्र काळास अनुसरून अंकीय स्वरुपात केली जाईल. सरकारतर्फे त्यासाठी एका विशेष पोर्टलची (पान ४ वर)

# भीमथडीच्या तट्टांना या...





विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**

**'रेवा वरदा, कृष्ण कोयना, भद्रा गोदावरी
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी
भीमथडीच्या तट्टांना या यमुनेचे पाणी पाजा...'**

'महाराष्ट्र गीता'तल्या या पहिल्या तीन ओळी आपल्याला शिवछत्रपतींपासून प्रतापी बाजीरावापर्यंतच्या असंख्य पराक्रमी वीरांच्या तुफानी घोडदौडीचे स्मरण करून देतात. बादशाही सैन्याकडे उंच आणि तगडे अरबी घोडे असायचे तर आमच्या या गरीब मराठ्यांकडे मध्यम उंचीची भीमथडी तट्टे होती आणि तरीही त्यांनी उत्तरेत यमुनाच नव्हे, तर पार अटक नदीपासून दक्षिणेत कावेरी नदीपर्यंत दौड मारून जवळपास सगळा भारत देश मुसलमानमुक्त करत आणला होता. हे सगळे आठवून अभिमानाने आमचा ऊर भरून येतो. पण तेवढे पुरेसे नाही, ज्या समाजाला पुन्हा एकदा आपले, आपल्या देशाचे पुनरुत्थान घडवून त्याला परमवैभव प्राप्त करून द्यायचे आहे, त्याला नुसती भावना पुरेशी नाही.

आजच्या ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान युगात तर अजिबात पुरेशी नाही. तर त्या भावनेला सतत अभ्यास, अध्ययन, उद्योग यांची जोड देऊन हर एक क्षेत्रात अद्ययावत-अप टु डेट ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे. आता हेच पाहा ना. भीमथडी तट्टे अरबी घोड्यांना भारी ठरली, असे आपण म्हणतो, तेव्हा भीमथडी म्हणजे काय आणि या भीमथडीमध्ये मराठी घोडदळासाठी तट्टांची पैदास नेमकी कुठे केली जात असे, ती कोण लोक करत असत, त्यांचे पुढे काय झाले, याबद्दल आपल्याला काय माहिती आहे? काहीही नाही. तुम्ही म्हणाल, कुठल्या जुनाट घोडदळाबद्दल प्रश्न विचारताय? अहो, १९ व्या शतकाच्या अखेरीस मोटरकारचा शोध लागला; १८९८ साली पहिली मोटार भारतात आली नि पुढच्या सुमारे २० वर्षांत घोड्यांचा उपयोग लष्करातून आणि नागरी जीवनातूनही झपाट्याने कमी होत गेला. आता तर लग्नात वरघोडा म्हणूनदेखील घोडा मिळणे दुरापास्त झाले आहे. हां, चांगले,दमदार, देखणे घोडे बघायचेच असतील तर अश्वशर्यतीच्या मैदानावरच जावे लागेल, पण तो जुगाराचा खेळ आहे. एरवी आधुनिक जीवनात घोड्याला काय महत्त्व उरले आहे. वरीलप्रमाणे प्रश्न आपल्या मनात येऊ शकतो. पण विज्ञान-तंत्रज्ञानात आपल्या ५० वर्षे पुढे असणाऱ्या पाश्चिमात्य विद्वानांना तसे वाटत नाही. त्यामुळे एकाच वेळी 'घोडा' या विषयावरची तीन-तीन पुस्तके बाजारात येऊ शकतात; नव्हे आलीच आहेत. डेव्हिड शाफेझ हा अमेरिकेच्या हार्वर्ड विद्यापीठातला विद्वान सतत वेगवेगळ्या आशियाई देशात फिरून तिथल्या इतिहास, परंपरा आणि संस्कृतींचा अभ्यास करत असतो. जेव्हा तो फिरत नसतो, तेव्हा तो कधी लिस्बनमध्ये तर कधी पॅरिसमध्ये बसून आपल्या भटकंतीतल्या टिपणांचा इतरांनी लिहून ठेवलेल्या माहितीशी मेळ घालत असतो. त्याच्या ताज्या पुस्तकाचे नाव आहे 'रेडर्स, रुलर्स अॅन्ड ट्रेडर्स.' विल्यम टी. टेलर हा अमेरिकेच्या कोलोरॅडो विद्यापीठातला पुरातत्त्वशास्त्र या विषयाचा सहायक प्राध्यापक आहे. त्याच्या ताज्या पुस्तकाचे नाव आहे 'हूफ बीटस्.' तर, टिमोथी वाईनगार्ड हा कोलोरॅडो विद्यापीठातच इतिहास विषयाचा प्राध्यापक आहे. पण तत्पूर्वी तो कॅनडा देशाच्या लष्करात अधिकारी होता.

कॅनडाच्या रॉयल मिलिटरी कॉलेजमधून त्याने 'युद्ध अभ्यास' या विषयात एम. ए. आणि मग ऑक्सफर्ड विद्यापीठातून 'युद्ध इतिहास' या विषयात डॉक्टरेट मिळविली आहे. त्याच्या ताज्या पुस्तकाचे नाव आहे 'द हॉर्स-ए-गॅलपिंग.' हिस्ट्री ऑफ ह्यूमॅनिटी' या पुस्तकांमधून त्यांच्या विद्वान लेखकांनी काय मांडणी केली आहे, हे पाहण्यापूर्वी आपण आपला भीमथडी तट्टांचा विषय पूर्ण करू. भीमथडी याचा अर्थ भीमा नदीचा काठ म्हणजेच भीमा नदीचे खोरे. भीमा नदी पुणे जिल्ह्यात भीमाशंकराच्या डोंगरात उगम पावून पुणे जिल्हा, अहल्यानगर (अहमदनगर) जिल्हा आणि सोलापूर जिल्ह्यातून वाहत कर्नाटक प्रांतात प्रवेश करून विजापूर जिल्हा, गुलबर्गा जिल्हा अशी वाहत कर्नाटक-आंध्र सीमेजवळ कृष्णा नदीला मिळते. हा भाग म्हणजेच भीमा खोरे किंवा भीमथडी. या प्रवासात भीमेला भामा, इंद्रायणी, वेळ, मुळा-मुठा, घोड, नीरा, माण आणि सीना या उपनद्या येऊन मिळतात. आता या भीमथडीमध्ये घोड्यांची पैदास नेमकी कुठे होत असे? माहीत नाही. मलिक अंबर हा अत्यंत हुशार आणि धूर्त हबशी सरदार इ. स. १६०० साली अहमदनगरच्या निजामशहाचा वजीर बनला. असे म्हणतात की, त्या वेळेस निजामशहाच्या सैन्यात फक्त १५० घोडेस्वार होते. मलिक अंबरने अल्पकाळात ही संख्या ७ हजारांवर पोहोचवली.

सन १६१० पर्यंत त्याच्या सैन्यात ४० हजार घोडेस्वार झाले. मलिक अंबरने हे कसे साध्य केले? त्याने तोपर्यंतच्या सुलतानांनी कटाक्षाने दूर ठेवलेल्या स्थानिक लोकांना म्हणजेच मराठ्यांना (मराठी भाषिक लोकांना) सैन्यात, विशेषतः घोडदळात भरती करून अधिकारपदे म्हणजे सरदारक्या दिल्या. याचे मोठे उदाहरण म्हणजे मालोजीराजे भोसले. नंतरच्या काळात मालोजीराजांचे चिरंजीव

शहाजीराजे हे निजामशाहीचे सरलष्कर म्हणजे घोडदळ प्रमुख झाले. आणखी नंतरच्या काळात शहाजीराजे यांचे चिरंजीव शिवाजीराजे यांनी या घोडदळाच्या चपळ, गतिमान हालचालींवर आधारलेले गनिमी कावा हे युद्धतंत्र कळसाला नेवून नर्मदा ओलांडून दिल्लीवर धडक मारली. ज्या भीमथडी तट्टांवरून ही सगळी पराक्रमगाथा रचली गेली, त्या भीमथडी तट्टांची पैदास या भीमेच्या खोऱ्यात नेमकी कुठे किंवा कुठे कुठे होत होती? ती करणारे लोक कोण होते? शिवरायांच्या किंवा नंतरच्या मराठ्यांच्या घोडदळाला वर्गाला किती घोडे पुरवले जात असत? त्यांचे लढाईसाठी शिक्षणप्रशिक्षण कोण करत होते? सगळेच प्रश्न आहेत. उत्तरे माहीत नाहीत. जी उत्तरे माहीत आहेत, ती इंग्रजी कालखंडातली आहेत. सन १८१७ च्या तहान्वये दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांची तैनाती फौजेची योजना स्वीकारली. ३ हजार पायदळ आणि ५ हजार घोडदळ अशा या तैनाती फौज पथकाला इंग्रजांनी नाव दिले'पूना हॉर्स.' या पलटणीचे मुख्यालय खुद्द पुणे शहरात नसून पुणे-नगर रस्त्यावरील शिरूर घोडनदी या गावात होते. पूना हॉर्ससाठी भीमथडी तट्टकंची पैदास आणि उत्तम घोडेस्वारांची भरती शिरूर परिसरातून होत असे.

या घोडेस्वारांना त्यांच्या शौर्यामुळे 'शिरूरी राऊत' असे म्हटले जाऊ लागले. पुढे इंग्रजांचे अफगाणिस्तानबरोबर युद्ध सुरू झाले. इंग्रजी उच्चाधिकाऱ्यांनी पूना हॉर्स पलटणीचे मुख्यालय शिरूरहून मध्यप्रदेशात नीमच येथे नेले. त्यामुळे शिरूर भागातील घोड्यांची पैदास आणि स्वार भरती दोन्ही विजय कायमचे संपले. पण इंग्रजपूर्व काळातील म्हणजेच मराठेशाहीतील घोडदळ, घोडे अशा संबंधित विषयावर संशोधन करण्यास प्रचंड वाव आहे. संशोधकांचीच वानवा आहे. आता आपण तीन पाश्चिमात्य संशोधकांच्या घोडा या विषयावरील ताज्या पुस्तकांकडे वळू. त्यांच्या मांडणीतला पहिला महत्त्वाचा भाग असा की, आज मानवी जीवनात किंवा त्याच्या पुढच्या विकासासाठी घोड्याला काहीही महत्त्व उरलेले नाही, हे सगळ्यांनीच मान्य केलेले आहे. पण आजपर्यंतचा जो मानवाचा विकास आहे, त्यात घोडा या प्राण्याचा फार मोठा सहभाग आहे, हे देखील सगळ्यांनी ठामपणे मांडले आहे. या पाश्चिमात्य तज्ज्ञांच्या मते गेल्या हिमयुगाच्या अखेरच्या काळात म्हणजे आजपासून सुमारे १२ हजार वर्षांपूर्वी युरेशियाच्या गवताळ स्टेप्स प्रदेशात घोडा हा प्राणी निर्माण झाला. बैल, उंट, गाढव इत्यादी प्राण्यांपेक्षा घोडा हा अधिक गतिमान आहे, तो पाठीवर भरपूर सामान पेलू शकतो आणि तो छान माणसाळतो. हे समजल्यावर माणसाने त्याला माणसाळवून आपल्या सेवेत घेतला.

आजही घोडा हा सर्व जनावरांमध्ये सर्वात गतिमान प्राणी आहे. तो तासाला ४० मैल किंवा ६४ किमी अंतर न थांबता तोडू शकतो. घोड्याला कमी झोप, कमी विश्रांती पुरते. मुख्य म्हणजे स्वभावतःच तो कोणतेही प्रशिक्षण झटपट आत्मसात करतो. घोड्याचे हे सगळे गुण लक्षात आल्यावर मानवाने त्याला व्यापारी आणि लष्करी कामांना जुंपले. प्राचीन जगातला सगळ्यात महत्त्वाचा व्यापारी मार्ग म्हणजे 'सिल्क रुट.' या लेखकांच्या मते त्याला 'हॉर्स रुट' म्हणणे जास्त योग्य होईल, इतका घोड्यांच्या व्यापारी काफिल्यांचा मनसोक्त वावर त्या मार्गावर शतकानुशतके होत होता. प्राचीन पश्चिमी संस्कृतींना धडकी भरवणारे आक्रमक म्हणजे इसवी सनाच्या चौथ्या शतकातले हूण, आठव्या शतकातले अरब ११ व्या शतकातले तुर्क आणि १३ व्या शतकातले मंगोल. हे सगळे आक्रमक उत्तम घोडेस्वार होते आणि आपल्या गतिमान घोडदळाच्या बळावरच त्यांनी तत्कालीन पश्चिमी संस्कृती उद्ध्वस्त करून टाकल्या होत्या. मग पश्चिमी देशांनीही उत्कृष्ट घोडदळे उभी केली. या संदर्भात हे लेखक काही गमतीदार किस्से सांगतात. सन १८०२ साली फ्रेंच सम्राट नेपोलियनने रशियावर स्वारी केली.

रशियन सैन्यापेक्षा भीषण हिमवर्षावाने (जनरल विंटरने) फ्रेंच सैन्याची अतोनात हानी केली. किमान ५ लाख फ्रेंच सैनिक बर्फाने गारठून मेले. नेपोलियनला नामुष्कीची माघार घ्यावी लागली, हे आपल्याला माहीत आहे. पण किमान २ लाख घोडेदेखील मेले आणि मनुष्यहानी पुढे पटकन भरून निघाली. पण उत्तम प्रशिक्षित घोडे मिळायला बराच काळ लागला. ही माहिती नवीन आहे. १९१४ ते १९१८ च्या पहिल्या महायुद्धात मशीनगन्स आणि रणगाडे यांच्यासमोर घोडदळ निष्प्रभ ठरले. त्यामुळे सर्वच देशांनी घोडदळाला जवळपास रजा दिली. पण १९३९ साली हिटलरने किमान २० लाख घोडे युद्ध आघाडीवर रवाना केले होते. कशासाठी? तर, बारीकसारीक वजनी सामान वाहून नेणे, तोफा खेचून नेणे इत्यादी कामांसाठी नि तशीच गरज पडली तर मारून खाण्यासाठी. ही माहिती नवी आहे. घोड्यावरून प्रवास करता येतो. हे समजण्यापूर्वी लोक कमरेचे वस्त्र पायघोळ म्हणजे आजच्या लुंगीप्रमाणे वापरत असत, असे हे लेखक म्हणतात. घोड्यावर नीट बसता यावे म्हणून विजार म्हणजे आजची पँट या वस्त्राचा शोध लागला, असे हे विद्वान म्हणतात. जगातली जुन्यात जुनी विजार चीनच्या पश्चिम भागात सापडली असून कार्बन-१४ चाचणीने तिचा काळ इसवी सन पूर्व १३०० असा ठरवण्यात आला आहे. हे सगळे संशोधन वाचताना अशी गंमत वाटते की, हे सगळे पश्चिमी तज्ज्ञ भारताला कुठे मोजतच नाहीत. हिंदू परंपरेनुसार महाभारताचा काळ आजपासून ५ हजार वर्षांपूर्वीचा आहे.

महाभारत ग्रंथाच्या वनपर्वात महान अश्वशास्त्रज्ञ शालिहोत्र याचा उल्लेख होतो. पांडव त्याला भेटायला त्याच्या आश्रमात गेले होते. पांडवांपैकी सहदेव हा अश्वविद्येत निष्णात होता. 'शालिहोत्र तंत्र किंवा शाल्यहोत्र' हा शालिहोत्राचा ग्रंथ लंडनच्या इंडिया ऑफिस ग्रंथालयात आहे. विष्णुपंत छत्रे सर्कसवाले यांनी 'शास्त्रहोत्र' या ग्रंथाचा अभ्यास करून अश्वविद्या आत्मसात केली होती. हे सगळे कोण उजेडात आणणार? (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)


---

प्रतीमा विलास

**डॉ. रमा गोळवलकर**

शिवशंकर आणि त्यांची अर्धांगिनी पार्वती ही दोघे म्हणजे ज्ञान मिळविण्यासाठी उतावीळ असलेल्या जिज्ञासू वृत्तीच्या लोकांचे पालक, असाही एक पैलू शिव-पार्वतीच्या एकत्रित प्रतिमेला लागू होतो. कारण श्रीमद् आदिशंकराचार्य विरचित अन्नपूर्णा स्तोत्राच्या शेवटच्या श्लोकाचे अंतिम चरणात 'ज्ञान वैराग्य सिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वती' अशी विनंती आहे. म्हणजे ज्ञान आणि वैराग्य सिद्ध करण्यासाठी हे पार्वती तू आम्हाला भिक्षा देऊन पोषित कर! त्यानंतरचा आणि शेवटचा श्लोक आहे... **माता मे पार्वती देवी पिता देवो महेश्वरः । बान्धवाः शिवभक्ताश्च स्वदेशो भुवनत्रयम्** ।।१२।। पार्वती माझी माता आहे आणि महेश्वर माझे पिता आहेत. सर्व शिवभक्त माझे बांधव आहेत आणि तीनही भुवन माझा स्वदेश आहे. याचा एकत्रित अर्थ पाहू जाता ज्ञान आणि वैराग्य हेच ध्येय डोळ्यांसमोर

## दैवी युगुल



**घोरपड पायाशी असलेली डाव्या हाती दर्पण धरलेली गौरी आणि ज्ञानमुद्रा केलेल्या हाती अक्षमाला घेतलेले हर तर पद्म-चक्र-गदा-शंख धारण केलेले श्रीधर आणि धनाचा कुंभ हाती घेतलेली लक्ष्मी : हळेबिबड बेलूर १० वे शतक**

ठेवलेल्यांचे माता-पिता पार्वती आणि महादेव असून त्यांच्याच सारखे इतर शिवभक्त हे नातेवाईकच आहेत, असे आचार्य म्हणतात. शिवशंकर हे पंचमहाभूतांचे अधिपती म्हणजे भूतनाथ आहेत. त्यामुळे पंचमहाभूतांच्या मेळातून निर्माण झालेल्या या संपूर्ण भौतिक विश्वाचं आणि जीवसृष्टीचं यच्चयावत ज्ञान म्हणजे 'ज्ञानदक्षिणामूर्ती हर' आणि ते संपादून घेण्याची प्रक्रिया म्हणजे 'ज्ञानप्रसूनाम्बिका गौरी.' या युगुलाला आपण 'गौरीहर' म्हणून ओळखतो. ज्ञान आणि ज्ञान संपादून घेण्याची प्रक्रिया या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. गौरी आणि हर या दोन बाजू एकमेकांशेजारी एकमेकांच्या आलिंगनात बद्ध दाखवलेले असतात. ती तर त्यांच्या मांडीवरच बसलेली असते. तिच्या पायांशी गोधा म्हणजे घोरपड असते. बहुतेक वेळी डाव्या हाती असतो आरसा; ज्यात अधिकाधिक प्रतिबिंब उमटत असतं. त्यांच्या मांडीवर बसून ती विविध गुह्य म्हणजे गूढ, समजण्यास अतिशय कठीण, अगम्य अशा ज्ञानाची उकल करण्यासाठी उद्युक्त करत असते आणि ते तिच्या एकूण एक प्रश्नाचं सविस्तर, सहोदारण, सप्रमाण उत्तर देत असतात. असे कितीतरी ग्रंथ संस्कृत आणि तिच्यापासून उत्पन्न झालेल्या विभिन्न भारतीय भाषांत प्रसिद्ध आहेत; ज्यांची सुरुवात उमामहेश्वर संवाद किंवा ईश्वर-पार्वती संवादापासून होते. उदाहरणच द्यायचं झालं, तर गुरूचं माहात्म्य वर्णन करणारी 'गुरुगीता' ही अशीच या दोघांच्या संवादाचं फलित आहे.

गोधासनात भवेद् गौरी अशी व्याख्या असलेल्या गौरीच्या पायांशी असलेली घोरपड हे ज्ञान संपादन करण्यासाठी लागणाऱ्या एकाच ठिकाणी चिकटून राहण्याचं, पकड घट्ट ठेवण्याचं द्योतक आहे. पण तिच्या हातात बहिर्गोल दर्पण देण्याचं ज्या कोण्या शिल्पकाराला सुचलं असेल ना त्याच्या कल्पनाविलासाला आपण साष्टांग दंडवतच करायला हवा. दर्पण म्हणजे आरसा. शिवशंकराचं ते प्रखर तेजस्वी स्वरूप आपल्यासारख्या सामान्य लोकांना सहन होणार नाही म्हणून ती त्या रूपाला सौम्य स्वरूप देते. जसं चंद्र सूर्याचं तेज सौम्य करून आपल्यापर्यंत पोहोचवतो तशीच पार्वतीदेखील प्रचंड प्रखर अशा महेश्वराच्या तेजाला सौम्य करत आपल्याला सुसह्य होणाऱ्या स्वरूपात प्रस्तुत करते. म्हणून तिच्या हाती आरसा असतो. हे सगळं करायचं तर पार्वतीची पकड घट्टच असावी लागते म्हणून तिचं वाहन गोधा अर्थात घोरपड! तर, स्वतः ज्ञानदक्षिणामूर्ती गौरीला मांडीवर घेऊन तिला अतिशय प्रेमानं म्हणजे तिच्या हनुवटीला धरून हे सारं गुह्यज्ञान उकल करून सांगत असतात. एक कोडं उकललं की लगेच दुसरं कोडं आपल्याला खुणावू लागतं. ते उलगडलं की पुढचं आव्हान उभंच असतं. त्यासाठी उपलब्ध माहितीवर पुनःपुन्हा प्रक्रिया करावी लागते. नवीन माहिती मिळाली की, तिचं वर्गीकरण करून योग्य त्या संदर्भासह प्राधान्यक्रम आणि प्राथमिकता निश्चित करावी लागते. त्यातून ज्ञान प्रकट होत जातं आणि नेमकं हेच संकल्पन या ज्ञानप्रसूनाम्बिका (ज्ञान पुष्पाची आई) गौरी आणि ज्ञानदक्षिणामूर्ती हर यांच्या मूर्तीतून व्यक्त करण्यात आलं आहे. सर्वत्र लोकप्रिय असलेलं दुसरं दैवी युगुल म्हणजे लक्ष्मीविष्णू! सनातन धर्माचे अध्वर्यू वर्णाश्रम धर्माचं पालन करत चारही पुरुषार्थ सिद्ध करणं, हे या मनुष्यजन्माचं एकमेव आणि अंतिम उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादित करतात. धर्म अर्थात जो धारण करण्यात येतो तो. माश्याचा धर्म पाण्यात पोहणं आहे तर पक्ष्यांचा धर्म हवेत उडणं आहे. विंचवाचा धर्म डंख मारणं आहे तर आईचा धर्म पिलांचं संगोपन करणं. म्हणजे केवळ मूळ स्वभाव इतकाच त्याचा अर्थ होत नाही तर त्याहूनही अधिक, त्याहून व्यापक, त्याहून विस्तारलेला असा अंतर्बाह्य व्यापून टाकणारा, जीवाच्या अस्तित्वाला आकार, आधार देणारा आणि धारण करणारा गाभा म्हणजे धर्म! याचं पालन करणं, त्यासाठी लागणारी संपत्ती आणि साधनसामग्री नैतिक आणि वैध मार्गानं मिळवणं म्हणजे अर्थ आणि मनात निर्माण झालेल्या, नीतिमत्तेच्या चौकटीत बसणाऱ्या न्याय्य इच्छाआकांक्षा-अपेक्षा पूर्ण करणं, करता येणं त्यासाठीची समृद्धी निर्माण करणं म्हणजे काम! हे तीनही पुरुषार्थ जिवंतपणी साधायचे, सिद्ध करण्याचे असतात. शेवटचा म्हणजे चौथा पुरुषार्थ असलेला मोक्ष; तो मात्र मृत्यूच्या नंतरच प्राप्त होतो. हा मोक्ष देण्याचे अधिकारी आहेत भगवान श्रीविष्णू! त्यामुळे तीन लौकिक आणि एक पारलौकिक अशा चारही पुरुषार्थांना साध्य करण्यासाठी लक्ष्मी अधिक विष्णू असं सूत्र मांडण्यात आलं आहे. त्यामुळे साहजिकच त्या दोघांचा विवाह होऊन ते एक दैवी दाम्पत्य म्हणून भक्तिभावाने पुजल्या जाते. हे चारही पुरुषार्थ सुदृढ, समृद्ध, संतुलित, सम्यक समाजपुरुषाची संकल्पना साकार करण्यासाठीची मानक प्रक्रिया म्हणजे 'स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर' (एसओपी) आहे. यातली गंमत अशी की, श्रीविष्णूंच्या चार हातांत असलेल्या चार आयुधांचा क्रम निश्चित आहे. खालचा उजवा हात = वरचा उजवा हात = वरचा डावा हात = खालचा डावा हात या क्रमानं ही आयुधं कोणती ते बघून विष्णुमूर्तीचं नाव निश्चित करण्यात आलेलं आहे.

उदाहरणार्थ खालच्या उजव्या हातात पद्म (कमलपुष्प), वरच्या उजव्या हातात शंख, वरच्या डाव्या हातात चक्र आणि खालच्या डाव्या हातात गदा अशा क्रमानं आयुधं असतील तर त्या विष्णू विग्रहा (मूर्ती) ला केशव म्हणतात. त्याच प्रमाणे खालच्या उजव्या हातात पद्म, वरच्या उजव्या हातात चक्र, वरच्या डाव्या हातात गदा आणि खालच्या डाव्या हातात शंख असा आयुधक्रम असेल तर ती श्रीधराची मूर्ती असते. अशा विविध क्रमानं आयुधं धारण केलेल्या विष्णुदेवांच्या मांडीवर बसलेली लक्ष्मी हे दैवी दाम्पत्य म्हणजे अभ्युदयाच्या दिशेनं झेपावणारा साधनसमृद्ध, सुसंस्कृत, सक्षम, सुष्ट, सभ्य समाज! तर, असा हा ज्ञान-ज्ञानप्रक्रिया दर्शवणारे गौरीहर आणि चारही पुरुषार्थ सार्थ करणारे लक्ष्मी-विष्णू प्रतिमा विलास.

---

**ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी निवड झाल्याचा आनंद आहे. हल्लीची पिढी समकालीन साहित्याकडे गांभीर्याने बघत नसताना लोकसाहित्याकडे कधी बघणार, हा प्रश्न असला, तरी लोकसाहित्यात संशोधनाचे काम करणाऱ्या ताराबाईंसारख्या व्यक्तीचा मोठा सन्मान होतो तेव्हा या क्षेत्राबद्दल जाणून घेणाऱ्यांची संख्या वाढेल, अशी आशा वाटते.**

# लोकसंस्कृतीचा तारा लकाकत राहावा



सन्मान

**डॉ. सदानंद मोरे**

२०२४ हे वर्ष महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. याचे कारण म्हणजे हे वर्ष अनेक महत्त्वपूर्ण घटनांचे साक्षीदार राहिले आहे. अलिकडच्या काळात घडणाऱ्या अनेक घटना दीर्घकाळाची प्रतीक्षा संपवणाऱ्या आणि जनांना सुखावणाऱ्या आहेत. अलिकडेच आपण अत्यंत आनंदाने साजरा केलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा ही यातीलच एक घटना. नेहमीप्रमाणे यंदाही हा समारंभ उत्साहात पार पडला आणि या निमित्ताने राजांच्या आयुष्यातील सोनेरी दिवसाच्या आठवणी जागवल्या गेल्या. एका अर्थी आपणही तो दिवस जगलो. एकीकडे असे असताना याच वर्षी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जाही प्राप्त झाला. हीदेखील महत्त्वाची घटना म्हणावी लागेल. कारण शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला तेव्हा लगेचच त्यांनी हाती घेतलेले काम भाषेच्या संदर्भातील होते. त्यांनी राज्यव्यवहार कोश तयार केला आणि त्यामध्ये रूढ असणाऱ्या पर्शियन शब्दांना मराठी शब्द योजता येतील, अशी सोय केली. हे मराठी शब्द राजकीय, प्रशासकीय पत्रव्यवहारात वापरण्याजोगे होते. त्यामुळे मराठी भाषेची अभिजातता मान्य होण्याची आणि तिला हा दर्जा मिळण्याची बाब आपण शिवाजी महाराजांच्या कर्तबगारीशी समांतर वा पूरक मानू शकतो. भाषिक सुराज्याचीही तेवढीच गरज असते.

आपण बघतो की, १८ व्या शतकात मराठ्यांनी दिल्ली पूर्णपणे आपल्या हातात ठेवली होती. तेव्हाचे तिथले मुघल सत्ताधीश नामधारी होते. प्रत्यक्ष कारभार मराठ्यांकडेच होता. थोडक्यात, त्या काळात आपण दिल्लीचे पालक होतो. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५४ मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीमध्ये साहित्य संमेलन आयोजित झाले होते. त्याचे उद्घाटनपर भाषण स्वतः पं. जवाहरलाल नेहरू यांनी केले होते तर स्वागताध्यक्ष काकासाहेब गाडगीळ होते. आता तशाच प्रकारचा इतिहास पुन्हा एकदा अनुभवायला मिळत असल्याचा आनंद आहे. कारण दिल्लीत पार पडणाऱ्या या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ लेखिका ताराबाई भवाळकर असणार आहेत. खरे पाहता तारा भवाळकर यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल हव्या त्या प्रमाणात घेतली गेलेली नाही, हे सत्य आहे. मात्र आता उशिरा का होईना, ती घेतली जात असल्याचे समाधान वाटते. ताराबाई भवाळकर लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकभाषा यांच्या अभ्यासक आहेत. दुसरीकडे हेही लक्षात घ्यायला हवे की, आपली राज्यव्यवस्था ही लोकशाही व्यवस्था आहे आणि दिल्ली लोकशाहीच्या केंद्रस्थानी आहे. त्यामुळेच अशा ठिकाणी पार पडणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी एका लोकसंस्कृतीच्या अभ्यासकाला स्थान मिळणे मी अत्यंत उचित मानतो. ताराबाईंचा गाढा अभ्यास असणाऱ्या लोकसाहित्याबद्दल बोलायचे तर, याचे काही ठरलेले नियम नसतात. लोकसाहित्य उत्स्फूर्त असते. कोणीही त्याचे व्याकरण लिहिलेले नाही. कोणी शास्त्र म्हणून ते पुढे आणलेले नाही. कारण शास्त्र आले की सगळे बंदिस्त होते. त्यामुळेच शास्त्रामध्ये बघायला मिळणारी थिअरी, चौकट लोकसाहित्याला नसते. खरे तर ही या साहित्य प्रकारासंदर्भात मला भावणारी सर्वात महत्त्वाची बाब आहे. यात आपल्या आयाबायांनी केलेल्या ओव्यांसह अनेक साहित्य प्रकारांचा समावेश होतो. त्या वेळच्या त्या मायाबहिणींना कोणतेही व्याकरण माहिती नव्हते. काव्य रचताना आपण कोणता अलंकार वापरत आहोत, याची जाण नव्हती. त्यांनी उत्स्फूर्तपणे येणाऱ्या अनुभवांमध्ये व्यक्त होण्याच्या ऊर्मीमधून लोकसाहित्य निर्माण केले आणि पुढे त्याचाच अभ्यास होत राहिला. आजही हा अभ्यास करणाऱ्यांची संख्या अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी आहे. दुर्गा भागवत, सरोजिनी बाबर ही नावे यासंदर्भात पुढे येतात. मधल्या काळात रा. चिं. ढेरे यांनी खूप मोठे काम केले. प्रभाकर मांडे यांनीही या संदर्भात नोंद घेण्याजोगे काम करून ठेवले आहे. अशांच्या मांदियाळीत अग्रस्थानी असणारे एक नाव म्हणजे ताराबाई भवाळकर. त्यामुळेच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्या विराजमान होणे हा केवळ त्यांचाच नव्हे तर लोकसाहित्याचा आणि त्याचा अभ्यास करणाऱ्या सर्व धुरिणांचा गौरव आहे, असे मी मानतो. त्या या सगळ्यांचेच प्रतिनिधित्व करत असल्याची भावना माझ्या मनात आहे. दुर्गाबाईंनंतर इतक्या वर्षानंतर हा योग येणे, ही बाबही विशेषत्वाने लक्षात घेण्याजोगी आहे. कऱ्हाडच्या संमेलनामध्ये दुर्गाबाई अध्यक्ष होत्या. त्यानंतर ५० वर्षांनी पुन्हा एकदा लोकसाहित्याच्या अभ्यासकाला हा बहुमान मिळत आहे. म्हणूनच या सुंदर योगाचे स्वागत करायला हवे. आत्ताची परिस्थिती आधीपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. अर्थात त्यावर टीका करण्याचा अजिबात उद्देश नाही. कधीही जातं न पाहिलेल्या या पिढीला घरातील स्त्रिया पहाटे उठून जात्यावर दळत असल्याचे सांगितले तर अनाकलनीय, अविश्वसनीय वाटण्याची शक्यताच अधिक आहे. मात्र लोकसाहित्यात संशोधनाचे काम करणाऱ्या ताराबाईंसारख्या व्यक्तीचा इतका सन्मान होतो, तेव्हा या निमित्ताने त्या क्षेत्राबद्दल जाणून घेण्याची, वाचन करण्याची शक्यता वाढते. यातून लोकांची या प्रती जाण वाढू शकते. असे झाले आणि काही जणांची पावले या विषयाकडे वळली तरी ती फार मोठी उपलब्धी असेल.

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# मत्सर: यशात अडसर!

१) मत्सर व स्वार्थ या नकारात्मक भावनांमुळे दशरथ राजाची तिसरी पत्नी कैकेयी आपल्या पतीला, मुलांना, सन्मान आणि सर्व सुखांना गमावून बसली.

२) पांडवांचे वडील राजा पंडू यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी कुंती आपल्या पाचही पुत्रांना घेऊन हस्तिनापुरात पोचली. पांडवांच्या हातात राज्य जाऊ नये म्हणून शकुनी मामाने दुर्योधनाच्या मनात पांडवांविषयी वैरभाव निर्माण केला. बालपणापासूनच दुर्योधनाला भीमाच्या शारीरिक शक्तीचा हेवा वाटायचा. भीमाचा कसा काटा काढता येईल यासाठी सतत विचार करत राहायचा. एकदा भीमाला खीर आवडते म्हणून खूप खीर बनवली व नंतर त्यात विष मिसळले. त्याला वाटले ती खीर प्यायल्यावर भीम गतप्राण होईल. दुर्योधनाच्या सापळ्यात भीम अडकला. त्याने खरोखरच ती विष मिसळलेली खीर पिऊन टाकली व तो बेशुद्ध झाला. भीम मेला असे समजून दुर्योधनाने शकुनी मामांच्या मदतीने भीमाला तळ्यात टाकले.



इकडे तळाशी गेल्यावर भीम नागलोकात पोहोचला. तिथे नागलोकांचा राजा तक्षकाने भीमाला मदत केल्यामुळे भीमाच्या शरीरात १० हजार हत्तींचे बळ प्राप्त झाले. याप्रकारे दुर्योधनाने भीमाच्या शक्तीबद्दल मत्सर केल्यामुळे भीमाचा जीव न जाता उलट त्याची शक्ती वाढली. पुढे याच मत्सराच्या, स्वार्थाच्या व दुराभिमानाच्या प्रभावाने दुर्योधनाने आपले ९९ भाऊ, साम्राज्य आणि शेवटी आपला जीव गमावला.

३) एक अतिशय चांगल्या सुसंस्कृत घरातील बीएससीच्या शेवटच्या वर्षात शिकणारी मुलगी नीता माझ्याकडे कौन्सेलिंगसाठी आली. तिचे वडील डॉक्टर तर आई गृहिणी आहे. वडील सतत आपल्या वैद्यकीय व्यावसायात व्यस्त असल्यामुळे नीताकडे जास्त लक्ष देऊ शकत नव्हते. छोटा भाऊ पाच वर्षांनी लहान तेव्हा त्याच्याकडून तिला काही जास्त आधाराची अपेक्षा नव्हती. तिची प्रमुख तक्रार ही होती की, मला माझा आत्मविश्वास वाढवायचा आहे. तिच्या आग्रहाने तिच्या सगळ्या करीअर कौन्सेलिंगच्या टेस्ट केल्यात.

सगळ्या टेस्टमध्ये चांगले गुण मिळालेत. तिचा आयक्यू चांगला म्हणजे १२८ आहे. ती मोठी वैज्ञानिक किंवा वडिलांसारखी होऊ शकेल, अशी तिची क्षमता आहे. परंतु, सगळे काही चांगले असूनही नीताचा आत्मविश्वास कमी होता. तिच्या अपेक्षेनुसार तिला चांगले गुण मिळत नव्हते. ती जपानी बोन्साय प्लांटसारखी स्वत:चीच वाढ खुंटवलेली, प्रगती स्वत:नेच थांबवलेली अशी वाटत होती. तशी ती सगळ्यांशी छान हसून, मिळून-मिसळून वागत होती. पण तिचे स्वत:शीच मनाच्या आतल्या आत युद्ध सुरू होते, हे मला स्पष्ट लक्षात येत होते. तरीही ती बोलून पूर्ण मोकळी होत नव्हती. मग तिच्याशी बोलताना मानसशास्त्रीय साधने वापरलीत तेव्हा सत्य बाहेर आले. नीताच्याच वयाची तिची एक वर्ग मैत्रीण आहे. त्या मैत्रिणीचे आईवडील दोघेही ती लहान असतानाच एका अपघातात देवाघरी गेले. ती मैत्रीण व तिची मोठी बहीण दोघीही त्यांच्या मामाच्या घरीच, गरिबीत लहानाच्या मोठ्या झाल्यात.

घरची गरिबी व आईवडील दोघेही नसल्यामुळे त्या मैत्रिणीला जबाबदारीची चांगली जाण आहे. त्यामुळेच तिने तिचा व्यक्तिमत्त्व विकास चांगला घडवला. शाळेत आणि नंतर कॉलेजात कुठल्याही शिक्षकाने 'तुला अमुक करता येईल का?' असे विचारले तर येत नसले, तरी 'मला येत नाही' असे ती कधीच म्हणत नाही. 'मी करते, तुम्ही सांगा' असे म्हणून वादविवाद स्पर्धा, नृत्य स्पर्धा, गायन, निबंध लेखन, अभिनय अशा सगळ्याच प्रकारच्या स्पर्धेत किंवा कार्यात भाग घेत राहिली व एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व तयार झाले. मात्र, माझ्याकडे आलेली नीता घरी सगळ्या सोयी असूनही या सगळ्या बाबतीत मागेच राहिली. कारण सुरुवातीला अनेकांना सतावणारी समस्या म्हणजे स्टेजवर जाऊन बोलायची भीती.

या भीतीमुळे नीता नेहमी मागेच राहिली. काही दिवसांनी नीताला तिच्या गरीब मैत्रिणीच्या गुणांचा हेवा वाटू लागला. तिचे कुणी कौतुक केले की, नीताला मैत्रिणीचा व तिची तारीफ करणाऱ्यांचा राग येऊ लागला. तिने हळूहळू अष्टपैलू मैत्रिणीशी बोलणे कमी केले.

नीताच्या मनात नकारात्मक भावना वाढू लागल्या. तिच्या आईने नीताला समजवायचा प्रयत्न केला, पण उपयोग झाला नाही. आता फक्त न्यूनगंड मनात न राहता, सोबतीला इतरही नकारात्मक भावना दाटू लागल्या. फक्त मैत्रिणीला टाळणे एवढेच त्याचे स्वरूप न राहता त्यात आपली बाजू मांडण्यासाठी खोटे बोलणे, लोक काय म्हणतील याला जास्त महत्त्व देऊन अनेक गोष्टीत दिखाऊपणा वाढला. आपले कसे छान चालले आहे हे उगाच लोकांना पटविण्याचा प्रयत्न सुरू झाला.

छोट्या-छोट्या गोष्टीत खोटे बोलण्याचे प्रमाण वाढले. त्याचवेळी आपण करतो ते अयोग्य आहे, याची पूर्ण जाणीव असल्यामुळे मनावर ताण वाढला. एकांतात बसून मोबाईलवर जास्त वेळ खर्च होऊ लागला. आईशी बोलताना तोल सुटू लागला. चीडचीड वाढली. शरीराची वाढ खुंटली. डोळ्याभोवती काळी वर्तुळे मोठी होऊ लागली. कारण झोपेचे असंतुलन वाढले, खाण्याच्या सवयी बिघडल्या. चेहऱ्यावरील तेज लुप्त झाले. आत्मविश्वास ढासळला आणि अशा परिस्थितीत तिला माझ्याकडे आणण्यात आले. मुळात कारण काय होते? नीताची अष्टपैलू मैत्रीण नेहमी सोबत असताना लोक नेहमी त्या दोघींमध्ये तुलना करायचे. दोघी सोबत असूनही लोक नीताशी कमी, पण तिच्या मैत्रिणीशीच जास्त बोलायचे. या घटना वारंवार घडत राहिल्यामुळे शेवटी नीता निराशावादी होऊन मत्सर करू लागली.

नीताने काय करायला हवे होते? नीताने एक तर आपले मन ज्यांच्यावर तिचा विश्वास आहे, त्यांच्याशी बोलून मोकळे करायला हवे होते किंवा सायकोलॉजिस्टकडे जायला हवे होते. पण तिने तसे न करता ती आतल्या आत आक्रसत गेली. आधी मत्सर भावनेची शिकार होऊन नंतर मनोरुग्ण बनली. आता तिने चुका सुधारल्याने ती प्रगतिपथावर आहे.

मत्सराचे मूळ कारण असुरक्षितता हे आहे. मत्सर ही एक नकारात्मक भावना आहे. मत्सर म्हणजे द्वेष, जळाऊ वृत्ती, दुसऱ्याची भरभराट, प्रगती सहन न होणे (ईर्ष्या, जलन). एखाद्याचा आनंद किंवा क्षमता पाहण्यास सक्षम नसणे. ज्याला इतरांचे सुख पाहून मत्सर होतो, हेवा वाटतो. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या सहा भावनांना 'षड्रिपू' (सहा शत्रू) असे म्हणतात.

आपल्याला कुणी अपेक्षित मान दिला नाही किंवा आपल्याकडे दुर्लक्ष केले तर आपला अहंकार दुखावतो. त्यानंतर तुमच्या स्वभावानुसार तुम्ही त्या परिस्थितीत प्रतिक्रिया देता. कुणी शांत व आत्मकेंद्रित होतो तर कुणाला राग येतो. याप्रमाणे भीती, राग, लोभ, मत्सर, भ्रष्टाचार, खोटेपणा, पळपुटेपणा, दुष्टपणा, भ्रम, लाचारी, अपराधीपणाची भावना, अपूर्णतेची भावना, भविष्याची चिंता, असहाय्य वाटणे अशा कुठल्याही भावनेच्या किंवा नकारात्मक विचारांच्या सापळ्यात व्यक्ती अडकू शकते.

**मत्सराच्या भावनेचे नातेसंबंधांवर होणारे दुष्परिणाम :**

**१. विश्वास गमावणे :** मनातील मत्सराच्या भावनेमुळे आपल्या चेहऱ्यावर व देहबोलीवर त्याचा लोकांना सहज लक्षात येईल, असा स्पष्ट परिणाम होतो. त्यामुळे तुम्ही काहीही बोललात तरी लोक त्यावर विश्वास ठेवत नाहीत. त्यांना तुमच्यासोबत असुरक्षित वाटू लागतं. २. वादविवाद वाढतात : आपसात वादविवाद वाढून नातेसंबंध दुरावतात. ३. आपसातील ओढ व प्रेम कमी होते. ४. मालकी हक्क गाजवणारी, सगळे माझ्याच नियंत्रणात हवे, अशी भावना वाढून नातेसंबंध खराब होतात. खरे तर कुणालाच लादलेली बंधनं नको असतात. त्यामुळे मत्सरी व्यक्ती आपला हुकूम किंवा हक्क गाजवायचा प्रयत्न करायला लागल्यावर, जवळची प्रेमाची मंडळी नाराज होतात. ५. वरील प्रकारे नकारात्मक अनुभव वाढल्यावर व्यक्ती निराशेकडे झुकते.

६. नातेसंबंधात संशयी वृत्ती वाढून कुटुंबातील संबंध विभक्त होण्याकडे बळावतात.

७. मनातील नकारात्मकता प्रचंड वाढून व्यक्ती वेडेचाळे करू लागते. प्रत्येक गोष्टीवर अतिशय आक्रमकतेने प्रतिक्रिया देऊ लागते.

८. बदला घेण्याची प्रवृत्ती तयार होऊन विवाहबाह्य संबंध स्थापित करायचा प्रयत्न करू लागते.

९. मनातील असुरक्षितता खूपच वाढल्यास गुन्हा घडण्याची शक्यता बळावते. मानसशास्त्रात संशोधन करणाऱ्यांच्या मते, मनात कुणाविषयी मत्सर बाळगणारी व्यक्ती एकाच नव्हे तर अनेक पद्धतीने आपल्या मनातील मत्सराची भावना प्रकट करते. एखादे वेळेस मनात एकनिष्ठता असूनही आपल्या मित्राला, नवऱ्याला किंवा पत्नीला 'जळवण्यासाठी' म्हणजे स्पर्धात्मक भावना तयार करण्यासाठी तिसऱ्या व्यक्तीशी जवळीक किंवा दोस्तीचे खोटे नाटकही करू शकते.

१०. जे आपल्या जवळ आहे त्याचे रक्षण करण्यासाठी असुरक्षितता बळावल्यामुळे व्यक्ती मत्सर भावनेची शिकार होऊ शकते.

११. एखाद्या व्यक्तीच्या प्रेमासाठी, प्राप्तीसाठी, पैशाच्या उत्पन्नासाठी आपण जास्त लायक आहोत, श्रेष्ठ आहोत ही भावना तीव्रतेने असूनही तुलनेने आपल्यापेक्षा सर्व दृष्टीने कनिष्ठ व्यक्तीला उत्तम बायको, नवरा, नोकरी, पैसा, संपत्ती, कार, घर वगैरे मिळाल्यास व्यक्ती मत्सराने नकारात्मक विचार करू लागते.


१२. आपले सगळे काही चांगले असूनही अपेक्षित यश न मिळाल्यास व्यक्ती कारस्थानी किंवा नकारात्मक व्यक्ती बनू शकते किंवा स्वत:ला दोषी मानून न्यूनगंडाची, निराशेची शिकार होऊ शकते.

१३. अनेक दिवस, आठवडे, महिने अशी नकारात्मकता मनात साठत गेल्यास मनोकायिक रोग म्हणजे सायकोसोमॅटिक रोगाची रुग्ण होऊ शकते. उदा. डायबेटीस, अस्थमा, हाय ब्लड प्रेशर, व्हेरिकोज व्हेन्स, हायपर ॲसिडिटी, हृदय रोग इत्यादी.

१४. या नष्टचक्रात अडकल्यावर दैनंदिन जीवन अतिशय अनियंत्रित व अनियमित होऊन प्रगती खुंटते. व्यक्तिमत्त्व विकास थांबतो. यशाच्या मार्गात अडसर तयार होऊन अपयशाचा वेळोवेळी सामना करावा लागतो.

**मत्सर व असुरक्षिततेच्या त्रासातून मुक्त होण्यासाठी हे करा :**

१: स्वपरीक्षण करून आपले चांगले व वाईट गुण आणि सवयी कोणत्या ते समजून घ्या. ध्येयावर लक्ष केंद्रित करा.
२: तुमच्या सकारात्मक गुणांवर लक्ष केंद्रित करा.
३: यशस्वी लोकांच्या उदाहरणाचे अनुसरण करा.
४: मागील चुकांबद्दल स्वत:ला माफ करा.
५: आपले ज्ञान, विविध कौशल्ये तपासून विकसित करा.
६: भरपूर विश्रांती आणि संतुलित आहार मिळवा.
७: कार्यकौशल्ये हेच आपले सर्वोत्तम मित्र बनवा.
८: निरोगी सवयी, प्रतिभा जागती ठेवा, आध्यात्मिक उन्नती करा.
९: योगाभ्यास करा, व्यायाम करा आणि शारीरिकदृष्ट्या फिट व्हा.
१०: नवीन गोष्टी शिका आणि चांगले मित्र मिळवा.
११: आपले वैयक्तिक संबंध सुधारण्यासाठी नीट लक्ष द्या. त्यासाठी मी-माझे एवढाच विचार न करता इतरांसाठी वेळ, श्रम, पैसा खर्च करा. समाजसेवा करा.
१२: चांगले कपडे घाला! इतरांचे चांगले गुण व कार्य याचे मनापासून कौतुक करा. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत)



## जाणेल तो नर । संत जीवा ।।

तुझे रूपी मज । येतसे प्रचिती ।।
कळू येते प्रीति । अमूर्तीचि ।।१।।

दिव्य तेज दिसे । शब्दातीत असे ।।
अंतरात वसे । भाव रूप ।।२।।

अनुभूती घ्यावी । ज्याची त्याने जाणा ।।
अरे मेल्यावीना । स्वर्ग कैसा? ।।३।।

वात्सल्याची मूर्ती । असता सामोरी ।।
शोधी दारोदारी । देव कोठे? ।।४।।

सगुणात वसे । निर्गुण ईश्वर ।।
जाणेल तो नर । संत जीवा ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## सुखी राहू दे...

परख जाणिवांची मुकी राहू दे जखमांची खिपली ही
सुकी राहू दे असेलही नशा ही खोटी जराशी कसे की
मनाला सुखी राहू दे......
चिंता, निराशा शिळी राहू दे दुःखात धीराची शिडी राहू
दे संपेल सारे या सत्यात थोडी नवनिर्मितीची खुमखुमी
राहू कसे की मनाला सुखी राहू दे......
ते सलणे जुन्याचे उगी राहू दे उद्याला आताचे ऋणी
राहू दे की नि:श्वास वाटो इतुका सुटा हर श्वासात
उभारी नवी राहू दे कसे की मनाला सुखी राहू दे......
हवेसे सोडण्याची सहजी राहू दे नकोसे झेलण्याची खुबी
राहू दे स्वप्निल उत्कट बहर भावनांचा सदाचा असा हा
गुलाबी राहू दे कसे की मनाला सुखी राहू दे......
काही नसण्यासही स्वीकृती राहू दे तशी असण्यातली
खुमारी राहू दे धागे दिलांचे जुळावे असे की जिंदगानी
सदा हवीशी राहू दे कसे की मनाला सुखी राहू दे......

धनश्री धारकर

## कास्तकार बाप

विजांचं थैमान, फाटलं आभाळ कोसळतो
काळ वावरात...
समदंच गेलं आलेलं हातात भिजलं शेतात सोयाबीन...
कास्तकार बाप, कपायाले हात पुन्हा संकटात सापडला...
कोसळे तुफान, परतीचा पाणी चालू
मनमानी निसर्गाची...
एका पाठोपाठ, किती हे संकटे पदोपदी काटे पेरलेले...
नेहमीची दैना हातावर यास चिंता बारोमास दावणीले...
होईल रे कधी, बापाची सुटका मिळेल कुटका पोटभर...
काल बाप म्हणे, संपवतो त्रास घेतो
अता श्वास अखेरचा...

दादाराव अवचार

परराष्ट्रकारण
प्रसन्न आठवले
भ्र. ९०४९३५३८०९

# जागतिक अर्थकारण राजकारण आणि ब्रिक्स

**२२ ते २४ ऑक्टोबर, या तीन दिवसात कझान येथे रशियाच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्सची १६वी शिखर परिषद झाली. मूळ संघटनेतील पाच मुख्य देश ब्राझील रशिया इंडिया चीन आणि साऊथ आफ्रिका या व्यतिरिक्त ब्रिक्सची व्याप्ती, या शिखर परिषदेत वाढली आहे. जवळपास १० देश या मधे सामील झाले होते. लवकरच या संघटनेचा विस्तार वाढेल आणि थोड्याच अवधीत ४० देश या मधे सदस्य होतील. त्या अनुषंगाने एकूण जागतिक अर्थकारण राजकारण यावर जरा विचार करूया म्हणून आलेख लिहीत आहे**

दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर संपूर्ण जगताची विभागणी एकत्रित रशिया आणि अमेरिका या दोन गटात झाली. यामध्ये काही देश विकासाचा विचार करून, काही देश शक्तीने आणि काही देश इतर अनेक कारणांनी ओढले गेले आणि या दोन गटात आवश्यकता आणि नाईलाज यामुळे बांधले गेले. रशियाच्या मागे त्यावेळी कम्युनिस्ट राजवट असलेले बरेच देश यामध्ये होते. अमेरिकेच्या बाजूने युरोप मधील बहुतांश देश दक्षिण अमेरिका आफ्रिका व आशियातील देश वेगवेगळ्या कारणाने सोबत गेले.

जागतिक मंदी, पेट्रोल, विकासाची संसाधनं, शस्त्रास्त्र, पतपुरवठा हे मुख्य घटक प्रभावी होते. त्यावेळी, बऱ्याच राष्ट्रांना एखाद्या संपन्न राष्ट्राशी जोडून, आपल्या देशाचा आर्थिक गाडा हाकावा, यासाठी दोन महासत्तांपैकी कुठल्याही एखाद्या सत्तेला जवळ करून राहणं, हे अनिवार्य होतं. यामध्ये तटस्थ राष्ट्र परिषद, भारताने काही समविचारी देशांच्या मदतीने, निर्माण केली. काही देशांच्या पुढाकाराने एक चळवळ म्हणून चालवली गेली. पण तरीही भारत हा, मुख्यतः रशिया आणि चीन या दोन देशांच्या सोबत राहिला. १९६२ युद्धानंतर भारत मुख्यतः विस्तारवादी, आक्रमक, कुरापतखोर चीनला वचकून २०१३ पर्यंत कधी विरोधात फार गेला नाही. अर्थातच त्यामुळे अमेरिका आणि त्याच्या अधिपत्या खाली अनेक राष्ट्रांशी, आपले असलेले संबंध फारसे उत्तम राहिले नाहीत. आपल्या राजकीय परिस्थिती मुळे आणि सुरुवातीच्या काळातील नेहरूंच्या बोटचेपे व चीन प्रेमी धोरणामुळे भारताला संयुक्त राष्ट्राचं स्थायी सदस्यत्व गमवावं लागले. याचा खूप मोठा फटका भारताला आर्थिक आणि जागतिक राजकारणात सहन करावा लागला, हे निर्विवाद सत्य आहे आणि ते नाकारून चालणार नाही. साधारण ९० च्या दशकात लोकसंख्येच्या जोरावर भारत जगात दुसऱ्या स्थानावर होता आणि इथल्या लोकसंख्येच्या आधारावर अस्तित्वात असलेल्या एका मोठ्या बाजारपेठेत शिरकाव करता यावा यासाठी, भारताच्या परराष्ट्र धोरण आणि आर्थिक धोरण यामध्ये, जागतिकीकरणाचा शिरकाव झाला. साधारण १९९१ पासून ग्लोबलायझेशन अर्थात जागतिकीकरण हे स्वीकारलं. त्याचा लाभ घेऊन, अनेक जागतिक कंपन्या भारतात आल्या. काँग्रेसने त्यांना हळूहळू सढळ हात देऊन, इथल्या उद्योगांची वाट लावायला सुरुवात केली होती. बाहेरील देशातून परकीय गुंतवणूक यायला साधारण दहा वर्ष झाली आणि भारतातील या प्रचंड बाजारपेठेसाठी भारताची राजकीय आणि आर्थिक शक्ती आपल्या हातात असावी यासाठी, अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रांनी प्रयत्न सुरू केले. दुसऱ्या महायुद्धानंतर असलेली राजकीय दादागिरी करून, एकप्रकारे अमेरिका आणि संयुक्त रशिया या दोन देशांनी संपूर्ण जगाला आपल्या तालावर नाचवण्यास सुरुवात केली. जगात दोन देशात कोणत्याही प्रकारचा व्यापार झाला की त्याची देवाण-घेवाण डॉलरच्या माध्यमातून होईल, याची व्यवस्था अमेरिकेने निर्माण केली. याचा लाभ घेता यावा आणि ही अपरिहार्य स्थिती अशीच कायमस्वरूपी राहावी यासाठी डॉलरला पेट्रोलशी जोडून, सर्वच्या सर्व व्यवहार आपल्या आर्थिक लाभासाठी होतील, याची तरतूद केली.

साधारण १९४५ पासून आता आतापर्यंत ही यावस्था बिनबोभाट सुरू होती. रशिया चीन यासारख्या बड्या राष्ट्रांना यातून बाहेर पडण्याची, डॉलरच्या अपरिहार्यतेला कमी करण्याची आणि अमेरिकन वर्चस्व कमी करण्याची आवश्यकता वाटत होती. तशी त्यांची दुर्दम्य इच्छा होती. पण मार्ग व योग्य वेळ येत नव्हती. या सर्वात भारत हा तटस्थ या सुप्रसिद्ध धोरणामुळे, हेलकावे खात होता.

२००० साल उजाडताना भारताची बाजारपेठ म्हणून गरज, अनेक विकसित राष्ट्रांना भासायला किंवा दिसायला लागली. पण त्यावेळी असलेल्या वाजपेयी सरकारच्या धोरणांमुळे या देशाची हवी तशी लूट करता येत नव्हती. म्हणूनच ते सरकार जाणं गरजेचं होतं. त्यासाठी त्यावेळी माहीत नसलेल्या नरेटिव्ह या अस्त्राचा वापर करून घेण्यात आला. त्यावेळी अस्तित्वात असलेल्या मीडियाला हाताशी धरून शायनिंग इंडिया या भाजपाच्या जाहिरातीचा अतिरेकी वापर करून, जनमत फिरवण्यात, काँगी आणि त्यांचे सहाय्यक डीप स्टेट यांना यश आलं. वाजपेयी सरकार गेलं आणि नंतरच्या दहा वर्षात अनेक घोटाळ्यांचा चढता आलेख या देशाने पाहिला. जनतेचा पैसा अक्षरशः ओरबाडून वाटून घेण्यात आला. भारताच्या परराष्ट्र धोरणाची पार वाताहत झाली. पाक बांगलादेश सारखी राष्ट्र सहजी भारतीय सैन्याला सळो की पळो करू शकत होते. चीन तर बाजारपेठेच्या माध्यमातून भारताचे लचके तोडत होताच पण पाकिस्तानसुद्धा, अतिरेकी कारवाया करून, अंतर्गत सुरक्षा ध्वस्त करत होता. म्हणजे एक पद्धतशीर खेळी सुरू होती, हे आज




जाणवतं. त्याचबरोबर हे देखील जाणवतं की, जर २०१४ मधे सत्ता बदल झाला नसता तर, आज गज्वाचं स्वप्न खूप प्रमाणात आणि सहजी साध्य होताना बघावं लागलं असतं. या सत्ता बदलाबरोबर परराष्ट्र निती, संरक्षण धोरण यामधे जमीन आसमान इतका बदल घडला. स्वतः मोदीजी, आधी सुषमा स्वराज, त्यानंतर आता एस जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, यांनी ७० वर्षातील सर्व चुका, त्रुटी आणि भारताच्या स्वाभिमानाची झालेली पायमल्ली थांबवून, त्यात राष्ट्रहित आणि चाणक्यनीती यांचा अवलंब केला. गेल्या दहा वर्षात कूटनीती, अनेक राजकीय डावपेच टाकत सर्वप्रथम, आपल्या दोन जालीम शत्रू असलेल्या पाक व चीन यांना जरब बसवली. हे सुरू असताना, पाकला आंतरराष्ट्रीय पातळीवर पूर्ण एकटं पाडलं. यासाठी मोदींनी शेकड्याने केलेले विदेश दौरे, किती फलदायी झाले, याची प्रचिती आज पाक कटोरा घेऊन फिरत आहे, त्यामधून येते. २०१६ साली नोटाबंदी करून, भारताने पाकचं आर्थिक कंबरडं मोडून, पुढील ६ ते ७ वर्षात पाकला भिकारी राष्ट्र हा किताब मिळवून दिला. त्याचबरोबर हे देखील सिद्ध झालं की, काँग्रेसने १९४७ पासून पद्धतशीरपणे पाकला आर्थिक रसद पुरवून, आपल्याच जनतेच्या पैशावर इथे दहशतवाद जोपासून घेतला. सुरक्षेच्या नावाखाली अब्जावधी रुपयांचा निधी सहज लपेटला जात होता. तोच प्रश्न काश्मीर बद्दल. तिथे ३७० कलम ठेवण्यात कोणाचा लाभ होता, हे आज ५ वर्षानंतर आपोआप दृष्टोत्पत्तीस आलं आणि काश्मिरच्या जनतेने सुद्धा बघितलं. विस्थापित काश्मिरी पंडितांना पुन्हा घाटीत त्यांची स्थावर मालमत्ता परत मिळवून देण्यात येत असलेलं यश, हे ३७० हद्दपार झाल्यामुळे साध्य झालं. गेल्या दहा वर्षात अजून एक गोष्ट मोदींनी घडवून आणली, ती म्हणजे तुर्कस्थान, पाकिस्तान आणि डीप स्टेट सोडून बाकी कोणत्याही मोठ्या व छोट्या देशाने भारताच्या कोणत्याही अंतर्गत बाबीत कधीही काहीही विरुद्ध किंवा चुकीची मतं मांडली नाहीत. ही आजपर्यंतची मोदींची सर्वात मोठी उपलब्ध आहे. भारताच्या स्वयंसिद्ध, स्वाभिमानी आत्मनिर्भर अंतर्गत आणि परराष्ट्र धोरणाच्या जोरावर, आपल्या प्रचंड आर्थिक विकासाच्या जोरावर आणि आपल्या येथील मोठ्या बाजारपेठेचा लाभ उठवत त्या जोरावर , भारताने आर्थिक बाबतीत पाचव्या स्थानावर मजल मारली आहे. आंतरराष्ट्रीय राजकीय पटलावर अर्थात जिओ पॉलिटिक्समध्ये भारताला एक दमदार देश म्हणून आज पाहिलं जातय. एक काळ असा होता की, अमेरिका किंवा रशिया, भारताची परराष्ट्र व अंतर्गत नीती ठरवत असत. या स्थिती वरून आज भारत संयुक्त राष्ट्र या संस्थेला आव्हान देणाऱ्या तीन प्रमुख राष्ट्रात गणला जात आहे, या उच्च स्थानी आला आहे आणि देशाला या स्थानी मात्र दहा वर्षात मोदी आणि त्यांच्या संघाने आणलं आहे.

एक आजच गोष्ट मुद्दाम सांगतो की ज्याप्रमाणे १९४५ ते १९५० चा काळ, अमेरिका व युरोप यांनी आपल्यासाठी आखून घेतला आणि पुढील ७०, ७५ वर्ष, त्या आधारावर जगातील दादा देश म्हणून सर्व जागतिक धोरणं, इतर देशांची निती, तिथले नेते इत्यादी बाबींमध्ये आपली दादागिरी चालवली, त्याप्रमाणे २०२५ ते २०३० ही पाच वर्षे रशिया आणि भारत मिळून नवीन आंतरराष्ट्रीय संघटना, जगाची दिशा, अनेक राष्ट्रांची परराष्ट्र आणि पतधोरणं, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या ठरवतील. त्याची झलक ब्रिक्सच्या १६ व्या शिखर परिषदेत जगाला दिसलं. म्हणजेच पुढील ७५ वर्ष ही रशिया आणि भारत यांची असतील, यात शंका नाही. सध्या यामधे मी चीनला धरत नाही. कारण तो बेभरवशाचा साथीदार आहे.

(पान ६ वर)

बाळ सिताराम मर्ढेकर यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील मर्ढे या गावी १ डिसेंबर १९०९ रोजी झाला. बा. सी. मर्ढेकर हे नवकवितेचे जनक म्हणून ओळखले जातात. काही कविता, आणखी काही कविता, शिशिरागम हे त्यांचे कविता संग्रह आणि याच सर्व कविता एकत्रित करून मर्ढेकरांची कविता या नावाच्या त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. मर्ढेकरांनी कादंबरी, नाट्य आणि समीक्षा लेखनही केलेले आहे. सौंदर्य आणि साहित्य या त्यांच्या १९५५ मध्ये प्रकाशित झालेल्या समीक्षा लेख संग्रहाला १९५६ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार सुद्धा मिळाला आहे.

# 'सौंदर्य आणि साहित्य' मधील भाषिक सौंदर्य आणि समीक्षा

साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

मर्ढेकरांचे समीक्षा लेखन साहित्याचे सिद्धांत, सौंदर्य आणि त्यातील लालित्यपूर्ण बाबींवर भाष्य करणारे असते. सौंदर्य आणि साहित्य यामध्ये सौंदर्य या भागामध्ये साहित्यातील सौंदर्य आणि साहित्य या भागामध्ये साहित्यातील नाविन्य, साहित्य कृतींचा घाट, त्यांची महात्मता यासह गंगाधर गाडगीळ, राक्षस विवाह, व्याधाची चांदणी या बाबींवर समीक्षात्मक भाष्य करत आपली मते मांडली आहेत.


सौंदर्य भावना म्हणजे काय या लेखामध्ये मराठी पण म्हणतात की, 'कुठल्याही भावनेचे अधिष्ठान परिस्थितीच्या ज्ञानावर असते, पण सभोवतालच्या परिस्थितीचे नुसत्या इंद्रिय संवेदनाच्या साह्याने होत नाही. ज्ञानाच्या मुळाशी इंद्रिय संवेदना गरजेची असली तरी ज्ञान संवेदना, स्मृती, कल्पना, तर्क आणि विचार यांनी अर्थपूर्णता येते. ज्ञानेंद्रियांचा अभाव असला म्हणजे परिस्थितीबद्दल यथार्थ ज्ञान होत नाही असे नाही' हे सर्व विचार पाहिल्यावर ज्ञान या गोष्टीचा उलगडा मर्ढेकरांनी आपल्या पद्धतीने केलेला दिसून येतो. एखादे ज्ञानेन्द्रिय नसणे म्हणजे ज्ञान मिळत नाही हा समज ते चुकीचा ठरवतात.

मर्ढेकर म्हणतात, त्याप्रमाणे नीतीवादाच्या दृष्टीने कलांचे कार्य स्त्री-पुरुषांना आपली इच्छाशक्ती योग्य दिशेने वळवायला शिकवणे हे होय. इच्छाशक्तीला योग्य दिशेने चालण्याची दिशा मिळाली की तिची परिणीती नीतीशुद्ध आचरणात आणि नैतिक रित्या वागण्यात होणारच. असे सांगून मर्ढेकर नैतिकदृष्टीने निर्मळ समाज निर्मितीसाठी इच्छाशक्तीला योग्य वळण लागणे गरजेचे आहे असे स्पष्ट करतात. सौंदर्यशास्त्र आणि तर्कशास्त्र यांचा परस्परांशी येणारा सहसंबंध त्यांनी विलया उलगडून दाखविला आहे. सौंदर्यशास्त्र हे सोपे असले तरी सामान्य अभ्यासकाच्या अपरिपक्वतेमुळे कोंडी निर्माण होते असे सुद्धा मराठी प्राणी सांगितले आहे.

कला मंदिरात शिक्षण घेतलेल्या चित्रकारापेक्षा खेडेगावातल्या रामाचा किंवा विठोबाा मंदिरातल्या भिंतीवर कुंचलित फिरवणाऱ्या अडाणी कलावंतांचे कौतुक करताना मर्ढेकरांनी शिक्षणाने कला यांचा परस्पर संबंध असला तरी त्या एकमेकांवर पूर्णपणे अवलंबून असतील असे नाही असे सांगितले आहे. साहित्य या बाबीवर भाष्य करत असताना वाङ्मय आणि सौंदर्यशास्त्र या लेखामध्ये शब्द ज्ञान असे कधीच न दिसे आत्मयाचे मना अशा शब्दात शब्दांच्या ज्ञानाची महती सांगणारे बालकवी, अमृता ते पैजा जिंकणारे ज्ञानेश्वर यांच्या विचाराचा दाखला मर्ढेकरांनी दिला आहे. याच लेखात कवी गिरीश यांच्या आईचा आशीर्वाद या कवितेचे उदाहरण मर्ढेकर आवर्जून देतात.

**पाठीवरुनी ग बाळ नाहीं हात फिरवीला,**
**घास नाहीं भरवीला!**
**नाहीं अक्षर लिहून दिलं कधीं पाटीवर,**
**गाणं कुठलं ग तर!**
**नाहीं लाडकीला माझ्या कधीं अशी वाढविली,**
**भाग्य नव्हतं कपाळीं!**

लेकरांना आई घास भरवते आणि पाठीवर अक्षरे काढून देते अशा शब्दात आईचे महत्व सांगणारी कविता मर्ढेकर निवडतात. त्याचवेळी आई शिक्षण देते ही ओळ सुद्धा ते आवर्जून विचारात घेतात. अशा लहान लहान उदाहरणातून लेखकाचे आपल्याला जाणवत असतात. वाङ्मय ही एका भावनेची लयबद्ध आकृती असते. असे लेखक म्हणतात. मात्र त्याचवेळी काव्य म्हणजे बीजगणित नव्हे. हे अत्यंत महत्त्वाचे अधोरेखन वर्तमान काळातील यमक मात्रा आणि अक्षर मोजून आशय घनतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणाऱ्या कवी आणि साहित्यिकांनी लक्षात घेतले पाहिजे. वाङ्मयाचा अभ्यास करत असताना मराठी वाङ्मयाचा उल्लेख जागतिक संस्कृती क्षेत्रात मानाचे स्थान का प्राप्त करत नाही? याबाबतही मराठीत आणि आपले विचार मांडले आहे. एखादी वेळी इंग्रजीमध्ये भाषांतर करून आपले साहित्य बाकीच्या जगापुढे मांडले जाणे याबाबत मर्ढेकरांचे विचार वेगळे आहेत. त्यांच्या मते भाषा ही जीवनाचे प्रतिबिंब




असते. जीवनात ज्या भावना किंवा विचार कधीच अनुभवले जात नाहीत त्यांना भाषेतच स्थान मिळत नाही. यातच भाषांतराचे काम दुर्घट असते. याचे उदाहरण देताना स्त्रीचा पदर उडणे या मराठी वाक्याला इंग्रजी किंवा इतर कोणताही भाषेमध्ये नेमकेपणाने कसे करावे? हे कुणालाही कळणे शक्य नाही असे भाषा विषयक अभ्यासातून मर्ढेकर बोलतात. त्याचबरोबर जोपर्यंत बौद्धिक आणि हार्दिक निस्सीम तादात्म्य म्हणजे काय आत्मिक विचारभावांचे युद्ध म्हणजे काय याची जाणीव महाराष्ट्रीयन लेखक वर्गाला जोपर्यंत होत नाही तोपर्यंत त्यांच्या लिखाणाला मान मिळणार नाही. कोलरीज या इंग्रजी कवीचे उदाहरण देत मर्ढेकरांनी एखादे महाकाव्य लिहायचे असल्यास अगोदर गणित शास्त्रात पारंगतता मिळवली पाहिजे असे म्हटले आहे. जर तुम्हाला महाकाव्य लिहायचे असेल तर गणित यासह यांत्रिकी, द्रवस्थैतिकी खगोलशास्त्र, वनस्पतिशास्त्र, धातूशास्त्र, जीवाश्मशास्त्र, रसायनशास्त्र, भूविज्ञान, शरीरशास्त्र, औषधशास्त्र; या सर्वांचा अभ्यास आणि त्यानंतर व्यक्ती मानसशास्त्र, प्रवास वृत्ते, जल पर्यटन वृत्ते आणि इतिहास यांचा कसून अभ्यास करीन अशा रीतीने मी दहा वर्षे घालवेन त्यानंतर पाच वर्ष काव्य लिहिण्यात आणि शेवटचे पाच वर्ष त्यात सुधारणा करण्याचा घालवीन, असे म्हटले आहे. यावरून साहित्याच्या निर्मितीसाठी तुम्हाला किती मोठ्या प्रमाणात अभ्यास करावा लागतो? किती विषयाचे शिक्षण घ्यावे लागते? स्वतःचे व्यक्तिमत्व किती अभ्यासू ठेवावे लागते याबाबत समजून घेणे गरजेचे आहे. नेमके तेच सांगण्याचे काम मर्ढेकरांनी आपल्या लेखनात केले आहे.

गंगाधर गाडगीळ यांच्या बाई शाळा सोडून जातात या कथेतील निमा नावाच्या मुलीने पांढऱ्या कागदाचे बदक कापणे. ही एक विद्यार्थ्याची मनोदशा दाखवणारी ओळख असल्यामुळे तिचा वापर त्याच ठिकाणी योग्य वाटतो अशा उदाहरणातून लेखकांनी गंगाधर गाडगीळ यांच्या लिखाणाबाबत उलगडा केला आहे. त्याच कथेतील, बाईचे गाणे, किती गोड होते म्हणून सांगू? अगदी कलिंगडाच्यामधल्या गरासारखे ही अतिशय बालसुलभ आणि नैसर्गिक अशी उपमा आपल्या शाळेबद्दल शिक्षकेसाठी वापरणारे गंगाधर गाडगीळ विद्यार्थ्यांच्या मनाचा तळ गाठण्यात यशस्वी झाले होते हे दर्शवणारे आहे. गंगाधर गाडगीळ यांच्या कथेतील, 'शाळेतील बाईचा मुका' या पातळीवर येणाऱ्या बालसुलभ भावना मोठ्या धाडसाने गंगाधर गाडगीळ यांनी लिहिल्या आणि त्यांचा मागोवा घेण्याचे काम मर्ढेकरांनी केलेले दिसते.

राक्षस विवाह या आणखी एका पुस्तकावर मर्ढेकर व्यक्त झाले आहे. त्यातही त्यांनी या कथेचा 'नायक कॉलेज कोर्समधून नुकताच मुक्त झालेला आहे', तो तरुण' प्रत्येक महत्त्वाच्या विषयावर नायिकेने विचार करायला शिकले पाहिजे' असा अट्टाहास धरतो. ही तरुणी इंग्रजी सातव्या इयत्तेत असलेली मुलगी आहे. अशा शैक्षणिक संदर्भांची निर्मिती करणाऱ्या वाक्याचे उल्लेख करतात. विश्वविद्यालयात अभ्यास केलेले सुशिक्षित करून तरुणी जेव्हा अगदी अपरिचित व्यक्तीलाही शरीर अर्पण करू शकतात. तेव्हा त्यांच्या हीन मनाची तिरस्कार आलेत संभावना केली पाहिजे. असे जेव्हा मर्ढेकर म्हणतात, तेव्हा विश्वविद्यालयातील अभ्यासापेक्षा संस्कार आणि नीतिमत्ता महत्त्वाची आहे असे सुतोवाचे ते करत असतात. प्रभाकर पाध्ये यांच्या व्याधाची चांदणी या कथासंग्रहाबाबत बोलत असताना कथांची भाषा साधी पण ढंगदार आहे अशा शब्दात ते गौरव करतात. मी का लिहितो? या महत्त्वाच्या लेखनात लेखक स्वतःबद्दल बोलताना विद्यार्थी तसेच असताना मी बऱ्यापैकी विद्यार्थी समजला जात असे, मात्र त्या मानाने परीक्षात फारसे यश माझ्या पदरात पडलं नाही. असं म्हणतात तेव्हा आपल्या शिक्षण पद्धतीवर एक प्रश्नचिन्ह उभे रहा.

सौंदर्यशास्त्र आणि साहित्य याबाबत बोलत असताना शास्त्र या विषयामध्ये गणिती पद्धतीचा स्वीकार अपेक्षित असला आणि संशोधनाला ती सोईस्कर असते तिने काटेकोरपणा वाढतो असे असले तरी गणिताच्या मुळाशी तर्कशास्त्र आहे, तर्कशास्त्राने गणित सिद्ध होते. सौंदर्यशास्त्राचे नियम हे पूर्णपणे वेगळे आहेत. गुरुत्वाकर्षणाचा नियम प्रयोगाने सिद्ध करता आला तरी सर्वत्र शास्त्रीय नियम प्रयोगांनी सिद्ध करता येत नाहीत, असे सांगून साहित्य आणि सौंदर्यशास्त्र यातील सर्व चर्चा आणि विवेचने यांचा उलगडा तर्कशास्त्राच्या आधारे होईलच असे नाही हे समजून घेणे हे गरजेचे असते. नवीन तर्कशास्त्र, गणित प्रयोग या सर्व बाबी शास्त्रामध्ये साधन म्हणून वापरल्या जातात. मर्ढेकरांची जी काही सौंदर्यशास्त्रीय विचारसरणी आहे ती मानसशास्त्र आणि पदार्थ विज्ञान शास्त्र यांच्या आधारावर आहे. एकंदरीत बा. सी. मर्ढेकर यांचे 'सौंदर्य आणि साहित्य' या ग्रंथामधील विचार मराठीतील समीक्षेचे प्रायोजन, पद्धती आणि कार्य यातून मराठी सौंदर्यशास्त्र आणि समीक्षा याबाबतचे मूलभूत शिक्षण आणि ज्ञान वृद्धिंगत होण्यास मदत झाली आहे हे लक्षात घ्यावे लागते.

पान १ वरून

## अराजकवाद्यांचा आणखी एक आश्वासक...

यांना विजय मिळाला आहे. त्यामुळे हा सर्वार्थाने मोठा विजय आहे.

एका प्रचारसभेमध्ये ट्रंप यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. तो हल्लादेखील किरकोळीत काढण्याइतकी ट्रंपविरोधी माध्यमे निर्ढावल्याचे दिसले. या हल्ल्यामुळे ट्रंप यांना कितपत सहानुभूती मिळाली असेल याचा अंदाज बांधणे कठीण आहे. मात्र जनतेने केलेला हा बदल ट्रंप यांच्यासाठी आहे असे म्हणण्यापेक्षा अमेरिकेत डेमोक्रॅट्सनी गेल्या चार वर्षांमध्ये घातलेल्या उच्छादामुळे निराश झालेल्या मतदारांनी त्यांना नाकारत ट्रंप यांना पसंती दिली असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. अमेरिकेतील मतदानाचे प्रमाण आपल्याकडच्यासारखेच निराशाजनक असते. कमला हॅरिस यांच्या स्वरूपात अध्यक्षपदासाठीच्या निवडणुकीत महिला उमेदवाराचा पराभव होण्याची ही दुसरी वेळ आहे. हिलरी क्लिंटन यांनी इसिसच्या कारवायांना दिलेल्या पाठबळाच्या बातम्या उघड झाल्यानंतर त्यांचा ट्रंप यांनी पराभव केला हे बरेच झाले अशी भावना झाली होती. कमला हॅरिस या कर्तृत्वाच्या बाबतीत तिकडील फार तर फार उद्धव ठाकरे किंवा शिबु सोरेन असल्यामुळे केवळ महिला म्हणून त्यांचा विजय व्हावा, ही अपेक्षा संयुक्तिक नव्हती. आपल्याकडे घराणेशहा इंदिरा गांधी किंवा राबडी पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री होण्याने देशाचे किंवा बिहारचे काही भले झाले नव्हते. तेच कमला हॅरिस यांना लागू होते. भारताच्या दृष्टीने पाहिले तर ट्रंप-मोदी यांच्या वैयक्तिक मैत्रीतून होणाऱ्या भारताच्या भल्याचे पर्व पुढे चालू होईल. ट्रंपसत्तेत असताना अमेरिकेकडून बांग्लादेशात घडवून आणले तसे बंड घडले असते का, या प्रश्नाचे उत्तर बहुधा होकारार्थीच असेल. मात्र तेथे झालेल्या हिंदूवरील अत्याचारांबाबत ट्रंप यांनी केलेले वक्तव्य अध्यक्षपदी निवडून येण्यापूर्वीचे असल्यामुळे महत्त्वाचे ठरते. खलिस्तानी दहशतवाद्यांना कॅनडा देत असलेल्या असलेल्या संरक्षणाबाबतच्या धोरणामध्ये मात्र ट्रंप यांच्यामुळे भारताच्या दृष्टीने सकारात्मक बदल होऊ शकेल. आपण अध्यक्षपदी असतो तर युक्रेन-रशिया युद्धच होऊ दिले नसते, असे विधान ट्रंप यांनी केले होते. ते या संघर्षाबाबत आता काय भूमिका घेतात हे पहावे लागेल. बाकी भारत-अमेरिकासंबंधांमध्ये ते मागच्यावेळच्याप्रमाणे अमेरिकेचेच हितरक्षण करणार हे नक्की. या देशात कोठेही दंगल झाली तर येथील बहुसंख्यकांना जबाबदार धरण्याचा कायदा बनवण्याचा घाट काँग्रेसने घातला होता. निर्लज्जपणाची आणि हलकटपणाच्या सर्व मर्यादा तेव्हा तोडल्या जात होत्या. अमेरिकी समाज उरलासुरला नासवण्याच्या दृष्टीने डेमोक्रॅट्सनी अमेरिकेच्या काही राज्यांमध्ये काही वोक कायदे बनवले आहेत. कमला हॅरिस यांना तेथील कृष्णवर्णीयांचा पाठिंबाही अपेक्षेएवढा मिळाला नाही असे ऐकण्यात आले. त्याची कारणे लवकरच कळतील. ट्रंप यांच्या पराभवाकडे लक्ष लावून बसलेल्यांना हा फार मोठा धक्का आहे. भारतापाठोपाठ अमेरिकेमध्येदेखील अराजकवादी शक्तींचा पराभव झाला हे आश्वासक आहे. आता या व अन्य देशांनी अशा शक्तींवर प्रभावी अंकूश लावायला हवा.

## कलम ३७० चा पुन्हा अट्टाहास का?

उघड स्टेटमेंट दिले होते. थोडक्यात ज्या- ज्या हिंदूनी महाविकास आघाडीला मतदान केले त्यांच्या मतांची किंमत शून्य असून, आम्ही फक्त मुस्लिम समाजासाठीच काम करणार आहोत असा स्पष्ट संदेश दिला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार की त्यांनी हा डाव अडीच वर्षातच हाणून पाडला व सरकार स्थापन केले, जर चुकून आतापर्यंत म्हणजेच निवडणुकीपर्यंत महाविकास आघाडी सत्तेवर असती तर त्यांनी मुस्लिम समाजाला खुश करण्यासाठी व एकगठ्ठा मते पुन्हा त्यांच्या झोळीत पाडण्यासाठी त्यांनी वक्फ बोर्डाला पूर्ण फ्री हँड दिला असता व महाराष्ट्रात ही रोज हजारो एकर जमीन वक्फ बोर्डाच्या घशात घालण्याच पाप केल असत.

महाविकास आघाडी सत्तेतून बाहेर जाताच त्यांनी हिंदू धर्मात दुही माजवण्यासाठी व भाजप तसेच महायुती विरोधात जनतेत रोष निर्माण करण्यासाठी मराठा आरक्षण कार्ड व ओबीसी कार्ड बाहेर काढलं असून त्याला हिंदू समाज पूर्णपणे बळी पडला असून लोकसभेला महाविकास आघाडीला भरभरून मतदान केले व कधी नव्हे ते ३१ जागा त्यांच्या पदरात पडल्या.

हिंदू आज ही गाफील आहे, त्यांना अस वाटतंय की ही लढाई पवार-ठाकरेवर केलेल्या कुरघोडीतून स्वाभिमानाची लढाई आहे, पण त्यांना हे समजत नाहीये की, ही लढाई भाजप व महायुतीला सत्तेतून खाली खेचून पुन्हा एकदा मुस्लिम लांगुल चालन करून हिंदूच दुसऱ्यांदा पानिपत केल जाणार असून जातीयवादाच कार्ड वापरून हिंदूचा मजबूत गैर फायदा घेतला जाणार असून पुन्हा एकदा केसाने गळा कापला जाणार आहे.

हिंदू आता जागे झाले तर ठीक, नाहीतर कर्नाटक, हिमाचल, झारखंडसारखा अन्याय सहन करायला आतापासूनच मानसिक तयारी करून ठेवा. वेळ गेल्यावर चूक लक्षात येऊन ही फायदा नाही कारण आता जात व पक्ष पाहून मतदान कराल पण वक्फ बोर्ड आणि जिहादी पक्ष व जात पाहून अत्याचार करत नाही तर हिंदू म्हणून अत्याचार करतात.

## जनगणना : भारताच्या सर्वांगीण प्रगतीचे प्रतिबिंब

आखणी सुरू आहे. त्यामुळे स्वगणनेचा पर्याय नागरिकांसाठी उपलब्ध होऊ शकतो.

### जनगणनेची प्रक्रिया कशी होईल?

भारतासारख्या भौगोलिकदृष्ट्या प्रचंड विस्तारलेल्या देशात जवळपास १४० कोटी इतक्या प्रचंड लोकसंख्येची तपशीलवार गणना करणे, ही सर्वस्वी आव्हानात्मक प्रक्रिया. उपलब्ध माहितीनुसार, २०११ सालची जनगणना करण्यासाठी सुमारे २७ लाख कर्मचारी कामाला लागले होते. या आकड्यावरून जनगणनेच्या कामाची व्याप्ती किती प्रचंड आहे, ते लक्षात यावे. यावेळी कर्मचार्यांच्या संख्येत जनगणनेच्या कामाकरिता क्वचित वाढ होईल. या गणनेमध्ये प्रत्येक घराची नोंद होईल. घराची बांधणी कशी आहे, त्यासाठी कुठले साहित्य वापरले आहे, त्यासाठी किती खर्च झाला, इत्यादी तपशीलदेखील नोंदविला जाईल. एकेका व्यक्तीचे वय, शिक्षण, घरातील सुविधा किती आहेत, याचीही रीतसर नोंद घेतली जाईल.

### जनगणना कशासाठी?

जनगणना म्हणजे केवळ देशातील लोकसंख्येचे मोजमापच नव्हे, तर देशाची, देशवासियांची, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती कशी आहे, यांचा आरसा म्हणजे जनगणना. विविध 'कल्याणकारी योजना', 'विकास योजना', सवलती, आरक्षण आदींची आखणी करतानाही नोंदलेली आकडेवारीची माहिती महत्त्वाची ठरते. देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे असे राजकारणातील महिला आरक्षण लागू होण्याआधी ही जनगणना होणे आवश्यक आहे. कारण, या गणनेनुसार लोकसभा, विधानसभा मतदारसंघांची फेररचना, आरक्षित मतदारसंघ हे सारे ठरविता येईल. एकूण बऱ्याच गोष्टी या जनगणनेच्या आकडेवारीतून मिळणार आहेत. त्यामुळे आता जनगणनेची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु व्हावी, हीच अपेक्षा.

कथा
मो. बा. देशपांडे

# दुसरं बाल्य

श्रीकांत विचारमग्न अवस्थेत दूरवर एकटक बघत बसला होता. लोक अण्णांना बघायला येत-जात होते. अर्थात मोरल इफेक्ट्स म्हणतात तसा तो एक उपचार होता. 'काय झालंय अण्णांना? वय झालंय...म्हणजे?' ''अहो आमचे डॉक्टर म्हणतात, आता नव्वदीच्या घरातील व्यक्ती ठणठणीत कशी असू शकेल? काही समस्या असतात. त्यातून अल्झायमरसारख्या तक्रारी उद्भवतात. बाकी रोगराई काहीच नाही. विशिष्ट वयात ॲक्टिव्ह झालेले हार्मोन्स विशिष्ट वय झालं की इन-ॲक्टिव्ह होणे हे नैसर्गिकच नाही काय? त्यातून स्नायू, अस्थी जे शरीराची बांधणी करतात, तेच दुर्बल होतात. सगळ्याच दीर्घायुषी लोकांना या अवस्थेतून जाणं भाग आहे.'

श्रीकांतचा मुलगा शंभो पाचगणीला बोर्डिंग स्कूलमध्ये शिकतो. पत्नी सुजाता मुख्याध्यापिका असल्याने तिला व्याप आहे. श्रीकांतसुद्धा निवृत्तीला आलेला एक शुगर पेशंट; त्यामुळे बऱ्यापैकी थकवा गाठीशी आहे. अण्णांची काळजी घ्यायला माणूस अनेकदा ठेवून झाला. पण कुणी टिकत नाही. आपुलकीने काम करत नाही, हेच सत्य ध्यानात आलं. तीन महिन्यांपासून नव्वदीच्या घरातील अण्णांची तब्येत बरी नव्हती. दोन वेळा इस्पितळाच्या चकरा झाल्या. एका वयोमर्यादेनंतर फार अपेक्षा ठेवता येत नाही, असं डॉक्टरांचं मत पडलं. डॉक्टरांच्या सल्ल्यानेच अण्णांना पुन्हा घरी आणलं होतं. आता अंथरुणावर सगळं करण्याचा प्रश्न होता. त्यासाठी योग्य व्यक्ती सापडत नव्हती. नेमकं काय करायला हवं हा एक जटिल प्रश्न झाला होता. 'म्हातारपण म्हणजे जणू दुसरं बाल्य!' असं कोणत्या कवीनं म्हटलंय कोण जाणे. यात भेद नक्कीच आहे, बालपणी सगळे अवयव नवे कोरे असतात. म्हातारपणी जीर्ण झालेले असतात. बालपणी आई सगळं आनंदाने करते, पण म्हातारपणी माणूस जितका अगतिक होतो त्याहून अधिक हळवा होतो. बालपणी सगळे लाड करतात, लोभ करतात; पण म्हातारपण हे त्या मानाने कष्टदायी असते. हे कटू असलं तरी सत्य आहे. पत्नीच्या निधनानंतर दहा वर्षे हा जीवनशकट एका चाकावर चालवताना अण्णाना हे सत्य उमगलं होतं. घरात एक आजारी व्यक्ती असेल तर अख्खं घर आजारी होतं. एकंदरीत स्थिती बघून अण्णा समजूतदारपणाने म्हणाले. त्या दिवशी अचानक बालमित्र सुनील घरी आला. एकंदरीत परिस्थितीचे अवलोकन करून झाल्यावर सुनील निराधार अपंग वृद्धांचं पालकत्व स्वीकारणाऱ्या काही जेरियाट्रिक संस्थांची माहिती नेटवर दाखवत होता. ही एक मोठी सोय आहे, असा विचार मनात आला. अनेक सामाजिक संस्था हे कठीण काम करीत आहेत. ते सर्व धन्यवादाला पात्र आहेत. गावातच सोयीचं राहील म्हणून जवळचं एक स्टे होम शोधलं. 'गोल्डन एज स्टे होम' असे भावनिक नाव असणाऱ्या बोर्डवर खाली कंसात मराठीत 'ज्येष्ठ सन्मान निवारा' अशी अक्षरे झळकत होती. गावकुसापासून दूरस्थ अशा या संस्थेला श्रीकांत आणि सुनीलने भेट दिली. बराच वेळ इकडे तिकडे बघून झाल्यावर एक बारकासा माणूस येताना दिसला. अंगात विटलेला टी-शर्ट, खाली हाफ पॅन्ट आणि गळ्यात पंचा. अशा अवतारात चेहऱ्यावर बेपर्वाईचे भाव घेऊन तो पुढे आला. 'कोण पाहिजे? काय नाव?' असं त्यांनी खुणेनंच विचारलं आणि आमच्या तोंडाकडे पाहत राहिला. तो तेथील एकच कर्मचारी होता. असं सहज लक्षात येत होतं. ''बसा बसा. बोला काय ते.'' त्याने आम्हाला येण्याचे कारण विचारले. ''माझे ९० वर्षांचे वडील अंथरुणावर निजून आहेत. त्यांची वास्तुपुस्त करायला कोणी नाही म्हणून येथे विचारपूस करायला आलो होतो.'' थोडा वेळ तो इकडे तिकडे बघत गप्पच राहिला. मग सुनीलने त्याला विचारलं, 'तुम्ही इथले कोण? नाव काय तुमचं?' ''भोलू. मी छत्तीसगडवरून आलोय. इथला केअर टेकर आहे.' त्याने हातात एक पत्रक दिले. त्यात संस्थेचे कडक नियम क्रमवार लिहिले होते आणि सर्वात खाली 'ऑनलाईन' पैसे पाठविण्यासाठी तपशील दिले होते. ''तुम्ही फोन करा. आम्ही स्वतः वृद्धांना येथे घेऊन येऊ. दर महिन्याला पैसे बरोबर यायला हवेत. आम्ही बोलावू तेव्हाच तुम्ही यावे,'' अशी त्रोटक माहिती त्याने दिली.

सदर संस्थेचे मालक कोण आहेत? याबद्दल त्यालाही काहीच माहिती नव्हती. यावरून तिथे वरचेवर कोणीच येऊन बघणारं नाही, हे सिद्ध होत होतं. त्यामुळे शंकेची पाल चुकचुकली. थेट आत वाकून पाहिले तेव्हा तेथील व्यवस्था दयनीय होती. हा एकच मदतनीस तेथील व्यवस्था पाहण्यास अपुरा होता. 'आम्ही तपासणी करणारे अधिकारी आहोत' अशी खोटीच बतावणी करून आम्ही थेट आतमध्ये शिरून बघितले तेव्हा तेथील दयनीय दृश्य बघून अवाक् झालो... सर्वत्र हॉलमध्ये वाकडे तिकडे पलंग आणि त्यावर लोंबत्या चादरी. तिथेच कसेबसे वाळत घातलेले ओले टॉवेल आणि इतर कपडे, सर्वत्र जाळी-जळमटे आणि कुबट वास. ''येथे मेंटेनन्स तर फारच वाईट आहे. येथे कुणी जबाबदार व्यक्ती नाही काय?'' या प्रश्नावर भोलू काहीच उत्तर न देता खाल मानेने उभा होता. भीतीने जणू त्याची दातखीळ बसली होती. 'इथल्या व्यवस्थेची तक्रार करावी लागेल' असे त्याला सांगताच तो म्हणाला, 'आम्ही नोकरदार माणूस. तुम्ही साहेबांशी काय ते बोला!' ''ठीक आहे. साहेबांचे नाव, गाव, पत्ता, मोबाईल नंबर तर देशील?' 'ते सर्व मला माहीत नाही.' 'तर मग चल. तुझीच तक्रार करावी लागेल.'



आता मात्र तो सुतासारखा सरळ झाला आणि एका वहीत टिपून ठेवलेला नंबर देऊ लागला. 'जिथे गरज तिथं व्यवसाय' या धोरणाला अनुसरून काही बडे व्यावसायिक किंवा एखादी लॉबी यामागे असण्याची शक्यता वाटली. एकदा वृद्धांची भरती येथे झाली की, नंतर त्यांची खबरबात ठेवायला आजकालच्या धावत्या जीवनशैलीत कुणाला वेळ आहे? बिचारे असहाय वृद्ध तक्रार करू शकत नाही. त्यांची कुणी वास्तपुस्त ठेवतंय की नाही, हे विचारण्याची कुणाला गरज नाही. शिवाय नियमित पैसे येण्याची हमी. इतका चांगला व्यवसाय अन्य कोणता असू शकतो? आता मात्र श्रीकांत आणि सुनील दोघेही मानवतेचा हा विद्रूप चेहरा बघून हतबुद्ध होऊन ते दृश्य बघत होते. ''छे, छे! मी अण्णांना येथे कदापिही आणणार नाही; ते पाप आहे आणि कायद्याने वृद्ध मातापित्यांची जबाबदारी घेणे हे त्यांच्या अपत्यांचेच कर्तव्य आहे. जे लोक या कर्तव्यापासून पळ काढतात. अर्थात सर्वच ठिकाणी असा अनुभव येत नाही. अनेक सेवाभावी संस्था या क्षेत्रात चांगले कामही करीत असतात. त्यांचा अपवाद वगळता अनुभवांच्या सुवर्ण युगावर आलेले हे संकट सहृदय माणसाच्या अंत:करणाला पीळ पडणारेच म्हणावे. काही असामाजिक तत्त्वांमुळे चांगल्या सेवाभावी संस्थांची नाहक बदनामी होते. परिणामी लोकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण होते. असे होऊ नये. चांगल्या संस्थांना उजळ माथ्याने कार्य करता यायला हवे.'' राहून राहून मनात पुन्हा पुन्हा प्रश्नचिन्ह उभे राहत होते. सुनील मदतीसाठी काही दिवस सोबत राहिला. त्याने इंटरनेटवर अनेक चांगल्या सेवाभावी संस्थांची माहिती काढली. तेव्हा लक्षात आले की, समाजात कुणी दुसऱ्याची अडचण बघून आपले उखळ पांढरे करून घेतात. याउलट अनेक सज्जन लोक पदरचे खर्चून सेवाभावी वृत्तीने काही धर्मार्थ वृद्धाश्रम नेटाने चालवीत असतात.

(पान ६ वर)

**आपल्या महाराष्ट्राचे भाग्य एवढे थोर की आपणास 'संत, पंत आणि तंत' असे तीन प्रकारचे कवी लाभलेले. संतकवी, पंडितकवी आणि शाहीर कवी अशा तीन परंपरांपैकी पंडितकवींच्या परंपरेतील कवी मुक्तेश्वर हा सर्वात लोकप्रिय प्रतिभासंपन्न व कलाचतुर असा कवी होता. तो संत एकनाथांचा नातू होता. त्यांचे मराठी व संस्कृत भाषांतर प्रचंड प्रभुत्व होते. तो मराठी भाषाभिमानी म्हणून प्रसिद्ध होता. मुक्तेश्वरांचा एक भारत काव्य पर्वाचा मराठी साहित्यातील कोहिनूर गौरव केला जातो. इतिहासाचार्य राजवाडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर सह अनेक थोर मोठ्यांनी मुक्तेश्वर काव्याचा गौरव केलेला आहे. अशा मुक्तेश्वरांचे 'संक्षेप रामायण' लिहिले आहे. संत एकनाथांच्या भावार्थ रामायणाचे हे संक्षिप्त रूप, अटोपशीर आवृत्ती आहे.**

लेखांक ४४

# पंडितकवी मुक्तेश्वर यांचे 'संक्षेप रामायण'

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

महाराष्ट्राला संतकवी, पंतकवी आणि तंतकवी अशी कवींची प्रदीर्घ परंपरा असून महाराष्ट्राची काव्यधारा या तीन कवींनी संपन्न झालेली आहे. संतकवी, पंडितकवी आणि शाहीर यांची फार मोठी मांदियाळी महाराष्ट्राला लाभलेली आहे. संतकवींमध्ये संत निवृत्तीनाथ- ज्ञानदेव ते संत तुकडोजी महाराज अशी वैभवशाली परंपरा आहे तर, शाहिरी संतकाव्यात रामजोशी, सगनभाऊ, पठ्ठे बापूराव असे कवी आपणास लाभलेले आहेत. आणि पंडितकवींमध्ये वामन पंडित, मोरोपंत यांच्या नाममालेतील आणखी एक सशक्त- समर्थ पंडितकवी म्हणजे 'मुक्तेश्वर'.

पंडित कवी मुक्तेश्वर हे संत एकनाथ महाराज यांच्या ज्येष्ठ कन्या गोदावरीचे सुपुत्र, संत एकनाथांचे नातू आहेत. संतकवी संत एकनाथांच्या संस्काराने बहरलेले मुक्तेश्वर हे पंडित त्यांचे नेमके जन्मवर्ष, कर्मभूमी आणि खरे नाव याविषयी बरेच मतभेद आहेत. काही संशोधकांच्या मते मुक्तेश्वरांचा जन्म व कर्मभूमी पैठण हीच होती व त्यांना संत एकनाथांचा १२-१५ वर्षे सहवास लाभला होता. काही संशोधकांच्या मते मुक्तेश्वरांचा जन्म- कर्मभूमी आणि समाधी स्थान हे कृष्णानदी काठच्या नरसोबाच्या वाडी जवळील 'तेरवाड' हे आहे. तेरवाड येथे मुक्तेश्वरांची समाधी आहे. यावर मात्र कोणताही विवाद नाही. तसेच त्यांच्या पित्याचे नाव चिंतामणी होते हेही सर्वमान्य आहे. पण 'मुक्तेश्वर' हे त्यंचे मूळनाव आहे की ते कवी, लेखक, म्हणून स्वीकारलेली साहित्य नाममुद्रा आहे यावर संशोधकांचे दुमत आहे. काहींच्या मते मुक्तेश्वरांचा जन्म काळ सुमारे इ.स. १५७४ दरम्यान असावा. तर महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल.भावे, ओक यांच्या मते मुक्तेश्वराचा जन्म इ.स. १६०९ आहे. प्रा.प्रियोळकर यांनी मुक्तेश्वरांच्या महाभारत पर्वाचे ४ खंडात संपादन केलेले आहे. नव्या संशोधनानुसार मुक्तेश्वर काव्यातील 'लीला विश्वंभर'हा उल्लेख त्याच्या मातापित्याच नसून उपास्य देवतेचा आहे. मुक्तेश्वर दत्त संप्रदायी होता. भगवान दत्तात्रयाचा उल्लेख मुक्तेश्वराने 'लीला विश्वंभर' म्हणून केलेला आहे.

'मुक्तेश्वर' हे नाव ही दत्तदेवतेचेच एक नाम आहे. ते त्याचे कवीनाम असून त्याचे खरे नाव मुदगल आहे, मुदगल हे आडनाव नाही. त्यांच्या काव्याचे एकनाथी



वळण आणि तत्कालिन समाजस्थिती पाहता मुक्तेश्वर हे शिवपूर्व काळातील होते असे म्हणावे लागते.

**संक्षेप रामायणाची वैशिष्ट्ये:-**

पंडित कवी मुक्तेश्वरांना आपल्या आजोबांचा, संत एकनाथांचा व त्यांच्या ओजस्वी वाङ्मयाचा सार्थ अभिमान होता. नाथांच्या सर्व वाङ्मयाचा त्यांचा अभ्यास होता. नाथांचे 'भावार्थ रामायण' त्यांना विशेषत्वाने आवडत होते. परंतु भावार्थ रामायणाचा ४०,००० ओव्यांचा अवाढव्य विस्तार, त्यांना संस्कृत पंचमहाकाव्याच्या पार्श्वभूमीवर खूपच अधिक वाटत होता. त्यामुळे त्यांनी आजोबांच्या भावार्थ रामायणाचा आपल्या संस्कृत व मराठी भाषा प्रभूत्वाच्या अधिकाराने केवळ १७२२ ओव्यात, अगदी आटोपशीर संक्षेप केला. म्हणून या ग्रंथास मुक्तेश्वर कृत 'संक्षेप रामायण' किंवा मोठ्या साक्षेपाने त्याने हा संक्षेप केला म्हणून त्यास 'साक्षेप रामायण' अशाही नावाने ओळखले जाऊ लागले.

मराठी साहित्यातील थोर व्यासंगी, संशोधक, श्री. ल. रा. पांगारकर, श्री भिडे आणि डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी पंडित कवी मुक्तेश्वरांच्या वाङ्मयाचा गौरवपूर्ण आढावा घेतलेला आहे. संस्कृत पंचमहाकाव्याचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून मुक्तेश्वरांनी साक्षेप रामायणाचे लेखन केले असे त्यातील कांडात्मकता व सर्गयुक्तता, निसर्गवर्णने, वृत्तयोजना, अलंकाराची रेलचेल, पदलालित्य यावरून स्पष्ट जाणवते. तसेच यमक, अनुप्रास, श्लेष या शब्दालंकाराचा चपखळ उपयोग यावर मुक्तेश्वराचा भर असून शब्दवैभव व भाषप्रभूत्व याचे ते दर्शन आहे.


**रघुपती तुझे प्रेमे क्षेम देता विनोदे**
**जवं की निकरि वैरी हार फेडी विषादे।**
**गिरि, सरि, तरू, आता मंडले आड ठेली**
**म्हणवुनि बहुशोके जानकी साद घाली।।**

मुक्तेश्वरांनी लिहिलेले 'संक्षेप रामायण' ही त्यांची पहिली साहित्य रचना आहे. मुक्तेश्वरांची खरी ओळख, लोकप्रियता ही त्यांच्या 'महाभारत पर्वा' मुळे आहे. त्यांची भारत पर्वे आख्यानकाव्याचा आदर्श व सर्वांग सुंदर वस्तुपाठ आहे.

विशेष 'आदिपर्व' मराठी रसिकाच्या सर्वाधिक पसंतीचे लोकप्रिय काव्य आहे. पण ती उंची- दर्जा मुक्तेश्वरांच्या संक्षेप रामायणाचा नाही असे समीक्षकांचे मत आहे. संक्षेप रामायणात शृंगार रसाचा अपेक्षेपेक्षा अधिक मुक्त वापर झालेला आहे. शृंगाराच्या अतिरेकी वर्णनामुळेच कदाचित मुक्तेश्वराच्या 'संक्षेप रामायण' कडे श्रद्धावंत भाविक वाचकांनी पाठ फिरवली असावी. अशीच गोष्ट प्रा. आनंद साधले यांच्या 'महाराष्ट्र रामायण' बाबतीत घडलेली आहे. अतिरेकी शृंगाराचा आरोप तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी महाराष्ट्र रामायणावर केला होता व त्याकडेही मराठी वाचकांनी पाठ फिरवली.

दुसरी गोष्ट म्हणजे संक्षेप रामायणामध्ये मुक्तेश्वरांन संस्कृत पंचमहाकाव्यातील व अन्य संस्कृत साहित्यातील श्लोक, सुभाषिते, दृष्टांत यांचे भाषांतर केलेले आहे. या उसनवारीमुळे संक्षेप रामायणात मुक्तेश्वरांची स्वतः ची बलस्थाने दुय्यम झाली आहेत. संस्कृत मधील जयदेवांचे 'प्रसन्नराघव', कालिदासाचा 'रघुवंश', जगन्नाथाचे 'भामिनीविलास' आणि भर्तृहरीची शतके यातील अनेक सुंदर सुंदर श्लोक-सुभाषिते मुक्तेश्वरांनी अनुवाद करून रामायणात घातले आहेत. पण या आरोपाबरोबरच काहींच्या मते त्यामुळे मराठी भाषा संपन्न करण्याचा मुक्तेश्वरांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे.

**शिवधनु जड कैसे कूर्म काठिण्य पृष्ठी।**
**मदनजनक हा हो। लोकलावण्य सृष्टी।**
**तवकृत पण तातां। सिंधु कैसेनि लंघी।**
**रघुवर विजयी हो चंडकोदंड भंगी ।।९१।।**



# प्रगल्भ लोकशाहीच्या दिशेने वाटचाल व्हावी!

अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

भारत देशाच्या सार्वभोम लोकशाहीतील निवडणूकीचे पडघम वाजू लागले की त्या क्षणापासून एकूणच सर्व उमेदवारांचे सर्वार्थाने निकाल लावेपर्यंत या देशातील अत्यंत जागरुक व सुजाण नागरिक लोकशाही जीवंत ठेवण्यासाठी किती जीवाचे रान करतात (?) बहुतांश आजचे नागरिक आणि भावी नागरिक आपली दैनंदिनी विसरुन बेभान झालेले दिसतात. त्यांचे लोकशाहीवरील प्रेम पाहून लोकशाहीचा थोडाफार अभ्यास असणाऱ्या माणसाला नक्कीच गलबलून आल्याशिवाय राहणार नाही.

वेगवेगळ्या चॅनेलवरील बातम्या, चर्चा व निष्कर्ष पाहून आपला अंदाज किती बरोबर हे सिद्ध करण्यासाठी एकमेकाची धुलाई करण्यापर्यंत लोकशाही रक्षकांची मजल गेलेली दिसते. यावरुन त्यांच्या लोकशाहीवरील प्रेमाची कल्पना यावी. लोकशाही जीवंत ठेवण्यासाठी सतत आपल्याला माहिती देणार्या प्रसार माध्यमांचा अतिप्रमाणात उपयोग करुन त्या साधनांचा जीव घेणारे लोकशाहीप्रेमी त्या साधनाचा अतिरिक्त उपयोग करुन स्वत: सोबतच त्या साधनाचा अंतकाळ जवळ आणतात. उदा. अहो सारखा टिव्ही पाहून त्या टिव्हीचा जीवं घेता का हो? हा संवाद आपल्याला अनेक घरात निवडणूक कालावधीत अधिक प्रमाणात ऐकायला मिळतो.

निवडणूक कालावधीत उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्याचे मन नेमके काय म्हणत असेल? या प्रश्नाची उकल केली तर ती कशी असू शकेल. यावर भाष्य करण्याचा हा प्रयत्न... एखाद्या विशिष्ट विचारधारेवर निस्सिम प्रेम करणारा प्रामाणिक कार्यकर्ता किंवा सामान्य नागरिक आपल्याला दिसतो. त्या प्रमाणात लोकप्रतिनिधीची पक्षनिष्ठा किंवा राष्ट्रनिष्ठा किती? असले फालतू प्रश्न विचारण्याचे साहस कुणीही करु नये. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी एवढे जीवाचे रानं करणे, दान करणे आणि धूळधाण करणे, हे सर्व जर उमेदवारांना करावे लागतात. तेव्हा त्यांनी धनसंचय केला तर त्यांच्या नावाने लगेच भ्रष्टाचार केला, अपहार केला, कोणावर तरी अन्याय झाला अशी ओरड करण्याचे कारणच काय? एवढे मोठे साम्राज्य निर्माण करायचे म्हणजे बहुतांशी लोकावर अन्याय होणारच,पण काही मोजक्या लोकांना तर न्याय मिळतो. हे काय कमी आहे? घटनेने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रत्येक वेळी उपयोग करायचाच असतो, हा गैरसमज स्वतःलाअत्यंतजागरुकसमजणार्यानागरिकांच्या मनातून काढून टाकण्याचे कार्य आज एकविसाव्या शतकात नेत्यांचे कार्यकर्ते करतात. त्यावेळी त्यांना चूक ठरवून दोषारोपन करण्याचे कार्य हे वर्तमान लोकशाहीसाठी घातक आहे. हे स्वयंघोषित दिडशहाण्या लोकांना कळायला हवे, पण ते नेहमीच जनहितदक्ष नेत्यांना लक्ष करण्याचा प्रयत्न करतात. लोकशाहीचे बदलते स्वरुप यांच्या अल्पबुद्धीला कळतं नाही, याला विद्यमान नेते काय करणार? शेवटी त्यांच्या बालीशपणाकडे दुर्लक्ष करुन त्या पामरांना उदार मनाने माफ करुन त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे एवढेच आमच्या नेत्यांच्या हाती आहे. देशाचा गाडा हाकत असतांना छोट्याछोट्या लोकांचे रडगाणे लक्षात घेवून राजकारण करता येते का? हा महान विचार घेवून जगणारे समस्त नेतागण आपल्यासाठी वंदनीय असले पाहिजे. ज्यांना त्यांच्या चरणकमलाचे महत्व कळाले. त्यांनी त्यांच्या पादुका डोक्यावर घेऊन मिरवल्या आणि आपल्या बरोबरच आपल्या अनेक पिढ्यांचे कल्याण करुन घेतले. हा साधा व्यवहार स्वत:ला बुद्धीप्रामाण्यवादी व सिद्धांतवादी म्हणवून घेणार्या लोकांना कळत नसेल तर त्यांच्या बुद्धीचे काय लोणचे घालावे? हा प्रश्न नेत्यांच्या सोबतच त्यांच्या अनेक कार्यकर्त्यांना अनेकदा सतावत असतो. बरे, हे सिद्धांतवादी लोक अत्यल्प असून हटवादी आहेत. कोणाच्या बापाचे ऐकत नाहीत. शेवटी नेत्यांच्या कार्यकर्त्यांना मग त्यांच्या भाषेत समजावून सांगावे लागते. तिथे कार्यकर्त्यांचे काही चुकले असे कसे काय म्हणता येईल?

(पान ६ वर)

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य


(भाग २१)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

मागील भागापासून रवींद्रनाथांच्या कथाविश्वाचा आढावा घ्यायला आपण सुरुवात केली आहे. रवींद्रनाथांच्या कथांना निसर्गाची नुसतीच पार्श्वभूमी लाभली आहे असे नाही. त्यांच्या कथांमध्ये निसर्ग आणि माणूस हातात हात घालून चालतात. किंबहुना माणूस हा निसर्गाचा एक भाग झालेला दिसतो. निसर्गात होणाऱ्या फेरबदलांची पार्श्वभूमी मानवी भावभावनांना लाभलेली दिसते. परंतु शेवटी त्यांच्या कथेत महत्वाचा आहे तो माणूस.या भागात आपण त्यांच्या तीन कथा थोडक्यात पाहू...

**काबुलीवाला, अंध भिकारीण आणि अतिथी:-**

काबुलीवाला ही रवींद्रनाथांची अतिशय लोकप्रिय कथा आहे. या कथेवर पूर्वी चित्रपटही निघाला होता. या चित्रपटात अभिनेते बलराज साहनी यांची प्रमुख भूमिका होती. आपल्यापैकी अनेकांनी तो पाहिलाही असेल. शालेय पाठ्यपुस्तकातही या कथेचा समावेश होता. ही कथा थोडक्यात अशी आहे. मिनी नावाची एक छोटी पाच सहा वर्षांची गोड पोरगी आपल्या आईवडिलांसह राहत असते. मिनीचा स्वभाव चौकस आहे. एक दिवस सुका मेवा विकणारा काबुलीवाला तिच्या दारावरून जात असतो. त्याला ती हाक मारते. हा काबुलीवाला उंचपुरा, धिप्पाड आहे. त्याच्या खांद्यावर एक मोठी झोळी असते. मिनी त्या काबुलीवाल्याला पाहून सुरुवातीला घाबरते. पण नंतर त्यांच्यात चांगली मैत्री होते. काबुल प्रांतातून बदाम, किसमिस आदी सुकामेवा घेऊन हा रहमत पठाण विक्रीसाठी भारतात येत असतो. या काबुलीवाल्याला मिनीच्या वयाचीच एक मुलगी असते. मिनीला पाहून त्याला आपल्या मुलीची आठवण येते. तिच्यातच तो आपल्या मुलीला पाहतो. खरेतर मिनीच्या आईला काबुलीवाला आणि मिनी यांच्यातील मैत्रीचे संबंध आवडत नाहीत. काबुलीवाला तिला पळवून नेईल असाही संशय तिच्या मनात असतो. पण तरीही त्यांची ही मैत्री सुरु असते. एक दिवस काबुलीवाला मिनीला म्हणतो, 'तू सासुरवाडीला जाऊ नकोस.' सासुरवाडी म्हणजे काय ते कळण्याचे मिनीचे वयही नसते. ती उलट त्यालाच विचारते, 'तू जाणार का सासुरवाडीला?' तेव्हा काबुलीवाला म्हणतो, 'मी सासऱ्याच्या नाकावर एक ठोसा ठेवून देईन.' दोघेही हसतात. असे त्यांचे हास्यविनोद सुरु राहतात. एक दिवस रस्त्यावर गलका ऐकू येतो. काबुलीवाल्याला पोलीस पकडून नेत असतात. मिनी त्याला पाहते. त्याने कोणावर तरी सुरीने हल्ला केलेला असतो. त्याच्यावर हल्ल्याचा आणि चोरीचा आळ येऊन त्याला जवळपास पंधरा वर्षे तुरुंगात काढावी लागतात. या मधल्या काळात मिनीला नवीन मैत्रीणी मिळतात. आणि ती काबुलीवाल्याला विसरूनही जाते. पण नंतर खऱ्या चोराचा शोध लागतो आणि काबुलीवाल्याची सुटका होते. तो मिनीच्या घरी तिला भेटायला येतो. आता काबुलीवाला जरा थकला आहे. त्याचे कपडे खराब झाले आहेत आणि अवतार न ओळखता येण्यासारखा झाला आहे. तो मिनीच्या घरी येतो तो दिवस विशेष असतो. मिनी आता मोठी झालेली असते आणि तिचं लग्न ठरलेलं असतं. सुरुवातीला तर मिनीचे बाबा त्याला ओळखत नाहीत. पण नंतर त्यांच्या लक्षात येते. आजच्या शुभ दिनी असा चोर माणूस त्यांना घरी आलेला नकोसा वाटतो. ते त्याला नंतर यायला सांगतात. पण तो म्हणतो, 'एकदा तरी बच्चीला भेटू द्या.' पण तिचे वडील नाही म्हणतात. तो जाताना एक पुडा त्यांच्या हातात देतो. त्यात किसमिस, बदाम आदी सुका मेवा असतो. एवढे मिनीला द्या असे विनवतो. तो त्यांना



म्हणतो, साहेब मी चोर नाही. माझ्यावर चोरीचा खोटा आळ आला होता. तो त्याच्या लांब झग्यात हात घालून एक कागद काढतो. त्यावर एका छोट्या मुलीच्या हाताचे ठसे असतात. तो म्हणतो, ' माझ्या मुलीचा फोटो तर माझ्यापाशी नाही. तिची माझी भेट नाही. पण हे तिच्या हातांचे ठसे मी सांभाळून ठेवले आहेत. 'ते पाहून मिनीच्या बाबांचे डोळे भरून येतात. या काबुलीवाल्याचा देश, धर्म, संस्कृती सगळे वेगळे असले तरी त्याच्यातही बापाचे हृदय आहे. मी आणि तो यात फरक नाही. ते मिनीला बोलावतात. मिनी वधूच्या वेशात येते. ती काबुलीवाल्याला सुरुवातीला ओळखत नाही. काबुलीवालाही ती मोठी झालेली पाहून बावरतो. तो म्हणतो, ' बच्ची, सासुरवाडीला निघालीस का तू?' यावेळी मिनी लाजते. ती घरात गेल्यावर काबुलीवाला जमिनीवर बसकण मारतो. त्याला कळते की आपली छोटी मैत्रीण आता पूर्वीची राहिली नाही. ती मोठी झाली आहे. आता त्याच्या डोळ्यासमोर त्याची मुलगी येते. तीही एवढीच मोठी झाली असेल असे त्याला वाटते. मिनीचे वडील त्याला लग्नखर्चासाठी बाजूला काढून ठेवलेल्या पैशातले काही पैसे देतात. त्याला म्हणतात, 'रहमत, तू आता आपल्या प्रांतात आपल्या गावी जा. आपल्या मुलीला भेट. तुला तुझी मुलगी भेटली की जो आनंद होईल, त्यातूनच माझ्या मुलीचं कल्याण होईल. ' कथेचा शेवट करताना रवींद्रनाथ लिहितात, ' लग्नखर्चात कपात करावी लागली. घरातली बायकामंडळी नाराज झाली होती. पण मंगलप्रकाशाने आमचा शुभ उत्सव अधिक उजळून निघाला होता.' या कथेत रवींद्रनाथांनी वडिलांचे नाते वैश्विक पातळीवर नेऊन ठेवले आहे.

दुसरी कथा एका अंध भिकारीणीची आहे. ही अंध भिकारीण गावातील एका मंदिरासमोर सकाळ संध्याकाळ उभी राहून भीक मागते. लोक तिला अन्न, पैसे देतात. त्यावर ती आपली गुजराण करते. एक दिवस संध्याकाळी जेव्हा ती भीक मागून आपल्या घराकडे परत जाते तेव्हा एक छोटा मुलगा येऊन तिच्या कमरेला मिठी मारतो. तिला आई म्हणतो. म्हातारी त्या मुलाला प्रेमाने जवळ घेते, त्याच्या अंगावरून हात फिरवते. त्याला आपल्याजवळ जे आहे त्यातील चांगले खाऊपिऊ घालते. त्या दोघांना एकमेकांचा लळा लागतो. दोघेही तिथेच राहू लागतात. त्या गावात एक सावकार असतो. एक दिवस म्हातारी आपले साठलेले पैसे त्याच्याकडे सांभाळण्यासाठी म्हणून ठेवते. एकदा तो मुलगा खूप आजारी पडतो. त्याला औषधोपचार करण्यासाठी आता तिच्याकडे पैसे नसतात. ती सावकाराकडे जाऊन आपल्या पैशाची मागणी करते. त्यावेळी तो तिने असे काही पैसे आपल्याकडे ठेवलेच नाहीत असे सांगून तिला हाकलून लावतो. म्हातारी जाता जाता त्याला म्हणते, ' तुला खूप मिळू दे.' खरं म्हणजे हा तिचा आशीर्वाद नसून संतापातून आलेला शाप आहे. म्हातारी घरी जाऊन त्या मुलाला सोबत घेते आणि सावकाराच्या घरासमोर ठाण मांडून बसते. तो मुलगा तिच्या मांडीवर झोपलेला असतो. सावकार येऊन त्या मुलाला पाहतो तर त्याला तो आपलाच मुलगा वाटतो. त्याचा मुलगा काही दिवसांपूर्वी जत्रेत हरवलेला असतो. तो म्हातारीजवळून त्या मुलाला बळजबरी घरात घेऊन जातो. आता त्याच्यासाठी पैसे खर्च करायला तो तयार होतो. म्हातारी भिकारीण घरी निघून जाते. मुलगा जेव्हा डोळे उघडतो तेव्हा त्याला वेगळीच माणसे समोर दिसतात. तो म्हणतो, 'माझी आई कुठे आहे?' तो पुन्हा तापाने फणफणतो. वैद्य म्हणतात, 'त्याच्या आईला बोलवा.' सावकार घरी जाऊन म्हातारीला घेऊन येतो. म्हातारी काही दिवस तिथेच राहते. तिला पाहून मुलगा लवकर बरा होतो. जे काम औषधाने, पैशाने होत नाही, ते प्रेमाने होते. मग म्हातारी आपल्या घरी जायला निघते. सावकार तिला आपल्या घरीच राहा म्हणतो पण ती नकार देते. त्याचे मन पालटते. तो म्हातारीने ठेवलेले पैसे तिला देऊ करतो. तो म्हणतो, 'हे घे. हे तुझेच पैसे आहेत.' यावेळी म्हातारी पैसे घेत नाही. ती म्हणते, 'ते पैसे मी त्या मुलासाठीच ठेवले होते. ते त्याच्यासाठीच खर्च करा. ' गोष्ट संपते पण लक्षात राहते ती स्वाभिमानी अंध भिकारीण. स्वतःजवळ काही नसताना अनाथ मुलासाठी प्रेमाचा हात पुढे करणारी, त्याची आई होणारी. आणि शेवटी तर ती दाता बनते आणि सावकार याचक! माणुसकीचे उदात्त दर्शन या कथेतून रवींद्रनाथांनी घडवले आहे. ही कथा वरवर पाहिली तर लहान मुलांसाठी वाटते पण तिच्यातील मतितार्थ मात्र सगळ्यांनीच लक्षात घ्यावा असा आहे.

'अतिथी' ही देखील रवींद्रनाथांची एक सुंदर कथा आहे. या कथेत मतिलाल नावाचे एक जमीनदार, त्यांची पत्नी अन्नपूर्णा, मुलगी चारूशी आणि कथेचा नायक असलेला एक मुलगा तारापद अशी प्रमुख पात्रे आहेत. तारापद हा पंधरा सोळा वर्षांचा एक ब्राह्मण मुलगा आहे. तो आपलं घर सोडून बाहेर पडला आहे. सहृदय असलेले मतीलाल बाबू बोटीतून आपल्या कठालिया या आपल्या गावी परतत असतात. बोटीवर त्यांच्यासोबत त्यांची पत्नी अन्नपूर्णा आणि नऊ वर्षांची असलेली एक सुंदर मुलगी चारूशी आहे. तारापद त्यांच्याकडे येतो. मला नंदिग्रामला सोडाल का असे तो मतीलाल बाबूंना विचारतो. तारापद हा मुलगा देखणा आहे. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज आहे. कोणत्याही व्यक्तीवर त्याच्या व्यक्तिमत्वाचा पाहता क्षणीच प्रभाव पडावा असा तो आहे. त्याच्याकडे पाहून मतीलाल त्याला नंदिग्रामला सोडण्याचे आश्वासन देतात. तारापद म्हणजे स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा एक मनमौजी मुलगा. तो बोटीवरील सगळ्यांचीच मने जिंकून घेतो. त्याला संगीताची आवड आहे. त्याचा आवाज उत्तम आहे. त्याला स्वयंपाक करणे, खरेदी करणे इथपासून ते बोट चालवणे आदी कौशल्ये सहज जमतात. अन्नपूर्णा तर त्याच्या व्यक्तिमत्त्वाकडे एवढ्या आकर्षित होतात की त्याला पाहून त्यांच्यातील वात्सल्यभाव जागृत होतो. त्याला कसे खुश ठेवता येईल याचा प्रयत्न त्या करतात. त्या त्याला त्याचा भूतकाळ किंवा कौटुंबिक पार्श्वभूमी विचारतात पण त्याबद्दल तो फारसे बोलत नाही. त्याच्या आईला चार मुलगे आणि तीन मुली आहेत. तसा तो घरातही सगळ्यांचा लाडका असतो. पण एकाच ठिकाणी अडकून पडणे वा बंधनात राहणे हा त्याचा स्वभाव नाही. त्यामुळे तो दोन तीन वेळा घरातून पळून गेला आहे.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

(रविवार, १० नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२४)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १० नोव्हेंबर -** कुष्मांड नवमी, कोहळा दान, अक्षय्य नवमी कृत युगादी ✻ **सोमवार, ११ नोव्हेंबर** - राष्ट्रीय शिक्षण दिन, विठ्ठल नवरात्रारंभ, संत हरिहरबाबा प्रकट दिन पंढरपूर ✻ **मंगळवार, १२ नोव्हेंबर** - प्रबोधिनी एकादशी, पंढरपूर यात्रा, विष्णू प्रबोधोत्सव, संत नामदेव महाराज जयंती, श्री नीलकंठभारती पुण्यतिथी आंबवडे ता. कोरेगाव, हरिहरेश्वर यात्रा श्रीवर्धन ✻ **बुधवार, १३ नोव्हेंबर** - तुलसी विवाहारंभ, प्रदोष, चातुर्मास्य समाप्ती, मनवादि शाक गोपाळ व्रत समाप्ती, सिद्धनाथ यात्रेत प्रा. धामणी ता. तासगाव, भैरवनाथ यात्रा चितळी ता. खटाव,✻ **गुरुवार, १४ नोव्हेंबर** - वैकुंठ चतुर्दशी, आवळी पूजन, भोजन, वैकुंठ चतुर्दशीचा उपवास, पं. नेहरू जयंती, बालदिन, क्रांतिवीर लहूजी साळवे जयंती, गोरक्षनाथ प्रकट दिन ✻ **शुक्रवार, १५ नोव्हेंबर** - श्री गुरु नानक जयंती, तुलसी विवाह समाप्ती, त्रिपुरी पौर्णिमा, महालय समाप्ती, कार्तिक स्नान समाप्ती, कार्तिकस्वामी दर्शन. मन्वादी कुलधर्म, बिरसा मुंडा जयंती ✻ **शनिवार, १६ नोव्हेंबर** - रवी वृश्चिक, हाल सिद्धनाथ जागर, देवी माऊली जत्रा सोनुर्ली, भैरवनाथ यात्रा येवती, ज्योतीर्लिंग रथोत्सव गुंडेवाडी.

**मुहूर्त:-** ✻ साखरपुडा- १३ नोव्हेंबर, ✻ बारसे- १३ नोव्हेंबर, ✻ जावळ- १०, ११ (१०पर्यंत), १३ नोव्हेंबर, ✻ गृहप्रवेश- ११ (१०पर्यंत), १३ नोव्हेंबर.

### मेष :- आर्थिक कामे यशस्वी

माणसाने वय वाढल्यावर ज्येष्ठ व्हावे, जेष्ठत्व दुसऱ्याला आधार देते, वृद्धत्व नाही. मंगळवारचा बुध शनि केंद्रयोग आर्थिक कामे यशस्वी करणारा आहे फार दगदग करू नका. दूरचे प्रवास टाळावेत. सरकारी कामे करून घ्यावीत. यशस्वी होतील नव्या विचारांना चालना देऊ शकाल. गुंतवणूक विचाराने करावी. यांत्रिक क्षेत्रात प्रगती घडेल. शुभ ता. १०, १३.

### वृषभ:- मरगळ दूर करा

मूर्ख वेडा गुरु व माता पिता यांच्याशी कधीही वादविवाद करू नका. करमस्त शनीचा बुधाशी होणारा केंद्रयोग कार्यक्षेत्रात चांगली फळे देणार आहे. अंगात आलेली मरगळ दूर कराल उत्साहाने कामाला लागा. यश आपलेच आहे आत्मविश्वास जतन करा. भागीदारीच्या व्यवसायात मनासारख्या घटना घडतील अडचणीवर मात कराल. चिंता नको. शुभ ता. ११,१३.

### मिथुन:- कौटुंबिक सौख्य

धना बरोबरच पवित्रता दानासोबत विनय वीरता सोबत दया अधिकारासोबत सेवा भाव हे चार दुर्लभ गुण आहेत. हे आपणात आहेत ते जतन करा. षष्ठातील रवी बोध अंगीकृत कार्यात समाधानकारक फले देणारे आहेत. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. अनावश्यक खर्च कसोशीने टाळावेत. पुढे धनचंद्र संभवते. घाईने निर्णय नकोत. शुभ ता. १०, १३

### कर्क:- उतावीळपणा टाळावा

जुन्या कपड्यांबाबत गरीब मित्रांबरोबर वृद्ध माता-पित्यांबाबत व साध्या राहणीबाबत कधीही लाज बाळगू देऊ नका. बुध शनीचा केंद्रयोग शिक्षणातून प्रगती करणारा आहे. उतावीळपणा टाळावा तो नुकसानीला कारणीभूत ठरू शकेल. प्रकृतीच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करू नका. पूर्वार्धात अस्वस्थ वाटेल. नवे विचार विचारानेच स्वीकारावेत. शुभ ता.१०

### सिंह:- मार्ग सुलभ नाही

देवगुरू दर्शनाने दारिद्र्य देववाणीने पाप जागृत राहिल्याने चोर व शांत राहिल्याने क्रोध पळून जातो. सुखस्थ बुधाचा शनिशी होणारा केंद्रयोग जनसंपर्क गृहनिर्माण, वाहतूक अशा व्यवसायात प्रगती करणारा आहे. निवडणूक रिंगणात असाल तर अधिक प्रयत्नांची गरज आहे. मार्ग सुलभ नाही. दुसऱ्यांवर फार अवलंबून राहू नका. शुभ ता. ११,१३

### कन्या:- मनशांती मिळेल

तुम्ही कितीही नाती जपा सुट्टी भेटली तरच येतील. मतलबी दुनिया आहे. सुसस्थ शुक्रामुळे काहीसे सुखाचे दिवस अनुभवास येतील. धार्मिक कार्यात मन गुंतवा मनशांती मिळेल. नोकरी व्यवसायात पुढचे पाऊल पडेल. महत्त्वाचे निर्णय एवढ्यात घ्यावे. लागतील सरकारी कामे मनासारखे होतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. फार जनता करू नका. शुभ ता १०, ११

### तुला:- कलागुणांच्या गौरव

सर्व योग्य होत आहे आपल्या हिशोबाप्रमाणे होत नसल्याने ते आपल्याला चुकीचे वाटत आहे. धनस्थ बुधाचा शनिशी होणारा केंद्रयोग आपल्या वाटचालीस योग्य मार्ग दाखवणारा ठरेल. आत्मविश्वास कोणत्याही परिस्थितीत गमावू नका. सरकारी येणे वसूल होईल. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती घडेल. कलागुणांचा गौरव होईल. शुभ ता. १३

### वृश्चिक:- अडचणींवर मात

आई पेक्षा मोठी देवी नसते व वडिलांपेक्षा मोठा देव नसतो. त्यांची पूजा हीच देवपूजा असते आर्थिक चिंता कमी झाल्याने सध्या आनंद वाटेल हाती घेतलेली कामे मनासारखी होत जातील. भाग्य वृद्धिंगत करण्याऱ्या घटना घडतील. अडचणीवर वेळीच मात कराल. गायन, वादनादिकलेत मनासारखे प्रगती घडेल. अपेक्षित घटना घडतील. शुभता १०, ११

### धनु:- आनंदाचे क्षण अनुभवा

नात्याची माळ तुटल्यावर पुन्हा ओवले तर लहान होते कारण भावनेचे काही मोती यातून निसटून गेलेले असतात. राशीत शुक्र असल्याने आनंदाचे क्षण अनुभवा गमावू नका. फार व्यवहारी होऊ नका. आठवा मंगळ विनाकारण गैरसमज निर्माण करणारा आहे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. वादाचे प्रसंग टाळायलाच हवेत. शुभ ता १०

### मकर:- भाग्यचक्र फिरू लागेल

वडिलांचे श्रम व घरातील समस्या ज्यांना माहित असतात ते चुकीच्या रस्त्याने कधीही जात नाहीत. धनस्थ शनीचा लाभातील बुधाशी केंद्रयोग होत आहे. त्यामुळे आर्थिक आघाडीवर सध्या आणखी आघाडी मिळवू शकाल. नोकरी व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. नव्या विचारांना गती द्या. भाग्यचक्र फिरू लागेल. शुभ ता. १०

### कुंभ:- विधानसभेत जाण्याचे योग

प्रयत्न जरूर करा पण दुसऱ्यांना पराभूत करण्यासाठी नाही तर स्वतः जिंकण्यासाठी करा. राशी स्वामी शनी राशीतच असून कर्मस्थ बुधाशी केंद्रयोग करणार आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात अपेक्षित फलप्राप्ती करू शकाल. विधानसभेत जाण्याचे योग आहेत. नशिबाचे फासे आपल्या बाजूने पडत आहेत स्पर्धामध्ये यश मिळेल. आर्थिक सुस्थितीत राहील शुभ ता. १०, १३

### मीन:- नव्या कामांना गती मिळेल

घर बिघडण्याचे काम घरातूनच होत असेल तर यात बाहेरच्यांचा काही दोष नाही. राशीत नेपच्यून अनुकूल पण राहू समावेत त्यामुळे कोणता ना कोणती चिंता आपल्या मनात सध्या आहेच. कर्मस्थ शुक्र चिंता दूर करेल. सध्या कोणतेही पुढचे पाऊल विचारपूर्वक टाकावे. यशस्वी होईल नव्या कामाला गती मिळेल. शुभ ता १०, ११, १३

!! शुभ भवतु !!

# देवपूजेची औषधी द्रव्ये



आज आपण देवपूजेच्या औषधी द्रव्याची थोडक्यात औषधीदृष्ट्या माहिती घेऊ या...

आजीचा बटवा

नारायण कारंजकर

भ्र. ९४२३७५८४०१



**दुर्वा:-** श्रीगणपतीच्या पूजनात दुर्वा अवश्य लागतात. कितीही अवर्षण पडले तरी दुर्वांचा नाश होत नाही. नाकातून रक्त पडते. त्यावर दुर्वाचा रस नाकात घालावा म्हणजे रक्त थांबते. ओकारीवर तांदळाच्या धुवणात दुर्वा वाटून रस काढावा व त्यात खडीसाखरेची पूड घालून तो घ्यावा. लघवी अडली असता दुर्वाच्या मुळ्यांचा काढा करून घ्यावा.

**तुळस :-** हिंदू धर्मात तुळशीचे फार महत्त्व आहे. घरोघरी तुळशीची पूजा केली जाते. तुळशीच्या औषधी उपयोगाची माहिती घ्यावी.

**उपयोग-** कफ विकारावर तुळशीच्या पानासोबत थोडे आले अगर सुंठीचा तुकडा टाकून त्याचा चहा करून घेतल्यास कफ कमी होतो. मुलांच्या ओकारीवर तुळशीच्या पानाचा रस मधात घालून द्यावा. सर्प व विंचू दंशावर तुळशीचा रस चोळावा. वायुतापात मनुष्य बडबडतो. त्याला तुळशीचा व आल्याचा रस मधातून द्यावा. गजकर्णावर तुळशीचा पाला चोळावा. थंडीतापावर- तुळशीची दहा पाने व तीन काळी मिरी वाटून गुळात गोळी करून घ्यावी. कान फुटल्यावर काळ्या तुळशीच्या पानाचा रस व माक्याचा रस एकत्र करून कानात घालावा. वांतीवर तुळशीच्या पानाच्या रसात वेलदोड्याची पूड घालून घ्यावे.

**बेलपत्र:-** बेल पित्त विकारावर उपयुक्त आहे. श्री शंकर हे पित्त प्रकृती दैवत आहे म्हणून त्यांना बेलपत्र अर्पण केले जाते.

**उपयोग:-** आम्लपित्तावर बेलाच्या पानाचा रस २ तोळे व खडीसाखरेची पूड अर्धा तोळा मिश्रण करून सकाळी घ्यावी. ४२ दिवस हे औषध घ्यावे. मुलाच्या आवेवर कच्च्या बेलफळातील गर खाण्यास द्यावा. तोंड आल्यास बेलफळाचा गर पाण्यात शिजवावा व त्या पाण्याने गुळण्या कराव्या. अंगाची दुर्गंधी जाण्यास बेलाच्या पानाचा रस अंगास चोळावा.

**पारिजातक:-** पारिजातकाची फुले सुवासिक असतात. ही वनौषधी उपयुक्त आहे. खरूज व गजकर्णावर पारिजातकाच्या पानाच्या रसात करंजबीज उगाळून लावावी. सर्पदंशावर पारिजातकाच्या पानाचा रस काढून पाजावा. बहुमूत्र रोगावर पारिजातकाच्या आंतरसालीचा काढा करून घ्यावा. अंग दुर्गंधीवर पारिजातकाची फुले चंदनात वाटून अंगास चोळावीत. गंडमाळेवर पारिजातकाच्या पाल्याचा रस काढून लेप द्यावा.

**हळद :-** हळद सर्वांच्या परिचयाची आहे. स्वयंपाकात जशी ती आवश्यक आहे तशीच देवपूजेसही आवश्यक आहे. हळदीत रक्त शुध्द करण्याचा गुणधर्म आहे.

**उपयोग:-** मूळव्याधीवर चांगले मोठे हळकुंड तुरीच्या डाळीत शिजवून सावलीत सुकावून घ्यावे व ते गाईच्या तुपात उगाळून मूळव्याधीच्या मोडास लेप करावा. मधुमेहावर ओली हळद दररोज दोन-चार तोळे खावी. एक महिन्यात मधुमेह कमी होतो. तसेच हळदीचे चूर्ण करून देवकपाशीच्या पानाच्या रसात खल करून गोळ्या बनवून (हरभऱ्याएवढी) ती घ्यावी.

**श्रीफळ :-** देवदर्शनाला जाताना व मंगल कार्यात श्रीफळ आवश्यक असते.

**उपयोग:-** बिब्बा उतल्यास सुके खोबरे जाळून त्याची राख खोबरेल तेलात खलून लावावी. उंदराच्या विषावर खवट खोबरे मुळ्याच्या रसात खलून लावावे. उचकी, वांतीवर नारळाच्या शेंडीची राख करून मधातून चाटवावी. छातीमध्ये दुखते त्यावर ओल्या नारळाचे दूध काढून ते पाच तोळे व भाजलेले हळकुंड त्यात उगाळून त्यात दोन तोळे तूप व एक तोळा साखर घालून खाण्यास द्यावे.

**विड्याचे पान:-** विड्याचे पानास नागवेल असे म्हणतात. त्याच्या पानाच्या रसाचा उपयोग पुष्कळ औषधी चूर्णात करतात.

**उपयोग:-** सर्पदंशावर विड्याच्या पानाच्या वेलीचे मूळ विड्यात घालून घ्यावे. म्हणजे उलटी होऊन विष उतरते. कोल्ह्याच्या विषावर नागवेलीचे मूळ बारीक वाटून घ्यावे म्हणजे वांती होऊन विष उतरते.

**मोगरा :-** मोगर्याची फुले सुगंधी असतात. अंगाची दुर्गंधी जाण्यासाठी मोगर्याची फुले पाण्यात घालून त्या पाण्याने स्नान करावे. डोकेदुखीवर ताज्या मोगऱ्याच्या फुलांचा वास घ्यावा. स्त्रियांनी मोगऱ्याचा गजरा वेणीत घालावा.

**गुलाब:-** गुलाबी रंगाचा गुलाब सुगंधीत असतो. सुगंध हा पित्तावर रामबाण उपाय आहे.

**उपयोग:-** सौम्य रेच होण्यास गुलाब फूल खडीसाखरेबरोबर खाऊन वर थोडे पाणी प्यावे. म्हणजे २४ तासात सौम्य रेच होतात. नेत्रदाहावर गुलाबपाणी रात्री झोपण्यापूर्वी डोळ्यात घालीत जावे. डांग्या खोकल्यावर एडवर्ड गुलाबाची ५ फुले एक किलो पाण्यात आटवून त्यात एक तोळा लोणी घालून ते मिश्रण दिवसभर थोडे थोडे घ्यावे.

**गुलकंद:-** गुलाबाच्या ताज्या सुगंधी फुलांपासून गुलकंद करतात. गुलकंदामुळे अशक्तपणा, उष्णता कमी होऊन गोवराचे विकार बरे होतात.

**सुपारी:-** मंगल कार्यात आणि धार्मिक विधीत पाने व सुपारी लागतात.

**उपयोग:-** अर्धे डोकेदुखीत, अर्धी सुपारी पाण्यात उगाळून कपाळावर लेप करावा. खरजेवर सुपारी जाळून तिची राख करावी व ती तिळाच्या तेलात खलून लावावी. गलगंडावर चिकणी सुपारी, चिंचोका व गुग्गुळ गरम पाण्यात उगाळून लेप करावा.

**चंदन:-** हिंदू धर्मात चंदनाचे गंध लावण्याची प्रथा आहे.

**उपयोग:-** दहावर चंदन व कापूर पाण्यात उगाळून सर्वांगास उटी लावावी. उन्हाळ्यावर तांदळाच्या धुवणात चंदन उगाळून त्यात खडीसाखरेची पूड व मध घालून पिण्यास द्यावे. घामोळ्यावर चंदन, धणे, वाळा व गुलाब पाण्यात खल करून लेप लावावा.

**दवणा:** शंभू महादेवास दवणा फार प्रिय आहे. फूरसाच्या विषावर दवण्याचा रस काढून प्यावा. गर्मीवर दवण्याच्या रस खडीसाखर घालून घ्यावा.

पान ५ वरून

## तरुणाईतील नकारात्मक बदल, एक विचार


शेवटी लोकशाहीत बहुमतालाच महत्व असते. हे साधे गणित या सिद्धांतवादी लोकांना कळत कसे नाही. लोकशाहीत नेते डोकी मोजतात पण त्या डोक्यात मेंदू असलाच पाहिजे, असे आग्रही मत त्यांचे केंव्हाच नसते. अहो, तो नसलाच तर अधिक चांगले हे अगदी उदार अंतकरणाने मान्य करतात, आमचे नेतागण. ते सांगतील त्या ठिकाणी जाऊन त्यांचे कार्यकर्ते राडा करुन आले म्हंजे झाले. पुढची जबाबदारी अगदी बिनदिक्कतपणे लोकशाही मार्गानेच (?) सांभाळून घेण्याचे काम केले जात असेल तर उगाच मेंदू कोरुन खाण्यात या सिद्धांतवाद्यांना काय मतलब आहे हो (?) आपल्या माणसांना सांभाळून घेण्याचे औदार्य दाखवतात आपलेच नेतागण. बहुतांशी चुका पोटात घालतात. आपलाच माणूस आहे. सांभाळून घेतले पाहिजे, असे मोठ्या मनाने मान्य करतात. ही सर्व विद्यमान स्थिती लक्षात घेता आपण या राजकीय स्थितीकडे किती गांभिर्याने पहावे? सध्याचे राजकीय नेतृत्व स्वहितासाठी अनेक राजकीय पक्ष चवीने चाखण्यासाठी कोलांटउड्या मारण्यात आणि स्वहितदक्ष राहण्यात धन्यता मानतात. कोणत्या पक्षातून कोणत्या पक्षात आपण नेमके कशासाठी जातो? केवळ मायासंचय करण्याची मायावी शक्ती निर्माण करणे आणि जनकल्याणाची आभासी प्रतिमा निर्माण करुन जनमाणसात मिरवणे. यामुळे जनसेवक निर्माण होतात हा प्रचंड मोठा विनोद आहे आणि तो लोकशाहीत वर्षानुवर्षे सुरु आहे. त्यावर विश्वास ठेवणार्या मतदारांच्या सहनशिलतेला वंदन केलेच पाहिजे. आपली महत्वाकांक्षा पूर्ण होत नाही, तेव्हा एका क्षणात मी या ऐवजी या तिकिटावर लढण्यास तयार आहे. त्यावरून त्यांची पक्षनिष्ठा लक्षात यावी? अशा शब्दात टिकाटिपनी करण्यात धन्यता मानणारे समस्त बुद्धीप्रामाण्यवादी. राजकारणाकडे करमणूकीचे साधन म्हणून पहातात. त्यामुळेच तळहातावर शिर घेवून लढणारे आमचे कार्यकर्ते आणि आम्ही पाडलेला पैशाचा पाऊस त्यामुळे आम्ही सत्तेची फळं चाखतं आहोतं. असे ठासून सांगण्याचा अधिकार आमच्या जनहितदक्ष प्राणप्रिय नेत्याला का नसावा? मतदारांनी आपले मत देण्याचे काम करावे. कोण किती आणि कोणत्या पक्षासोबत निष्ठावंत आहे (?) हे ठरवून उगाच त्या विषयाचा किस पाडून आपली शक्ती आणि बुद्धी वाया घालवण्याचे रिकामे उद्योग करणे हे कोणत्याही वर्तमान नेताजींना आवडने शक्य नाही, हे ओळखून वागले की झाले. कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी सार्वभोम लोकशाहीला धोका पोहचू नये. शिवाय कोणाच्याही दिनचर्येत कोणताच बदल होऊ नये. या संदर्भाने सर्व राजकीय पक्ष खूप जागरुक असतात. त्यांच्या कोणत्याही निर्णयाचे दुरगामी परिणाम काय होणार? हे त्यावेळेस पहाता येईल. आज त्याचा विनाकारण काथ्याकूट करणारे अनेक बुद्धीप्रामाण्यवादी आपल्यासोबत असंख्य सामान्य जनतेची दिशाभूल करतांना दिसतात (?) असेच म्हणावे लागेल.

लोकशाहीची प्रगल्भता व्यापक प्रमाणात जनमानसात रुजण्यासाठी अजून बराच कालावधी लागणारं हे वास्तव नाकारता येत नाही. आमचे खरे राष्ट्रहित कशात आहे? हे समजून घेवून मतदान करणे, शंभर टक्के लोकांचे नैतिक व राष्ट्रीय कर्तव्य आहे, त्यासाठी विशिष्ट सुविधा आणि त्यासोबतच विशिष्ट कायदा सुद्धा झाला पाहिजे. मतदान न करणाऱ्या व्यक्तीला कोणत्याही शासकीय सवलती मिळू नयेत. त्यासाठी कायद्याचा धाकही तेवढाच महत्वाचा. मतदानानिमित्ताने सलग सुट्या आल्या आहेत म्हणून टूरवर जाणारे तथाकथित सुशिक्षित, सूज्ञ, जाणकार समाजमान्य बुद्धीवादी यांना आपल्या या कृत्याची लाज वाटली तरच त्यांना लोकशाहीचे हितचिंतक म्हणता येईल. लोकशाहीच्या प्रगल्भतेसाठी चालवलेली प्रामाणिक तळमळ जर लोकांच्या लक्षात आली नाही तर काही कालावधीने हे विचार मांडणे बंद होईल. ते बंद झाले तर देश अराजकतेकडे जाण्यास वेळ लागणार नाही.

पान ३ वरून

## जागतिक अर्थकारण राजकारण ...

आज जगात भारताचा वाढलेला दबदबा, धाक, हा अनेक जागतिक घडामोडी व बदल यांचे संकेत देतो. कदाचित पुढील पाच एक वर्षात अमेरिकेने आपल्या नितीखाली ठेवलेली संयुक्त राष्ट्र ही संघटना इतिहास जमा होऊ शकेल. मोदींच्या नीतीचा एक खूप मोठा गाभा असा आहे की, कोणत्याही रेषेला लहान करण्याच्या प्रयत्नात वेळ, श्रम व पैसा वाया घालवू नका, तर त्या रेषे समोर दुसरी मोठी रेषा आखण्यात कौशल्य, श्रम, वेळ व पैसा उपयोगात आणा.




याच धोरणानुसार, त्यांनी संयुक्त राष्ट्रात स्थायी सदस्यत्व मिळवून घेण्याच्या पात्रतेपर्यंत, आपल्या कुवतीवर, देशाला फक्त दहा वर्षात नेलं. त्याच बरोबर पुतीन यांच्या मदतीने, नवीन संघटन वाढवण्याचा आपला इरादा परवा स्पष्ट करून, आम्हाला तुमच्या स्थायी सदस्यत्वाची आवश्यकता नाही, हा परस्पर संदेश २२ ते २४ ऑक्टोबर दरम्यान कझान येथे झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेतून, अमेरिकेसह संयुक्त राष्ट्र या अमेरिकन धर्जिण्या संघटनेला सुद्धा दिला.

या तीन दिवसातील परिषदेने, जगताची पुढची शंभर वर्ष ठरवली आहेत, हे माझं ठाम मत आहे. कदाचित मोदी आणि पुतीन मिळून, पुढील २,३ वर्षात अमेरिका, डीप स्टेट यांचा बाजार उठवणार. कारण सध्याहा वेगाचा आहे आणि दोघांकडे वेळ कमी आहे. त्याचप्रमाणे दोघांनाही आपल्या वारसाला मुक्त जग हातात द्यायचं आहे, हे ठरवलं आहे, हे लिहून ठेवा.

पान ४ वरून

## दुसरं बाल्य

समाजाचे ते फार मोठे आधार असतात. एकूणच अण्णांची ही मानसिक तयारी झालेली दिसली. फोनवर अपॉइंटमेंट घेऊन बसचे आरक्षण करून आम्ही बॅग तयार करून ठेवली. अण्णांचा चेहरा विलक्षण समाधानी दिसत होता. ते दोन्ही हाताचे पंजे नाचवीत आश्वस्त करत म्हणाले, ''काही काळजी करू नका. काहीतरी मार्ग निघेल.

सगळं व्यवस्थित होईल!'' कुठेही जायचे असेल तर नेहमीच्या सवयीप्रमाणे अण्णा लवकर उठून तयार होऊन बसलेले असतील, असा आमचा अंदाज होता. पण आज अण्णा अजूनही झोपलेले होते. ''काय झालं अण्णा? बरं वाटत नाही का? तुम्हाला जाण्याची अजिबात आम्ही जबरदस्ती करणार नाही!'' अडचणीचा हा प्रसंग कनवाळू नियतीने आपल्या पद्धतीने सोडवला होता... कारण अण्णा आता कोणतीही बॅग सोबत न घेता एकटेच अनंताच्या प्रवासाला निघून गेले होते... कायमचे!

पान ५ वरून

## रवींद्रनाथ टागोर: वारसा...

रवींद्रनाथांच्या इतर कथांप्रमाणेच या कथेलाही निसर्गाची सुंदर पार्श्वभूमी लाभली आहे. पावसाळी नदी, हिरवीगार कुरणे, गाणारे पक्षी आदी निसर्गाचे घटक कथेबरोबर साथसंगत करतात. तारापद या निसर्गाच्या सहवासातच रमून जातो. वाटेत नंदीग्राम गाव केव्हा निघून जाते ते कळत नाही. जमीनदार त्याला आपल्यासोबत आपल्या गावी घेऊन जातात. तिथे तो दोन वर्षे राहतो आणि थोड्याच कालावधीत सगळ्या गावकर्यांची सुद्धा मने जिंकून घेतो. पण या सगळ्या कालावधीत छोट्या चारुशीचे मन मात्र तो जिंकू शकत नाही. आपल्या आईवडिलांसह सगळे लोक या तारापदवर प्रेम करू लागल्यामुळे चारुशीचा जळफळाट होतो आणि ती त्याचा द्वेष करू लागते. पण काही क्षण असे येतात की नकळत का होईना मनाच्या एका कोपऱ्यात कुठेतरी तिला त्याच्याबद्दल ओढ वाटते. या सगळ्या संमिश्र आणि गुंतागुंतीच्या भावना आहेत. जमीनदार आपल्या लाडक्या मुलीचे म्हणजे चारुशीचे लग्न तारापदशी करायचे ठरवतात. पण मनमौजी असणारा आणि कुठेही अडकून न पडणारा तारापद तेथून गुपचूप पळ काढतो. तो 'अतिथी' बनूनच राहतो. या कथेत रवींद्रनाथांनी सगळ्या पात्रांच्या मानवी स्वभावाचे विविध रंग दाखवले आहेत. पित्याचे हृदय असलेला आणि तारापदवर पित्याप्रमाणे प्रेम करणारा जमीनदार मतीलाल, तारापदवर मुलासारखी माया करणारी आई अन्नपूर्णा, हट्टी, दुराग्रही आणि द्वेष करणारी पण मनातून चांगली असलेली चारूशी. सगळ्यात लक्षात राहतो तो तारापद. तो सगळ्यात असूनही कशातही लिप्त होत नाही. रवींद्रनाथ त्याला गढूळ पाण्यात पोहणार्या पांढर्या शुभ्र पंखाच्या राजहंसाची उपमा देतात. त्याने जग पाहिले आहे, अनेक लोकांना तो भेटला आहे. पण त्याने त्यांच्यातील सद्गुण तेवढे घेतले आहेत. वाईट गुणांपासून तो कोसो दूर आहे. एक प्रकारे हा मुलगा म्हणजे रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब आहे असे म्हटले जाते. कारण त्यांचे निसर्गाबद्दलचे प्रेम, संगीत आणि कलागुणांची आवड, त्याचप्रमाणे सगळ्यात राहूनही सगळ्यांपेक्षा वेगळा अशा गुणांचे मिश्रण असलेला हा तारापद आहे. **(क्रमशः)**

# शिक्षण प्रेरणा

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २४०

सकारात्मकतेचे तत्वज्ञान

डॉ. नितीन ह. देशपांडे

deshapandenh@gmail.com



कंटाळा येवो किंवा ताण येवो, ती आपली लाडकी बालके असतात शेवटी. बहुतांशी शिक्षणसंस्थांमध्ये विद्यार्थ्यांना ना स्वायत्तता असते ना स्वतःच्या गतीने अध्ययन करायची मुभा असते. विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे विषय शिकता येत नाहीत आणि म्हणून विद्यार्थी आणि शिक्षणातील विषयांमध्ये सेतू बांधणे जवळजवळ अशक्य झालंय. परीक्षा पद्धती आणखीनच अनुत्साह करणारी आहे कारण तिथे स्वतःला व्यक्त करण्याची, शिक्षणप्रक्रिया आवडण्याची काहीच बेगमी नसते.

अँथनी अँजेलो म्हणतात- आनंददायी शिक्षणाची सोय करा, मग कोणाचीही वाढ खुंटणार नाही.

**प्रेरणा ही संकल्पना सर्वंकष आणि व्यापक असल्याने ती खालील निरीक्षणांमधून अधोरेखित होते-**

१) विद्यार्थ्यांना शिक्षणात गुंतवून ठेवणे

२) स्वतःचा विकास आणि उपजत प्रतिभा/कौशल्ये यांना प्रेरणेची जोड देणे

३) शाळेत जास्तीत जास्त वेळ टिकून राहणे यासाठीचे प्रयत्न

४) वर्गातील वातावरण आधारदायी ठेवण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहन देणे

प्रेरणेचे शास्त्र जर शैक्षणिक चौकटींना लागू करता आलं आणि शिक्षण प्रक्रियेशी जोडता आलं तर पाल्य, पालक, शिक्षणसंस्था आणि अंततोगत्वा समाज खरंच ऋणी होईल.

उपजत उत्सुकता आणि प्रेरणा घेऊन आपण या विश्वात प्रवेश करतो, पण बरीच मंडळी कालौघात ही क्षमता गमावतात. शिकण्याकडे असलेला आपला कल बऱ्याच घटकांवर अवलंबून असतो. ज्ञान संपादन, ज्ञान वर्धन, विकास या साऱ्यांवर त्याचे परिमाण होताना दिसतात.

शिक्षण ही जन्मभराची प्रक्रिया आहे. प्रा. शिवाजीराव भोसले म्हणत- शिक्षण म्हणजे शिक + क्षण! ही त्यांनी सुचविलेली फोड खूपच संयुक्तिक वाटते. आणि जर ही एवढी, जन्माला पुरून उरणारी प्रक्रिया असेल तर ती निश्चितच आनंददायी आणि फलदायी व्हायला हवी. प्रेरणेची शाश्वत पातळी राखली तरच हे साध्य करणे शक्य आहे.

कुतूहल आणि उत्तेजना या दोन जाणिवांच्या मदतीने विद्यार्थी आपोआप अनुभवजन्य आणि बौद्धिक अपूर्वाई शोधायला उद्युक्त होतात आणि आपोआप अपरिचित आव्हानांना सामोरे जाऊ शकतात कारण त्याच्यानंतर यशाची वाट असते.

**जे. कृष्णमूर्ती म्हणतात-**

शिक्षण अखंड, अंतहीन असते. आपण पुस्तक वाचले, परीक्षा उत्तीर्ण झालो आणि शिक्षण संपले असे होत नाही. जन्मापासून मृत्यूपर्यंत सगळं आयुष्य हीच एक शिक्षणप्रक्रिया असते.

शिक्षणाच्या संदर्भात विद्यार्थी जितके अध्ययनात गुंततील आणि शैक्षणिक वातावरण निर्मितीत सहभागी होतील तितके त्यांचे ज्ञान वर्धिष्णू होत जाते. प्रेरणेने उद्युक्त झालेले पाल्य सक्रिय आणि सत्वर आनंददायी शिक्षणात सहभागी होतात आणि त्यांतून काही लाभाची अपेक्षा ठेवत नाही. स्किनर आणि बेलमोन्ट यांनी १९९३ साली असंही सिद्ध केलंय- शिक्षणप्रक्रियेत कमी सहभागी होणाऱ्या पाल्यांना बाह्य पुरस्कारांची अपेक्षा असते. मलोने आणि लेपार यांचे १९८७ साली शिक्षण प्रेरणेशी संबंधित मांडलेले सात घटक खालीलप्रमाणे आहेत-

१) आव्हाने

२) कुतूहल

३) नियमन

४) कल्पनाचित्र

५) अहमहमिका /चढाओढ

६) सहकार्य

७) दखल /मान्यता

यातील बहुतांशी क्रीडाक्षेत्रातही आढळतात. शिक्षणाच्या मानसशास्त्रात सध्याचे प्रवाह/ कल फक्त आकलनात्मक विकास एवढेच अधोरेखित करीत नाहीत तर विद्यार्थ्यांची प्रेरणा आणि प्राधान्य हे मूलभूत घटक बनलेले आहेत. शिकणे आणि कर्तृत्व यांचे वर्धन त्यामुळेच संभवते.

प्रेरणेचा अभाव शैक्षणिक यशामध्ये अडसर तर ठरतोच पण नैराश्य, चिडचिड अशा भावनांमध्येही प्रतिबिंबित होतो. याव्यतिरिक्त लेगाल्ट, ग्रीन-डेमेर्स यांनी २००६ मध्ये खालील घटक समाविष्ट केलेत- प्रयत्नांमध्ये विश्वासाचा अभाव, स्व-मूल्याची जाणीव नसणे आणि शैक्षणिक जबाबदाऱ्यांचे वैशिष्ट्य.

**शिक्षण प्रेरणेच्या संकल्पना**

लहान मुलांना शिक्षणाची प्रेरणा कशी मिळते याबाबत खूप संकल्पना विकसित केल्या गेल्या आहेत. **यापैकी पाच प्रमुख प्रेरणा खालील प्रमाणे-**

१) अंतस्थ आणि बाह्य प्रेरणा

२) स्वयंनिर्णय

३) ध्यान/लक्ष, प्रासंगिकता, आत्मविश्वास आणि संतुष्टी संरचना (आर्क्स)

४) सामाजिक आकलन

५) अपेक्षा

यापैंकी स्वयंनिर्णय आणि आर्कस या संकल्पना शिक्षणक्षेत्रात सर्रास वापरल्या जातात. सामाजिक आकलन आणि अपेक्षा या दोन्ही संकल्पना तुलनेने नवीन आहेत, पण शिक्षणाव्यतिरिक्त इतर क्षेत्रांमध्ये त्यांचा वापर यशदायी ठरू शकतो.

अंतस्थ प्रेरणा शैक्षणिक कर्तृत्वाला पूरक मानली जाते. पेले यांनी असे विधान केलेले आहे. यश कधीच अपघाताने मिळत नाही. कठोर परिश्रम, चिकाटी, अध्ययन, त्याग आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे अंतस्थ प्रेरणा त्याचा पाया असतो.

**शिक्षण आणि प्रेरणा**

लहान मुलांना प्रेरित केले तर त्यांचे ज्ञान वाढते आणि ग्रहण केलेलं अधिक काळ टिकून राहते. हे स्वाभाविक वाटले तरी प्रत्यक्षात दरवेळी मिळणारी प्रेरणा एकसमान असत नाही. असंही संशोधन सुचविते.

**विद्यार्थी दोन कारणांसाठी प्रेरणेच्या आधीन असतात-** (१) प्रभुत्व मिळविणे (२) अभ्यासातील (परीक्षेतील) सरस कामगिरी. कधी विद्यार्थी कौशल्ये, क्षमता विकसन या ध्येयाच्या मागे असतात तर कधी इतरांच्या तुलनेत आपण चमकदार ठरावे या स्पर्धेच्या हेतूने प्रेरित असतात. साहजिकच प्रेरणेचे स्वरूप वेगळे असते. मुरायाम आणि इलियट यांनी २०११ साली एक वर्तन प्रयोग साखळी केली आणि हे स्वरूप कसे वेगळे असते याचा मागोवा घेतला. त्यांना दिसले- सहभागी मंडळी समस्या-निरसनाच्या प्रयोगात गुंतली आणि त्यामुळे त्यांची स्मरणशक्ती सुधारली. त्यावरून निष्कर्ष निघाला की कामगिरी सुधारण्याच्या प्रयत्नात असलेल्या मंडळींचे शिक्षण कमी कालावधीसाठी टिकते तर प्रभुत्व मिळविणारे शिक्षण दीर्घ काळासाठी टिकते.

**प्रेरणा आणि नवसर्जन**

नवनव्या आणि उपयुक्त कल्पना सुचण्यासाठी आणि दैनंदिन प्रश्नांची उत्तरे सापडण्यासाठी विद्यार्थ्यांना नवनिर्माणाच्या गुणाची आवश्यकता असते. काही अंशी नवसर्जन व्यक्तिगत गुणांशी जोडलेले असले तरीही त्याच्यावर आसपासचे सकारात्मक, ऊर्जादायी वातावरण, विषयावरील प्रभुत्व, भाषामाध्यम, आणि अंतस्थ कलागुण यांचाही तितकाच प्रभाव असतो.

याचे श्रेय जाते १९९६ साली सर्वप्रथम नवसर्जन शिकण्याच्या प्रेरणेशी जोडणाऱ्या थेरेसा अम्बिले यांना! कर्तबगार मंडळींच्या आयुष्यात सर्जनशीलतेचे स्थान याचे सुमारे एक तप त्यांनी अध्ययन केले आणि शोधून काढले की कोठल्याही पारितोषिकाशिवाय फक्त काहीतरी नवीन, यापूर्वी अस्तित्वात नसलेले शोधून काढायचे हीच प्रेरणा त्यांना यशस्वी आणि प्रसिद्ध बनविते. शालेय विद्यार्थ्यांमध्ये अंतस्थ प्रेरणा सुरक्षित ठेवली आणि तिला आधार दिला तर शिक्षणाबरोबर सर्जनही संभवते. अर्थात अंतस्थ प्रेरणा जितकी अधिक, तितके सर्जन अधिक असा त्वरित निष्कर्ष काढू शकतात बरीच मंडळी पण ते तितकेसे अजून सिद्ध झालेले नाहीए. कलात्मक अनुभूती तेव्हाच संभवते, जेव्हा आपण मूलभूत ज्ञानात पारंगत असतो. बऱ्याच स्त्रोतांची मदत घ्यावी लागते सर्जन सिद्ध करायला आणि ते फक्त एखाद्या व्यक्तीवर अवलंबून नसते.

विल्यम पोलार्ड चे एक वाक्य प्रसिद्ध आहे- शिक्षण आणि नवसर्जन हातात हात घालून हिंडत असतात. यश कायम बेफिकीर असते कारण कालचे कर्तृत्व उद्यासाठी पुरेसे असेल याची त्याला नको तितकी खात्री असते.

नवसर्जन हा आयुष्याला अर्थ देणारा महत्वाचा पैलू आहे कारण सगळ्या महत्वाच्या आणि आवडत्या शोधांच्या मागे फक्त नवसर्जन असते. आणि हे आपोआप संभवत नाही, त्यासाठी तपःसाधना लागते. आपल्या शिक्षण यंत्रणेत विवेकनिष्ठतेला अधिक महत्व दिले जाते, जिथे टप्प्याटप्प्याने यशसिद्धी असते असं गृहीत असते. बरेचदा हा मार्ग पुरेसा असतो पण जेव्हा परिस्थिती अवघड आणि अनवट असते तेव्हा तर्कसुसंगती अपेक्षित यश देईलच असे नसते.

दृष्टिकोन सर्जनाचा असावा पण विचार अप्रत्यक्ष असावेत असं एडवर्ड डी बोनो (१९६७) म्हणतो आणि त्याने सहा प्रकारचे विचार प्रगट करण्यासाठी तशा टोप्यांची योजना केलेली आहे. सर्वसामान्य धोपट विचार वापरून झाल्यावरही हाती काही लागले नाही तर थोडेसे चौकटीबाहेर जावे. वर्गात उपयुक्त ठरू शकतील अशी काही तंत्रे खालीलप्रमाणे-

**१) पर्याय निर्माण करणे-** सुरुवातीपासून वैविध्याचा ध्यास धरणे

**२) गृहीतकांना आव्हान देणे-** ज्ञानातून शब्द समजतात आणि अनुभवांमधून अर्थ तेव्हा सगळं काही आपोआप आणि नियोजनाप्रमाणे होईल असं मनाशी धरलेलं गृहीत बरोबरच असते असं नाही. काहीवेळा त्यांना प्रश्न विचारावे लागतात.

**३) ठराविक हिस्सा /वाटा-** हा शेवटचा पर्याय असतो आणि हिस्सा ठरवून द्यायचा असतो.

**४) साधर्म्य-** दोन वेगवेगळ्या संरचनांमध्ये काही समानता शोधणे आणि त्यातून निष्कर्ष काढणे

**५) विचारांची दिशा बदलणे-** विरुद्ध नजरेने दृश्य बघणे. बरेचदा दृष्टिकोन बदलून मिळणारे उत्तर आश्चर्यचकित करणारे ठरू शकते.

**६) महत्वाचा हिस्सा अधोरेखित करणे-** आपल्यासाठी, परिस्थितीसाठी नेमके महत्वाचे काय याचा शोध घेणे आणि त्यांवर प्रयत्न स्थिरावणे

**७) विचारमंथन-** अनेकांनी एकाच समस्येच्या लक्षणांवर किंवा संभावित निरासनांवर काम करणे आणि सुचतील तेव्हढे पर्याय शोधणे

**८) निर्णय न घेणे-** एखादी कल्पना तितकीशी आकर्षक वाटली नाही तरी तात्काळ त्यावर प्रतिक्रिया न देणे

व्यक्ती आणि त्याचा भवताल यांच्यातील व्यामिश्र आणि किचकट प्रक्रियेतून नवनिर्माण शक्य असते. खरंखुरं शिक्षण विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन या कृतीत सामावून घेतलं तर प्रेरणा, एकाग्रता, आवड, आणि आनंद हे आपोआप जन्म घेतं आणि शिक्षणप्रवाहाच्या या अंगीभूत वैशिष्ट्यांचे शेर्नोफ आणि श्नेईडर यांनी २००३ साली संशोधन केले. त्यांना सापडलं - जर बालकांना आपण शिकण्याच्या बाबतीत उत्तेजित करू शकलो आणि सखोल ज्ञानाबद्दल त्यांच्या मनात समर्पण निर्माण करू शकलो तर ते साहजिकच प्रेरित होतात. अनुभवजन्य शिक्षण त्या अर्थाने अधिक प्रेरक असते.

सृजनाचे आनंद आणि नवं ज्ञानाची कवाडे एकदा गवसली की शिक्षकाचे काम संपले असे मॉंटेसरी म्हणतात. त्यांच्या मते शिक्षक वर्गात असून नसल्यासारखा हवा आणि विद्यार्थी स्व-प्रेरणेने, एका ध्यासाने पुढे मार्गस्थ होत असतील तर ते सर्वात सुंदर दृश्य असते. म्हणूनच पुलंच्या चितळे मास्तरांना कोणी विसरू शकत नाही. निवडीचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना बहाल केले, त्यांना आव्हाने दिली, संधी दिल्या आणि त्याबरोबरच संसाधने पुरविली तर चमत्कार होऊ शकतात. हा प्रवाह साधायचा असेल तर वर्गातील वातावरण, शिक्षकाची भूमिका सुविधा पुरविणाऱ्याची, अडचणींचे सुलभीकरण करण्याची असावी.

विद्यार्थी हा शिकणारा असावा. या भूमिकेंचा अंगीकार केला तर शाळा सुटल्यावरही विद्यार्थी घरी जाण्यास उत्सुक नसतील आणि दुसऱ्या दिवशी सकाळी घरट्यात परतण्यास आनंदाने तयार होतील. शाळा हे तुरुंग नसेल तर खऱ्या अर्थाने ज्ञानमंदिर असेल.

# गृहोपयोगी घट, अंबानी बीएसएनएलची वट



**दिवाळीचा माहोल अर्थव्यवस्था घुसळून काढणारा ढरला. या टप्प्यावर गृहोपयोगी वस्तूंच्या खपात मोठी घट अनुभवायला मिळाली आहे. याच सुमारास ‘बीएसएनएल’च्या ग्राहक संख्येत ६० लाखांची तगडी वाढ झाली आहे. दरम्यान, मुकेशभाई अंबानी आता स्वस्त धान्यांच्या दुकानांचे नेटवर्क उभे करणार असल्याची बातमी आहे. आणखी एक लक्षवेधी बातमी म्हणजे देशात डिजिटल पेमेंटच्या वापरात वाढ होत आहे.**

अर्थोद्योग

महेश देशपांडे

दिवाळीचा माहोल अर्थव्यवस्था घुसळून काढत असताना उण्या-अधिक बातम्यांचीही सद्दी अनुभवायला मिळत आहे. या शृंखलेतील ताजी बातमी म्हणजे अर्थनगरीमध्ये गृहोपयोगी वस्तूंच्या खपात मोठी घट अनुभवायला मिळाली आहे. याच सुमारास ‘बीएसएनएल’च्या ग्राहक संख्येत मात्र ६० लाखांची तगडी वाढ झाली आहे. दरम्यान, मुकेशभाई अंबानी आता स्वस्त धान्यांच्या दुकानांचे नेटवर्क उभे करणार असल्याची बातमी आहे. याच टप्प्यावर देशात डिजिटल पेमेंटच्या वापरात वाढ होत आहे. जादा महागाईमुळे शहरी भागातील गृहोपयोगी वस्तूंच्या आणि खाद्यपदार्थांच्या मागणीवर परिणाम होत आहे. देशातील आघाडीच्या गृहोपयोगी वस्तूंच्या उत्पादक दोन कंपन्यांनी २०२४-२५ च्या दुसऱ्या तिमाहीचे निकाल जाहीर केले आहेत. त्यांच्या नफ्यात घट झाली आहे.

हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेडने निकाल जाहीर केले आणि त्यानुसार दुसऱ्या तिमाहीमध्ये कंपनीच्या नफ्यात चार टक्क्यांनी घट झाली आहे. त्यामुळे गेल्या आठवड्यात ‘नेस्ले इंडिया’ने त्याचे निकाल जाहीर केले होते. या कंपनीच्या नफ्यामध्ये ०.९४ टक्के घट झाली होती. शहरांमध्ये गृहोपयोगी वस्तूंची मागणी कमी झाली आहे. या कंपन्यांचे व्यवस्थापनही मागणीमध्ये घट स्वीकारत आहे. ‘हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड’चे सीईओ आणि कार्यकारी संचालक रोहित जावा म्हणाले की, सप्टेंबर तिमाहीमध्ये शहरी बाजारपेठेत गृहोपयोगी वस्तूंची मागणी कमी झाली आहे, तर ग्रामीण भागात मागणी वाढली आहे. ते म्हणाले की, ग्राहकांच्या मागणीमध्ये हळूहळू होत असलेल्या बदलांवर आम्ही बारीक लक्ष ठेवून आहोत. दुसऱ्या तिमाहीमध्ये ‘हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड’चा निव्वळ नफा २६१२ कोटी रुपये होता. २०२३-२४ च्या दुसऱ्या-तिमाहीमध्ये तो २७१७ कोटी रुपये होता. मध्यमवर्गीय खर्चात कपात करतात. शहरी भागात ‘नेस्ले इंडिया’चीही मागणी कमी होत आहे. ‘नेस्ले इंडिया’ची कामगिरी जुलै-सप्टेंबर या तिमाहीमध्ये गेल्या आठ वर्षांमधील सर्वात कमी राहिली. शहरी भागात राहणाऱ्या मध्यमवर्गीयांनी आपल्या खर्चात कपात केली आहे. त्याचा सर्वाधिक परिणाम दूध आणि चॉकलेट विभागावर झाला आहे. ‘नेस्ले इंडिया’चे अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक सुरेश नारायण म्हणाले की, प्रीमियम वस्तूंचा खप मजबूत आहे; पण मध्यम सेगमेंटमध्ये मागणी कमी होत आहे. सुरेश नारायण म्हणाले की, हाती पैसा राखून असणारे प्रचंड खर्च करतात; पण मध्यमवर्गीयांना ते परवडत नाही. अनेक कंपन्या मध्यमवर्गाला लक्ष्य करत असून वाजवी किमतीत वस्तू देत आहेत. त्यांना तात्पुरत्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. बहुतांश एफएमसीजी कंपन्यांना समस्या येत आहेत. कारण मध्यमवर्ग अडचणीत आहे. पूर्वी केवळ एका तिमाहीमध्ये कमकुवत मागणी असायची; परंतु आता मागणीमध्ये सतत दोन-तीन तिमाहींमध्ये घट दिसून येत आहे. असे असले तरी दीर्घकालीन मागणीत सुधारणा होईल, अशी अपेक्षा आहे.

आता बातमी बीएसएनएलच्या कामगिरीची. जुलै महिन्यात खासगी टेलिकॉम कंपन्यांनी त्यांच्या प्लॅन्सच्या किमतींमध्ये मोठी वाढ केली. सर्वच कंपन्यांचे कॉलिंग, डेटा प्लॅन महागले. त्यानंतर देशात त्यांच्यावर बहिष्कार टाकण्याची एकच लाट आली आणि ग्राहकांनी ‘बीएसएनएल’कडे मोर्चा वळवला. परिणामी ‘बीएसएनएल’च्या ग्राहक संख्येमध्ये अचानक मोठी वाढ झाली. आता सरकार या सर्व बदलामुळे उत्साहित आहे. ‘बीएसएनएल’मध्ये आमूलाग्र बदल करण्याची तयारी सुरू झाली आहे. ‘बीएसएनएल’ लवकरच ‘फाईव्ह जी’ सेवा पुरवणार आहे. इतकेच नाही, तर लागलीच ‘सिक्स जी’ सेवेची चाचपणीही करण्यात येणार आहे. त्यासाठीचे प्रयोग सुरू झाले आहेत. असे झाले तर जगात सर्वाधिक गतीने इंटरनेट सेवा पुरवणारी ‘बीएसएनएल’ ही जगातील पहिली सरकारी कंपनी ठरू शकेल. दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी हा बदल घडवून आणण्याची तयारी केली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठी टेलिकॉम कंपनी बीएसएनएल गेल्या दोन वर्षांपासून नव्याने ठसा उमटवू पाहात आहे. ‘बीएसएनएल’मध्ये मोठे बदल झाले आहेत. गेल्या तिमाहीमध्ये प्रत्येक महिन्यात ग्राहक जोडले गेले आहेत. ‘बीएसएनएल’च्या ग्राहक संख्येत ६० लाखांची भर पडली आहे. भारत दूरसंचार निगम लिमिटेडची सेवा गावागावांत पोहोचविण्यात येत आहे आणि नेटवर्कमध्ये सुधारणा करण्यात येत आहे. सरकारने तोट्यात चालणाऱ्या ‘बीएसएनएल’मध्ये

सुधारणेसाठी ‘फोर जी’ आणि ‘फाईव्ह जी’ सेवांसाठी ८९,०४७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. गेल्या वर्षी केंद्र सरकारने जून महिन्यात याविषयी मंजुरी दिली होती. बीएसएनएल कर्जात बुडाली होती, तर तंत्रज्ञानातही पिछाडीवर होती. कंपनी गेल्या १२ वर्षांपासून तोट्यात होती; पण सरलेल्या दोन वर्षांमध्ये कंपनीने कात टाकली. आता कंपनी ‘फाईव्ह जी’ नाही तर ‘सिक्स जी’ची तयारी करत आहे. ‘बीएसएनएल’ सेवेसाठी चाचपणी सुरू असल्याचा दावा करण्यात आला आहे. ‘सिक्स जी’ तंत्रज्ञानावरही केंद्र सरकारने काम सुरू केले आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. मोठे शहर असो वा खेडेगाव; स्वस्त धान्य दुकान कोणत्या ना कोणत्या गल्लीत असते. या ठिकाणी सरकारी योजनेत, सरकारच्या किमतीत, अगदी स्वस्तात साखर, डाळी, गव्हाची आणि तांदळाची खरेदी करता येते. आता हेच काम भारतातील दिग्गज उद्योजक मुकेश अंबानी करतील. त्यांच्या ‘रिलायन्स रिटेल’मध्ये ग्राहकांना स्वस्तात धान्य मिळेल. डाळी, तांदळासह इतर अनेक जीवनावश्यक वस्तू अत्यंत स्वस्तात खरेदी करता येतील. स्मार्ट बाजारापासून जिओ स्टोअर, जिओ मार्टसह फॅशनेबल कपडे, खेळणी, ज्वेलरी आदी व्यवसायांमध्ये रिलायन्सने उत्तम पकड मिळविली आहे. केंद्र सरकार वाढती महागाई कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्यासाठी ‘रिलायन्स इंडस्ट्रिज’च्या रिटेल नेटवर्कचा वापर करण्यात येणार आहे. महागाई कमी करण्यासाठी सरकार या ठिकाणी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याचा विचार करत आहे. रिलायन्स रिटेल आणि भारत सरकारदरम्यान याविषयीच्या चर्चेची पहिली फेरी झाल्याचे समोर येत आहे. सरकार रिलायन्स रिटेल नेटवर्कच्या माध्यमातून स्वस्त दरात भारत ब्रँडचे पीठ, डाळी, तांदळासह इतर वस्तूंचा पुरवठा करण्याचा विचार करू शकते. प्रत्येक वर्गाला महागाईचे चटके बसत आहेत. या वर्गाला दिलासा देण्यासाठी आणि महागाईची झळ कमी करण्यासाठी केंद्र सरकार रिलायन्ससोबत धान्य आणि इतर वस्तूंचा स्वस्तात पुरवठा करू शकते. गेल्या काही वर्षांमध्ये पीठ, डाळी, गहू आणि तांदळाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. या किमती अचानक वधारल्याने केंद्र सरकारने भारत ब्रँड लॉंच केला. यामध्ये स्वस्त किमतीमध्ये पीठ, डाळी आणि तांदळाचा पुरवठा करण्यात येतो. या ब्रँडची सुरुवात केंद्र सरकारने २०२३ मध्ये केली होती. सध्या सरकार नाफेड, ‘एनसीसीएफ’, केंद्रीय भांडार आणि मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून या ब्रँडची विक्री करते. या ब्रँड अंतर्गत ग्राहकांना २९ रुपये प्रतिकिलोने तांदळाचा तर प्रतिकिलो २७.५० रुपये दराने पीठ, तूर डाळ ६० रुपये किलो दराने विकले जाते. दरम्यान, डिजिटल पेमेंटसंदर्भात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. मार्च २०२४ पर्यंत ग्राहकांच्या खर्चात अजूनही रोखीचा वाटा ६० टक्के आहे; परंतु कोविडनंतर हा वाटा झपाट्याने कमी होत आहे. रिझर्व्ह बॅंकेच्या अभ्यासानुसार तीन वर्षांमध्ये डिजिटल पेमेंटचा वाटा १४-१९ टक्क्यांवरून ४०-४८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. रिझर्व्ह बॅंकेच्या चलन व्यवस्थापन विभागातील प्रा. प्रदीप भुयान यांनी ‘भारतासाठी रोख वापर सूचक’ शीर्षकाच्या पेपरमध्ये हा निष्कर्ष काढला आहे. डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म, विशेषतः युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) २०१६ मध्ये लॉंच करण्यात आले होते. ५०० आणि १,००० रुपयांच्या नोटांच्या विमुद्रीकरणादरम्यान यूपीआयचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला.

या अभ्यासात रोख आणि डिजिटल पद्धतींद्वारे ग्राहकांच्या खर्चाच्या विविध डेटाचे विश्लेषण करण्यात आले आहे. २०१६-१७ मध्ये यूपीआयची सरासरी व्यवहार रक्कम ३८७२ रुपये होती. ती २०२३-२४ मध्ये वाढून १५२५ रुपये झाली. त्याचबरोबर कमी किमतीच्या खरेदीसाठी रोखीचा वापर केला जात आहे. लोकांकडे असलेले चलन ते जीडीपी गुणोत्तर २०२०-२१ मध्ये १३.९ टक्क्यांवर पोहोचले होते. २०२३-२४ मध्ये ते ११.५ टक्क्यांवर घसरले आहे. पी टू एम (व्यक्ती-टू-व्यापारी) व्यवहारांमध्ये यूपीआयचा हिस्सा २०२०-२१ मध्ये ३३ टक्क्यांवरून २०२३-२४ मध्ये ६९ टक्क्यांवर पोहोचला आहे.

(लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत)



# अभिजाततेचा दर्जा मिळाला पण...

विशेष
डॉ. साधना कुलकर्णी

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषाप्रेमींना आनंद तर झालाय, पण तो नक्की कशाचा, हेच त्यांना समजत नाहीय आणि जे मराठी असूनही तिचा तिरस्कार करतात, त्यांना याबद्दल काहीही सोयरसुतक नाही, असे पाहायला मिळत आहे. वास्तविक, आज प्रश्न हा भाषेचा नसून ती वापरणाऱ्या जनतेचा आहे. मराठी भाषा अभिजात आहे, यावर शिक्कामोर्तब करायला शासनाने अनेक वर्षे घेतली, पण भाषाप्रेमींना तिच्या अभिजाततेची प्रचीती येण्यासाठी शासन मान्यतेची गरजच नाही.

मराठी भाषेचा हा समृद्ध प्रवाह अखंड वाहत राहण्यासाठी मराठी माणसाच्या प्रयत्नांची गरज आहे. असो. पण मराठीच्या हालअपेष्टा निवारण्यासाठी शासनाने उचललेले पाऊल नक्कीच स्वागतार्ह आहे, अभिनंदनीय आहे. उलटपक्षी, आता मराठी माणसाची जबाबदारी वाढली आहे. कारण शासनाच्या नावाने बोटे मोडून आता नामानिराळे राहता येणार नाही. आमची पिढी मराठी शाळेतली, मराठी माध्यमातली. मराठी धडे, कविता, गाण्यांवर प्रेम करणारी. 'बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' किंवा '**हा शर गर धर सा पवि सा रवि सा स्मरारि सायक सा। पार्थ भुजांतरि पडला वल्मिका माजी नायक सा।।**' अशा तालबद्ध कविता म्हणताना भान हरपणारी आमची पिढी. पाढ्यांची तर मजा वेगळीच. बेंबीच्या देठापासून ओरडून पाढे म्हणायचे. मग 'दाहोदरसे', 'पाचोदरसे' या संख्या म्हणताना हसू आवरत नसे. त्या वेळच्या शाळांमधून मराठीचे जे संस्कार झाले, मराठीची जी गोडी लागली ती आजही तितकीच जिवंत आणि टवटवीत आहे. पण मराठी बोलणारी, मराठी माध्यमातली मुले ही गावठी, कनिष्ठ आणि बुजरी असतात, हा एक सार्वत्रिक समजही त्यावेळी होता. त्यामुळे हा न्यूनगंड आमची सावलीसारखा साथसंगत करायचा. इंग्रजी माध्यमातील मुले हुशार, चटपटीत स्मार्ट असतात, हा नियमच होता.

शालेय विद्यार्थी असताना मानगुटीवर बसलेल्या या हीन भावनेने आमचा पिच्छा कधीच सोडला नाही. त्यातून बाहेर पडण्यासाठी जीवाचा आटापिटा करावा लागला. मी नागपूर विद्यापीठात बी. जे. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला होता. ५० विद्यार्थ्यांच्या वर्गात मराठीत लिहिणारे दोघेच जण. त्यामुळे साहजिकच आमच्याकडे लक्ष देण्याचे प्रयोजनच नव्हते.

शिकवणारे सगळे शिक्षक मराठी होते, पण ते इंग्रजीतूनच शिकवायचे. मराठी ऐकले की अंगावर पाल पडल्याप्रमाणे प्रतिक्रिया असायची. दर महिन्यात होणारे व्याख्यान मराठीत असले तर संपूर्ण वर्ग रिकामा होई. एवढे वातावरण इंग्रजाळलेले होते. समाजात वावरताना भाषेच्या संदर्भात असे घाव किंवा अपमान झेलावे लागतात, तेही आपल्या महाराष्ट्रात! ही भावना विलक्षण बोचरी आणि दुखावणारी होती. भाषेवरून व्यक्तीची गुणवत्ता जोखण्याचा हा प्रकार खच्चीकरण करणारा होता. इंटर्नल परीक्षेत मास कम्युनिकेशन शिकवणाऱ्या शरद पाटील सरांनी माझा पेपर वाचला आणि वर्गात दाखवून म्हणाले, ''मराठीत लिहिलेल्या या उत्तरपत्रिकेमधले विचार आणि स्पष्ट भूमिका मला फार आवडली.'' त्या दिवशी वर्गातल्या कितीतरी विद्यार्थ्यांनी मान वळवून माझ्याकडे पहिल्यांदा बघितले, तेही अविश्वासाने.

आपल्या मायबोलीत विचार करून ते स्पष्ट मांडणे ही खरी शहाणीव आहे, याची मला त्यावेळी जाणीव झाली. आम्ही मराठीच आहोत, पण मराठी माध्यमातून शिकणं? नो वे. इंग्रजीमधून एक्स्प्रेस होताना जे वजन येते, त्याची सर मराठीला नाही, असे वर्गमित्रांचे ठाम मत होते. दुर्दैवाने हा समज



**आज प्रश्न हा भाषेचा नसून ती वापरणाऱ्या जनतेचा आहे. मराठी भाषा अभिजात आहे, यावर शिक्कामोर्तब करायला शासनाने अनेक वर्षे घेतली, पण भाषाप्रेमींना त्याची प्रचीती येण्यासाठी अशा मान्यतेची गरजच नाही. मराठी भाषेचा समृद्ध प्रवाह अखंड वाहत राहण्यासाठी मराठी माणसाच्या प्रयत्नांची गरज आहे. आता भाषेचा सर्वंकष आणि स्वच्छ वापर करण्याप्रती मराठी माणसाची जबाबदारी वाढली आहे.**

आजही तसाच आहे. आपले मराठी कलाकार पुरस्कार समारंभात 'आय मीन टू से' की, मला ही भूमिका जगायला मिळाली किंवा 'इट वॉज न युनिक एक्स्पिरियन्स यू नो?' अशी वजनदार सुरुवात करून नंतर मराठीतच बोलतात तेव्हा त्यांच्या लांगूलचालनेची चिड येते.

प्रतिष्ठित, प्रस्थापित व्यक्तींनी इंग्रजीतच बोलायला हवे किंवा इंग्रजीत बोलणारा व्यासंगी आणि बुद्धिमान असतो, ही डोळ्यांवर आणि मनावर लावलेली झापडे मराठी माणूस कधी काढणार? त्यामुळेच मराठी शाळांचे महत्त्व कमी होऊन इंग्रजी माध्यमाला पर्याय नाही, ही परिस्थिती निर्माण झाली आहे. माझ्या दोन्ही मुलांना मी मराठी माध्यमातच प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण देण्याचा निर्णय घेतला तेव्हा सगळ्यांनी वेड्यात काढले. सुरुवातीला मुलांनीही मला दोष दिला, पण आज ते मराठी आणि इंग्रजी साहित्य तेवढ्याच आवडीने वाचतात. अचूक इंग्रजी लिहितात. बोलतात. इंग्रजी, मराठीतली प्रसिद्ध पुस्तके त्यांच्या संग्रही आहेत. इंग्रजी माध्यमातील मुलांना इंग्रजीही थातूरमातूर येते आणि ते मराठीलाही तुच्छ समजतात, ही वस्तुस्थिती आहे. मराठीची अशी दुर्दशा करण्यात महत्त्वाचा हात आहे तो समाजमाध्यमांवरील संदेशांचा. तिथे अशी मराठी आणि इंग्रजी भाषेची लक्तरे बघताना जीव तुटतो. जाहिरातींमधले, बातम्यांमधले मराठी ऐकताना अंगावर काटा येतो. प्रसिद्ध वृत्तनिवेदक भक्ती बर्वे मुलाखतीत म्हणाल्या होत्या की, दूरदर्शनवर बातम्या देण्यापूर्वी रोज अचूक शब्दोच्चारांचा कसून सराव होत असे. 'श' आणि 'ष' मधला फरक, ऱ्हस्व-दीर्घ हे उच्चारांवरून ऐकणाऱ्याला समजले पाहिजे, हा कटाक्ष होता.

आज मात्र सगळाच आनंदीआनंद आहे. भावना पोहोचविणे महत्त्वाचे, भाषा नाही; हा आजचा परवलीचा मंत्र आहे. मराठी माणूसच मराठी भाषेच्या अधोगतीला जबाबदार आहे. मराठी घरात पाळलेल्या कुत्र्याशी इंग्रजीतूनच का बोलले जाते? इंग्रजी माध्यमातील पाल्यांवर मराठी आणि इंग्रजीचे धेडगुजरी संस्कार करण्यात काय शहाणपण आहे? सही इंग्रजीतूनच केली पाहिजे का? घराचा पत्ता इंग्रजीत लिहिल्याशिवाय समजत नाही का? कोणताही अर्ज हा इंग्रजीतच लिहिला पाहिजे का? माध्यमांवर व्यक्त होताना अधूनमधून इंग्रजी शब्द (आपले साधेच हो - यू नो, क्व्युअली, इव्हेन्च्युअली वगैरे वगैरे) पेरल्याशिवाय कर्तृत्वाची उंची वाढत नाही का? चांगले मराठी शब्द वापरणाऱ्या व्यक्तीची चेष्टा का केली जाते? 'कौन बनेगा करोडपती'मधील अमिताभ बच्चनचे अस्खलित आणि समृद्ध हिंदी ऐकताना त्याची चेष्टा केली जाते का?

आशुतोष राणा, पंकज त्रिपाठी, मनोज वाजपेयी यांचे शुद्ध हिंदी कानाला किती गोड वाटते. मग मराठीचीच मानहानी का? तेही मराठी माणसाकडूनच? याचे एकच उत्तर मला दिसते.. ते म्हणजे न्यूनगंड, इतर भाषांचे लांगूलचालन, स्वतंत्र विचार न करता इतर भाषांची नक्कल आणि गुलामी पत्करण्याची वृत्ती. ही वैशिष्ट्ये मराठी मनाच्या रक्तात भिनली आहेत, हे दुर्दैवाने मान्य करावे लागेल. त्याच वेळी दुसरे टोक म्हणजे मराठीचा आत्यंतिक अभिमान, मराठी हेच विश्व, मराठीच उत्कृष्ट असे समजणाराही एक समुदाय आहे. ते आपल्या कूपमंडूक वृत्तीवरच खूश असतात. मग यांचे हसे होते आणि निष्कारण भाषेला दोष दिला जातो. दैनंदिन जगण्यातून सामान्य मराठी माणसाला कसे अनुभव येतात हे वर मांडले.

अभिजात दर्जामुळे मराठी साहित्यविश्वात, शासनदरबारात, उद्योगधंद्यात, चित्रपटसृष्टीत, विद्यापीठांमध्ये, जागतिक स्तरावर काय बदल घडणे अपेक्षित आहे, याचा ऊहापोह करण्याची माझी बुद्धी नाही. पण कागदपत्र जमवून, कायदे करूनही शेवटी सामान्य जनता प्रत्यक्ष कसे आचरण करते, यावरच सारे अवलंबून असते. मराठी माणसाला ज्या दिवशी जाहीरपणे मराठी बोलायची लाज वाटू लागली, त्या दिवसापासून मराठी माणसाचा कणा नष्ट झाला. आता ही अभिजातता खेचून आणण्याची आणि टिकवण्याची जबाबदारी जनतेची आहे. शासनाने कुलूप उघडून आपल्या हातात किल्ली दिली आहे. तिचा कसा उपयोग करायचा, हे आपणच ठरवायचे आहे. परभाषेतही व्हा पारंगत ज्ञानसाधना करा तरी. मायमराठी मरते इकडे परकीचे पद चेपू नका... भाषा मरता देशा ही मरतो संस्कृतीचा ही दिवा विझे. गुलाम भाषिक होऊनी अपुल्या प्रगतीचे शीर कापू नका... हे कविवर्य कुसुमाग्रजांच्या कवितेतील एक कडवे आहे. मराठी माणसाची नस ओळखून त्यांनी या ओळी रचल्या असाव्यात. ही संपूर्ण कविता राज्याच्या मंत्रालयात दर्शनी भागी लावली होती.

आज आहे का, माहीत नाही. ती पूर्ण वाचणाऱ्याचाही सत्कार व्हावा अशी आज परिस्थिती आहे. पण घटस्थापनेच्या शुभदिवशी अभिजात दर्जाची पहिली माळ लागली आहे. यातून नक्कीच अभिजाततेचे सोने लुटले जाईल, अशी आशा करू या.

# पर्यावरण जागरूक होण्याची खरी वेळ

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे



**हवामान बदलाची समस्या अधिक गंभीर होत आहे. २० वर्षांपूर्वी पर्यावरण शिक्षण हा अनिवार्य आणि स्वतंत्र विषय बनवला असता, तर आज एक तरुण पिढी देशाच्या प्रशासनात कार्यरत असती. त्यांच्या मनात पर्यावरण रक्षणाविषयीची आदरभावना निर्माण झाली असती. त्यांच्यापैकी कोणी तरी दिल्लीची समस्या एक आव्हान मानून सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले असते आणि ते यशस्वी झाले असते.**



सुप्रसिद्ध बौद्ध विचारवंत थीच नट हान यांनी हवामान बदलाच्या गंभीर समस्येबाबत म्हटले होते की, आपण सध्या चालत असलेल्या मार्गावरच चालत राहिलो, तर आपल्या अपेक्षेपेक्षा लवकर मानवजातीचा विनाश होईल. हवामान बदलाची परिस्थिती समजली असलेले आणि वस्तुस्थिती माहीत असलेले याच्याशी असहमत होऊ शकत नाहीत. जगभर सत्तेत असलेले लोक सध्याचा मार्ग बदलण्याविषयी सतत बोलतात आणि अनेक उपायांवर चर्चा करतात; प्रत्यक्षात कोणताही बदल घडत नाही, तेव्हा आश्चर्य वाटते. याचे सर्वात जवळचे उदाहरण म्हणजे दिल्लीतील वायू प्रदूषणाची भीषण समस्या.

दरवर्षी तीच आश्वासने, न्यायालयाचे तेच तेच नाराज निर्णय हे दिल्लीचे नशीब बनले आहे. तसे, ही समस्या फक्त दिल्लीची नाही, ती देशभरात आहे, जगभरात आहे. सुमारे २० वर्षांपूर्वी भारताची नवी पिढी पर्यावरण प्रदूषणाला सामोरे जाण्यासाठी तयार होण्याची शक्यता निर्माण झाली होती; पण ती राजकारणाची बळी ठरली. खरे तर, सर्वोच्च न्यायालयाने डिसेंबर २००३ मध्ये 'एनसीईआरटी'ला पर्यावरण शिक्षण हा वेगळा विषय म्हणून शिकवण्यासाठी पहिली ते बारावीपर्यंतचा अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्देश दिले होते. या संस्थेने मार्च २००४ मध्ये अभ्यासक्रम तयार करून न्यायालयासमोर ठेवला. न्यायालयाने तो सर्व राज्य सरकारांना पाठवला. सर्व राज्य सरकारांनी तो स्वीकारला. राष्ट्रीय पातळीवर ही अत्यंत समाधानाची बाब होती. आपल्या शालेय शिक्षणाच्या रचनेत आवश्यक ते बदल करून पर्यावरण शिक्षण हा स्वतंत्र विषय बनवण्याबाबतही त्यांनी सांगितले. मे २००४ मध्ये केंद्रात नवीन सरकार आले. हा निर्णय मागील सरकारने केलेल्या प्रयत्नांचे फलित असल्याने अंमलबजावणी झाली नाही. धोरण-निर्धारणाच्या पातळीवर दृष्टीचा अभाव असतो, तेव्हा असे अनेक निर्णय घेतले जातात, ज्यांचा आधार शैक्षणिक नसून राजकीय विचारधारांच्या सततच्या संघर्षात कुठे तरी दडलेला असतो. २० वर्षांपूर्वी पर्यावरण शिक्षण हा अनिवार्य आणि स्वतंत्र विषय बनवला असता, तर आज एक तरुण पिढी देशाच्या प्रशासनात कार्यरत असती. तिच्या मनात पर्यावरण रक्षणाविषयीची आदरभावना निर्माण झाली असती. त्यांच्यापैकी कोणी तरी दिल्लीची समस्या हे एक आव्हान मानून सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले असते आणि ते यशस्वी झाले असते, अशी शक्यता आहे. इंदूर आणि सुरतसारख्या शहरांमध्ये स्वच्छतेच्या बाबतीत मिळालेले यश आणि देशभरात ज्याचे कौतुक झाले, त्यामागे कुठेतरी एक उत्साही, अभ्यासू आणि दूरगामी व्यक्तिमत्त्व होते. जबाबदार व्यक्तीला प्रामाणिकपणे एखादी समस्या सोडवायची असेल, तर ती मार्ग शोधून त्यावर तोडगा काढू शकते, हे आता सर्वसामान्यांना समजले आहे. त्यासाठी पहिली गरज ही आहे की, त्यांनी कुटुंब आणि करीअरऐवजी लोकसेवा हे आपल्या जीवनाचे ध्येय बनवून पुढे जावे. लोकशाही म्हणते की, जे लोकप्रतिनिधी घटनात्मक पदांवर नियुक्त केले जातील ते लोकसेवेमुळेच तेथे पोहोचतील आणि त्यानंतर सर्व काही या सेवेला समर्पित करतील.

महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, डॉ. राजेंद्र प्रसाद, आचार्य कृपलानी यासारख्या ऋषिमुनींना स्वतंत्र भारतात नेतृत्व प्रदान करणाऱ्या लोकप्रतिनिधींकडून हीच अपेक्षा होती. दुर्दैवाने सध्याच्या राजकीय आणि पक्षीय वैचारिक बांधिलकींच्या अर्धवट समजुतीमुळे त्यांच्या आकांक्षा पूर्णपणे नाकारल्या गेल्या आहेत. सर्वसामान्यांचे जीवन प्रभावित करणाऱ्या प्रत्येक क्षेत्रात निर्णय घेणाऱ्यांचा स्वार्थीपणा व्यक्तीसाठी वेदनादायक परिस्थिती निर्माण करतो. त्यामुळे जनहिताचे मोठे प्रकल्प आपले उद्दिष्ट साध्य करू शकत नाहीत. देशातील सुशिक्षित वर्ग आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी पुढे येईल आणि सरकारी यंत्रणा प्रामाणिक असेल, तेव्हाच सर्वसामान्यांच्या जीवनात अपेक्षित बदल घडतील हे स्पष्ट आहे. मानवी क्रियाकलापांमुळे पृथ्वी अनेक प्रकारच्या वादळांना तोंड देत आहे. अव्यवस्थित विकास आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या अंदाधुंद शोषणामुळे पृथ्वीवरील संकट अधिक गडद होत आहे. यामुळेच रोज कोणत्या ना कोणत्या भागात नैसर्गिक आपत्ती येतच असतात. मध्यंतरी अवकाळी पावसाने दुबई शहर हादरले.

१६ एप्रिल रोजी झालेल्या मुसळधार पावसाने तेथील जनजीवन विस्कळीत झाले होते. तेव्हा तिथे एकाच दिवसात २५० मिलीमीटरपेक्षा जास्त पाऊस झाला. एवढा पाऊस दुबईत दोन वर्षांमध्ये पडतो. निसर्गाच्या प्रहारामुळे दुबईचे सारे ग्लॅमर निस्तेज झाले. दुबईमध्ये पावसाने कहर केल्यानंतर तीन दिवसांनी पाकिस्तानला निसर्गाचा फटका बसला. मुसळधार पावसामुळे ८० हून अधिक लोकांना जीव गमवावा लागला तर शेकडो घरांचे नुकसान झाले. हिमाचल प्रदेशमध्येही एप्रिल महिन्यात बर्फवृष्टी झाली. ती ही अशा वेळी झाली जेव्हा देशाच्या अनेक भागांमध्ये अवेळी उष्ण वारे वाहत होते.

हैदराबादमध्येही अशाच प्रकारे जोरदार अनपेक्षित पाऊस झाला. अशा घटना आता जगभर अधिक प्रमाणात पाहायला मिळत आहेत. निसर्गाचे असे वागणे हा चिंतेचा विषय असतानाच असे का घडत आहे, याचा विचार करायला हवा. या सर्व घटनांच्या मुळाशी हवामान बदल असल्याची वस्तुस्थिती कोणापासून लपून राहिलेली नाही. हवामान बदलाचे दुष्परिणाम वर्षभर नवनवीन स्वरूपात दिसून येत आहेत. निसर्गाच्या प्रतिकूल मानवी क्रियाकलापांमुळे पृथ्वीचे तापमान सतत वाढत आहे, हे सर्वज्ञात आहे. महासागर असो, पर्वत असो, नद्या असो की शेतजमिनी; निसर्ग सर्वत्र हाहाकार माजवत असतो. अनेक देशांमध्ये डोंगराळ भागातील जलाशय कोरडे पडत आहेत आणि वनक्षेत्र कमी होत आहे. या कारणास्तव वन्य प्राणी दररोज तहान शमवण्यासाठी बाहेर पडतात, तेव्हा त्यांचा मानवाशी संघर्ष होतो. जंगलातील ओलावा कमी होत असल्याने आणि कमालीचे तापमान यामुळे जंगलांना आग लागण्याच्या घटनाही वाढत आहेत. पावसाळ्यात नद्या कोरड्या पडत असून मोठ्या नद्यांमधील पाण्याचे प्रमाण सातत्याने कमी होत आहे. लागवडीच्या जमिनीतील कार्बनचे प्रमाण सातत्याने कमी होत आहे.याचा परिणाम अन्न उत्पादनावरही होत आहे. एकाच देशाचे वेगवेगळे भाग दुष्काळग्रस्त आणि पूरग्रस्त आहेत. हवामान बदलाची समस्या वाढवणाऱ्या कारणांमध्ये वाढती लोकसंख्या आणि त्याचा उपभोगवाद यांचाही समावेश आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि अधिकाधिक उपभोग घेण्याची प्रवृत्ती वाढल्यामुळे निसर्गाच्या संसाधनांचा अतिशोषण केला जात आहे. उपभोक्तावादामुळे कार्बन डाय ऑक्साईड, क्लोरो फ्लोरो कार्बन आणि मिथेन यांसारखे हरितगृह वायू वातावरणात मोठ्या प्रमाणात पोहोचत आहेत.

ग्राहकोपयोगी वस्तूंच्या निर्मितीपासून दैनंदिन गरजांपर्यंत पाण्याचा वापर सातत्याने वाढत असून त्या प्रमाणात त्याचे संवर्धन होत नाही. आज अनेक देशांमध्ये कचऱ्याचे डोंगर तयार होत आहेत. जगात दरवर्षी लाखो टन प्लॅस्टिक कचरा निर्माण होतो, जो २०५० पर्यंत अनेक पटींनी वाढण्याची अपेक्षा आहे. भारतातही मोठ्या प्रमाणावर प्लॅस्टिक कचरा निर्माण होतो. तो गेल्या पाच वर्षांमध्ये दुप्पट झाला आहे. यातील ९० टक्के कचरा, नद्या आणि नाल्यांमध्ये जातो. प्लॅस्टिक कचऱ्यामुळे पृथ्वीवरील जैवविविधतेवर गंभीर परिणाम होत आहे. या कचऱ्याचे छोटे कण पाण्यात हळूहळू विरघळतात. त्याचा मानवी आरोग्यावर वाईट परिणाम होतो. प्लॅस्टिक कचरा ही पृथ्वीसाठी मोठी समस्या बनली आहे; परंतु त्याचा वापर कमी करण्यासाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले जात नाही. महासागर प्लॅस्टिकच्या कचऱ्याने भरलेले आहेत. ते इतर मार्गांनीही पृथ्वीच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरत आहे. पृथ्वीवरील संपूर्ण जैवविविधता धोक्यात आली आहे. आता जागरूक होण्याची, सुधारण्याची आणि उपभोगवादाला आळा घालण्याची वेळ आली आहे. आताही जर आपण सतर्क राहिलो नाही, तर संकट इतके गंभीर होऊ शकते की, त्याला सामोरे जाणे कठीण होऊ शकते. आधुनिक जीवनशैलीत बदल घडवून आणल्याशिवाय काहीही होणार नाही, हे सरकारांबरोबरच समाजानेही समजून घेतले पाहिजे. आपल्याला भौतिक जीवनाचा त्याग करावा लागेल. अन्नपदार्थांची होणारी नासाडी थांबवून वीज आणि पाण्याचा आर्थिक वापर करायला शिकावे लागेल. 'वापरा आणि फेका'ची संस्कृती सोडली पाहिजे. हवामान बदल थांबविण्याची जबाबदारी पर्यावरण संस्था आणि सरकार यांची आहे, असा विचार करणे योग्य नाही. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)